दिनांक २२.०९.२०२६ रोजी झालेल्या जि.प. सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

आज दिनांक २२.०९.२०२६ रोजी दुपारी २.३० वाजता जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा मा.सौ.उभा संभाजी पाटील तळेगावकर, अध्यक्ष, जिल्हा परिषद लातूर यांच्या अध्यक्षतेखाली कै.यशवंतराव चव्हाण सभागृह, जिल्हा परिषद लातूर येथे आयोजित करण्यात आली सदर सभेस सभा.पदाधिकारी, सन्मा. सदस्य (६३), अधिकारी (४३) उपस्थित होते.

सभेच्या सुरूवातीस सचिव तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.) जि.प. लातूर यांनी उपस्थित सन्मा.पदाधिकारी, सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत केले. "राष्ट्रगीत" व "राज्यगीत" झाल्यानंतर मा.अध्यक्ष यांचे अनुमतीने विषयपत्रीकेनुसार सभेच्या कामकाजास सुरूवात करण्यात आली.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सचिव :- (विषय क्रमांक १) दिनांक ०७.०७.२०२६ रोजी झालेल्या जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेचे इतिवृत कायम करणे.

मा.सभापती, पं.स. निलंगा :- आजच्या जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेमध्ये विभागाने जुलै-२०२६ मध्ये झालेल्या जि प सर्वसाधारण सभेचे इतिवृत कायम करण्याचा विषय सादर केला आहे परंतु त्यानंतर दिनांक १३.०८.२०२६ रोजी आयोजित विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत कायम करण्यासाठीचा विषय विषय पत्रिकेमध्ये दिसून येत नाही याबाबत खुलासा करा. मग सदर विशेष सर्वसाधारण सभा आयोजनाचा उद्देश काय होता. या संदर्भात मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांच्याशी समक्ष चर्चा केली असता पंचायत समिती स्तरावरील मासिक सभेमध्ये १५ वा व १६ वा वित आयोग अंतर्गत आराखड्याचे वाचन करणे अपेक्षित असल्याचे सांगितले होते. त्याच नियमाप्रमाणे आजच्या जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेमध्ये देखील १५ वा व १६ वा वित आयोगाचे आराखड्याचे वाचन करणे आवश्यक नाही का. जेनेकरून पंचायत समितीने निश्चित केलेल्या आराखड्यामध्ये समाविष्ट केलेली कामे जिल्हा परिषदेच्या आराखड्यामध्ये समाविष्ट नसावीत जेणेकरून कामे दुबार होणार नाहीत म्हणूनच केवळ हा विषय मांडला आहे.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सचिव :- दिनांक १३.०८.२०२६ रोजी झालेल्या विशेष जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेचे इतिवृत अद्याप अंतिम झालेले नसल्याने सदर विषय आजच्या सर्वसाधारण सभेसमोर सादर करण्यात आलेला नाही. तथापि इतिवृत अंतिम होताच सदर विषय पुढील जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेत सादर करण्यात येणार आहे याची सन्माननीय सभापती महोदयांनी नोंद घ्यावी. पुढील जि.प.सर्वसाधारण सभेमध्ये १३.०८.२०२६ रोजी झालेल्या विशेष जि.प. सर्वसाधारण सभेचे इतिवृत मान्यतेसाठी सादर करण्यात येईल.

सन्मा.सदस्य श्री.दिलीपकुमार मारोती मटके :- सदर विषय अतिशय महत्त्वाचा होता त्या विषयासाठी विशेष सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते. सदर विषयाचे इतिवृत आजच्या जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेत मान्यतेसाठी सादर करणे आवश्यक होते.

मा.अध्यक्ष महोदया :- दिनांक १३.०८.२०२६ रोजी च्या जि प सर्वसाधारण सभेचे इतिवृत अद्याप अंतिम झाले नसल्याने आजच्या जि.प. सर्वसाधारण सभेमध्ये सादर करण्यात आलेले नाही. पुढील जि प सर्वसाधारण सभेमध्ये सदर इतिवृत्त सन्माननीय सभागृहाचे मान्यतेसाठी सादर करण्याची नोंद घेण्यात यावी.

सभापती पं.स.निलंगा :- आजच्या जि.प.सर्वसाधारण सभेत मागील सभेचे इतिवृत्त सादर झालेले नाही. मागील बैठकिचे इतिवृत्त सभागृहा समोर सादर करण्यात आलेले नाही असा माझा अरोप आहे. दिनांक १३/०८/२०२६ रोजीची विशेष सर्वसाधारण सभा आयोजीत करण्याचा उदेश काय होता.

सन्मा.सदस्य श्री.बिरादार तानाजी विनायक :- विषय पत्रिकेवरील विषयानुसार जि प सर्वसाधारण सभेचे कामकाज चालविण्यात यावे सन्माननीय सभापती महोदयांनी नमूद केलेला विषय पत्रिकेवर आहे का.

सन्मा.सदस्य श्री गुंडरे प्रफुलचंद्र निवृत्तीराव :- जि प सर्वसाधारण सभेचे इतिवृत सभागृहाचे मान्यतेस सादर नसल्यास जि.प. सर्वसाधारण सभा आयोजनाचा हेतू काय आहे. काल झालेल्या जल व्यवस्थापन समिती बैठकीत देखील सदर विषय सभागृहाचे निदर्शनास आणून दिला आहे. बैठकीचे इतिवृत वेळेत दिले जात नाही. इतिवृत अद्याप पर्यंत का अंतिम झाले नाही याबाबत सचिवांनी सभागृहास सांगावे. १५ वा व १६ वा वित्त आयोग अंतर्गत कोणती कामे घेण्यात आली याची सभागृहात माहिती देणे आवश्यक आहे. प्रत्येकच बैठकीमध्ये बैठकीचे इतिवृत हे बैठकीवेळी सभागृहासमोर सादर केले जाते. सन्मा.सदस्यांना बैठकीचे इतिवृत किती दिवसाचे आत देणे आवश्यक आहे. मागील बैठकीचे इतिवृत अंतिम झालेले नसल्यास आजची जि प सर्वसाधारण सभा तहकूब करून मागील बैठकीचे इतिवृत सभागृहासमोर सादर केल्यानंतरच सभा घेण्यात यावी. कुठल्याही बैठकीचे इतिवृत वेळेवर दिले जात नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिलेल्या निर्देशांचे संबंधित विभाग प्रमुखांनी नोंद घ्यावी. परंतु आज जो सभागृहाचा वेळ जात आहे सन्मा.सदस्यांची जी दिशाभूल केली जात आहे त्याबाबत काय कार्यवाही केली जाणार आहे. याची जबाबदारी कोणाची आहे.

मा.अध्यक्ष महोदया :- मागील जि प सर्वसाधारण सभेचे इतिवृत अद्याप अंतिम झालेले नसल्याने पुढील आगामी जि.प. सर्वसाधारण सभेत दिनांक १३.०८.२०२६ रोजी झालेल्या जि.प. सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त सभागृहाचे मंजुरीसाठी सादर करण्याची विभागाने नोंद घ्यावी.

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी :- सदर विषय काल झालेल्या जल व्यवस्थापन समिती बैठकीत देखील उपस्थित झाला होता. जिल्हा परिषद अंतर्गत विविध विषय समिती बैठकांचे इतिवृत लिहिण्यासाठी संबंधित सचिवांनी आवश्यकते प्रमाणे लघुलेखकाना साहय करण्यासाठी तीन ते चार लिपिक वर्गीय कर्मचारी यांची नियुक्ती करावी. किमान 4 लिपिक वर्गीय कर्मचा-यांचे आदेश करून बैठक संपन्न झाल्यानंतर पुढील चार ते पाच दिवसात त्यांच्याकडून केवळ इतिवृत अंतिम करून घेण्याचेच काम करावे व बैठकीचे इतिवृत अंतिम करावे. तसेच बैठकांच्या इतिवृत हे जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर देखील प्रसिद्ध करण्यात यावे.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सचिव :- मागील जि.प. सर्वसाधारण सभा ही १३.०८.२०२६ रोजी झालेली असून या आजच्या जि.प. सर्वसाधारण बैठकीचे नोटीस ही दिनांक 4 सप्टेंबर रोजी काढण्यात आली होती. दरम्यानच्या काळात कार्यालयीन कामाचे दिवस व सार्वजनीक सट्ट्या असल्याने इतिवृत्त अंतिम करण्यास विलंब झालेला आहे. तथापि यापुढे जि.प. सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वेळेत सर्व सन्मा.जि.प. सदस्यांना देण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

सन्मा.सदस्या श्रीमती गुट्टे प्रतीक्षा भागवत :- प्रत्येक बैठकीतच हा विषय असून बैठकीच्या एक-दोन दिवस अगोदर बैठकीचे इतिवृत्त दिले जाते. त्याचे अवलोकन करण्यास वेळ जातो तसेच सन्मा.अध्यक्ष महोदया यांनी प्रत्येक बैठकीमध्येच पुढील बैठकीमध्ये योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देश देतात परंतु त्याप्रमाणे कारवाई का केली जात नाही.

मा.अध्यक्ष महोदया :- काल झालेल्या जल व्यवस्थापन समिती बैठकीमध्ये मी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चर्चा करून सर्वच विभागांना सक्तनिर्देश दिले आहेत. मागील बैठकीचे इतिवृत हे किमान सात दिवस अगोदर सन्माननीय सदस्यांना उपलब्ध करून दिले जावे.

सन्मा.सदस्य श्री.सुभाष पांडूरंग पवार :- जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेमध्ये प्रशासक कालावधी संपून व नवीन पदाधिकारी येवून आज आठ महिन्यांचा कालावधी झालेला आहे परंतु अद्यापही कुठलीही विकासाची कामे ग्रामीण भागात सुरू झालेली नाहीत. ज्या बैठका होतात त्यांचे इतिवृत वेळेवर दिले जात नाहीत हा विषय गांभीर्याने घेणे आवश्यक आहे. मा.अध्यक्ष महोदयांनी याबाबत रुलींग दिले असल्याने याबाबत नोंदघेवून पुढील विषय घेण्यात यावा.

सन्मा.सदस्य श्री.दिलीपकुमार मारोती मटके :-आजच्या बैठकीच्या विषय पत्रिकेवर विषय नसून मी सभागृहाची माफी व मा.अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने एक विषय सभागृहामध्ये सादर करत आहे. परवा जिल्हा परिषद अध्यक्षांच्या निवासस्थानी चोरीची घटना घडली व त्या ठिकाणी काही रोख रक्कम व ऐवज चोरी झाले. सदर घटनेमुळे जिल्हा परिषदेची मोठी बदनामी झाली असून जिल्हा परिषद अध्यक्षांचेच निवासस्थान सुरक्षित नसल्यास इतरांचे काय असा प्रश्न निर्माण होत आहे. मा.अध्यक्षांच्या निवासस्थानासाठी काही सुरक्षारक्षक यांची नियुक्ती केली होती का. मग लोकप्रतिनिधींना या सुविधा का पुरविल्या जात नाहीत. मा.अध्यक्ष, उपाध्यक्ष महोदय यांचे दालन अद्यापही तयार झालेले नाही मागील कालावधीत काही दालनाच्या निवासस्थानाच्या दुरुस्तीचे काम झाल्याचे ऐकले होते. मग त्यावेळी या कामांमध्ये मा.अध्यक्षांच्या निवासस्थानी सीसीटीव्ही बसविण्याची काही तरतूद केलेली नव्हती का. मा.अध्यक्ष महोदयानी निवासस्थानी सीसीटीव्ही बसविण्याबाबत लेखी निवेदन देऊन देखील सीसीटीव्ही बसविले गेले नाहीत.यामुळे मी सभागृहाच्या वतीने प्रशासनाच्या निषेधाचा ठराव मांडतो असून त्यास सर्व सभागृहाने अनुमोदन द्यावे ही विनंती. जी घटना झाली त्यास जे कोणी जबाबदार असतील त्याच्यावर आपण काय कारवाई करणार आहात याचा खुलासा करावा.

सन्मा.सदस्या श्रीमती आशा शिवाजीराव भिसे :- आताच सन्माननीय सदस्यांनी जो ठराव मांडला आहे त्यास मी अनुमोदन देते. संपूर्ण राज्यामध्ये लातूर जिल्हा परिषदेची बदनामी झाली आहे विविध वृतपत्रांमध्ये बातम्या फिरत आहेत. यांचे कोणालाही गांभीर्य दिसून येत नाही. मा.अध्यक्षांनी मागणी करूनही सीसीटीव्ही बसविले गेले नसतील तर हे चुकीचे आहे.

सन्मा.सदस्य श्री.शेरे रामलिंग शेषेराव :- राज्यमंत्री दर्जा असलेल्या सन्मा.जि.प. अध्यक्ष महोदया आहेत आणि त्यांच्या निवासस्थानाची सुरक्षा ही रामभरोसे असल्याचे दिसून येत आहे. सदर ठरावास माझे अनुमोदन आहे. मा.अध्यक्ष महोदय यांनी माहे जुन-२०२६ मध्ये विभागाकडे त्यांच्या निवासस्थानी सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे बाबत लेखी पत्र दिले होते. अध्यक्षांच्या शासकीय निवासस्थानी किती सुरक्षा कर्मचारी मंजूर आहेत ? घटनेच्या वेळी प्रत्यक्ष किती कर्मचारी कर्तव्यावर होते ? CCTV व्यवस्था होती का ? या प्रश्नांची उत्तरे सभागृहाला मिळाली पाहिजेत. मा.अध्यक्षांच्या शासकीय निवासस्थानाच्या सुरक्षेत झालेल्या त्रुटींची नेमकी जबाबदारी कोणाची आहे. निवासस्थान दुरुस्तीच्या अंदाजपत्रकामध्ये सीसीटीव्ही बसविण्याचे काम समाविष्ट केले होते किंवा कसे याची माहिती देण्यात यावी तसेच सीसीटीव्ही बसविण्याचे काम समाविष्ट केलेले नसल्यास ते का केले नाही याबाबत सभागृहात खुलासा करावा. या अनुषंगाने मी लेखी निवेदन सादर केले असून त्यावर काय कार्यवाही अनुसरण्यात आली याची माहिती द्यावी. (लेखी निवेदन)

मा. अध्यक्ष महोदया, जिल्हा परिषदेची सुरक्षा नेमकी कोणाच्या जबाबदारीची?

मा. अध्यक्ष महोदया, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी आणि सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्य, आज मी अत्यंत गंभीर विषय सभागृहाच्या निदर्शनास आणून देत आहे.

आपल्या जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांच्या शासकीय निवासस्थानी भरदिवसा चोरीची घटना घडली. या घटनेचा गुन्हेगारी तपास पोलीस यंत्रणा करेल आणि त्याबाबत आपण कोणताही पूर्वनिष्कर्ष काढू नये. मात्र या घटनेमुळे एक अत्यंत महत्त्वाचा प्रशासकीय आणि सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांचे शासकीय निवासस्थानच सुरक्षित नसेल, तर सामान्य नागरिकांनी या व्यवस्थेकडून सुरक्षेची काय अपेक्षा ठेवायची?

माझा प्रश्न आहे—अध्यक्षांच्या शासकीय निवासस्थानी किती सुरक्षा कर्मचारी मंजूर आहेत? घटनेच्या वेळी प्रत्यक्ष किती कर्मचारी कर्तव्यावर होते? CCTV व्यवस्था होती का आणि ती कार्यरत होती का? येणा-या-जाणा-यांची नोंद ठेवण्याची व्यवस्था आहे का? सुरक्षा व्यवस्थेचे शेवटचे परीक्षण कधी झाले?

या प्रश्नांची उत्तरे सभागृहाला मिळाली पाहिजेत.

मा. अध्यक्ष महोदया, हा विषय कोणावर राजकीय आरोप करण्याचा नाही. उलट आपल्या जिल्हा परिषदेच्या सर्वोच्च पदाचा सन्मान आणि सुरक्षितता जपण्याचा आहे. प्रशासनातील त्रुटी असतील तर त्या मान्य करून त्या तातडीने दुरुस्त केल्या पाहिजेत. म्हणून मी सभागृहाच्या माध्यमातून मागणी करतो की, अध्यक्ष, उपाध्यक्ष व संबंधित पदाधिका-यांची शासकीय निवासस्थाने तसेच जिल्हा परिषद मुख्यालयाचे तातडीने Security Audit करण्यात यावे. CCTV, सुरक्षा रक्षक, प्रवेश नियंत्रण, अभ्यागत नोंदवही आणि इतर आवश्यक सुरक्षा उपायांची तपासणी करण्यात यावी.

तसेच या घटनेच्या अनुषंगाने प्रशासनाने केलेल्या कार्यवाहीचा स्वतंत्र अहवाल सभागृहासमोर ठेवावा. कुठे प्रशासकीय त्रुटी आढळल्यास जबाबदारी निश्चित करून आवश्यक सुधारात्मक कार्यवाही करण्यात यावी आणि शेवटी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदयांना माझा एकच स्पष्ट प्रश्न आहे.

"अध्यक्षांच्या शासकीय निवासस्थानाच्या सुरक्षेत नेमकी कोणती त्रुटी होती, त्याची जबाबदारी कोणाची होती आणि भविष्यात अशी घटना पुन्हा घडू नये म्हणून प्रशासन आजपासून कोणत्या ठोस उपाययोजना करणार आहे?"

या प्रश्नाचे केवळ तोंडी आश्वासन नको; लेखी उत्तर आणि कालबद्ध कार्यवाही सभागृहाला हवी आहे.
कारण अध्यक्षांची सुरक्षा हा केवळ एका व्यक्तीचा विषय नाही; तो आपल्या जिल्हा परिषदेच्या प्रतिष्ठेचा, प्रशासनाच्या जबाबदारीचा आणि या संस्थेवरील जनतेच्या विश्वासाचा विषय आहे.
धन्यवाद.

सन्मा.सदस्या श्रीमती आशा शिवाजीराव भिसे :- जे सुरक्षा रक्षक नियुक्त केलेले आहेत त्यांच्या नियुक्तीचे निकष तसेच नियुक्तीचा वयोगट काय असणे अपेक्षित आहेत याची माहिती यावी.

सन्मा.सदस्य श्री.बिरादार तानाजी विनायक :- मा.अध्यक्ष हे एका घटनात्मक पदावर असून कालची घटना ही अत्यंत दुर्दैवी आहे. निषेधाच्या ठरावा बरोबरच सदर घटनेस जबाबदार कोण आहेत अशा अधिकारी कर्मचा-यांवर निलंबनाची कार्यवाही करण्यात यावी. पूर्ण महाराष्ट्रभर या विषयाची चर्चा झालेली असून हा जिल्हा परिषदेसाठी अत्यंत अवमानकारक बाब आहे. तेव्हा जे जबाबदार अधिकारी कर्मचारी असतील त्यांचे निलंबन आजच्या तारखेत झाले पाहिजे.

सन्मा.सदस्य श्री गुंडरे प्रफुलचंद्र निवृत्तीराव :- सदर घटनेस जबाबदार कोण आहेत मा.अध्यक्षांनी लेखी पत्र देऊनही त्यावर कार्यवाही का झाली नाही. या दिरंगाईस, निष्काळजी पणास कोणीतरी जबाबदार असेल. बांधकाम विभाग अंतर्गत शाखा अभियंता, कनिष्ठ अभियंता, कार्यकारी अभियंता, उपअभियंता किंवा त्यांचे वरीष्ठ अधिकारी जे कोणी जबाबदार आहेत त्यांच्यावर प्रशासकीय कारवाई करणे आवश्यक आहे. सदर कामाच्या निविदेची Tender Accepting authority कोण आहेत.

सन्मा.सदस्या श्रीमती सोनाली रमेश थोरमोटे :- प्रशासक कार्यकाळ संपून जिल्हा परिषद मध्ये लोकनियुक्त पदाधिकारी येवून ८ महिने झाले आहेत. त्यातही एक महिला जिल्हा परिषद अध्यक्ष असतांना त्यांचे निवासस्थान सुरक्षित नसेल तर सामान्य नागरिकांचे काय असा प्रश्न निर्माण होत आहे.

सन्मा.सदस्य श्री.नागराळे अश्विन धोंडीराम :- माननीय अध्यक्ष महोदयांनी लेखी निवेदन दिले होते. परंतु मा.अध्यक्ष महोदयांनी त्यांच्या निवासस्थानी सी.सी.टी.व्ही. बसविण्याचे निवेदन देण्याची वेळच का आली. निवेदन देण्यापुर्वीच योग्य ती कार्यवाही का झाली नाही. याची माहिती सभागृहाला यावी. तसेच निवेदनावर पुढे काय कार्यवाही झाली.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सचिव :- सदर विषयाबाबत सविस्तर माहिती बांधकाम विभाग देऊ शकतो. का.अ. (बांध) यांना सूचित करण्यात येते की त्यांनी सन्मा.सदस्यांनी नमूद केलेल्या विषयाची माहिती सभागृहास द्यावी.

सन्मा.सदस्य श्री.दिलीपकुमार मारोती मटके :- केवळ कार्यकारी अभियंता सदर घटनेस जबाबदार नसून त्यांचे वरीष्ठ ही जबाबदार असतील.

सन्मा.सदस्य श्री.मस्के महादेव प्रभाकर :- सदरची सर्व जबाबदारी ही उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.) यांची असून बांधकाम विभागास निवासस्थान दुरुस्ती अनुषंगाने निधीची तरतुद सा.प्र.वि. मार्फत केली गेली असणार त्यामुळे बांधकाम विभागाची जबाबदारी आहे असे बोलणे चुकीचे आहे.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सचिव :- मा. अध्यक्ष महोदयांनी लेखी निवेदनाद्वारे सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे बाबत मागणी केलेली असली तरी मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष, तसेच सन्मा.पदाधिकारी यांचे निवासस्थान दुरुस्तीची सर्व कामे बांधकाम विभागाद्वारेच केली जातात याची कृपया सर्व सन्मा.सदस्यांनी नोंद घ्यावी. सचिव म्हणून जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेचे कामकाज चालविणे ही उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांची जबाबदारी असून सामान्य प्रशासन विभागाकडे जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत सर्व विभागातील अधिकारी कर्मचारी यांच्या आस्थापना विषयक बाबींचे कामकाज जसे पदोन्नती, निलंबन, शास्ती इ. ज्याप्रमाणे जिल्हा परिषद अंतर्गत आरोग्य विभागाशी संबंधित कामकाज करण्यासाठी जिल्हा आरोग्य अधिकारी असतात त्याचप्रमाणे बांधकाम, कृषी व त्या त्या विभागाचे कामकाज करण्यासाठी संबंधित खाते प्रमुख जबाबदार राहतात. या सर्व विभागाच्या आस्थापना विषयक बाबींच्या संचिका वगळता इतर कुठलेही विकास कामाच्या संचिका सा.प्र.वि. कडे येत नाहीत. त्यामुळे सन्माननीय सभागृहास नम्रपणे अवगत करण्यात येते की सीसीटीव्ही व निवासस्थान येथे अनुषंगिक कामे करण्याची जबाबदारी ही बांधकाम विभागाची आहे.

सन्मा.सदस्य श्री गुंडरे प्रफुलचंद्र निवृत्तीराव :- सदरचे कामकाज हे बांधकाम विभागाशी संबंधित असले तरी बांधकाम विभागावर कोणाचे नियंत्रण आहे याची माहिती द्यावी. बांधकाम विभागाच्या कामकाजाचा आढावा घेण्याची जबाबदारी कोणाची आहे.

सन्मा.सदस्य श्री.गायकवाड माणिक दौलतराव :- या संदर्भात निवासस्थान येथे दुरुस्ती व इतर अनुषंगिक कामे करत असताना टप्पे पाडून करण्यात आलेले असून त्यातही सीसीटीव्ही कॅमे-याचे काम समाविष्ट होते का याची माहिती देण्यात यावी. सदर विषय सामान्य प्रशासनाचा नसला तरी जिल्हा परिषद अंतर्गत विविध विकास कामांच्या विषयांना मंजुरी देण्याचे काम सामान्य प्रशासन विभागाद्वारेच केले जाते.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सचिव :- जिल्हा परिषद अंतर्गत विविध विकास कामांच्या मान्यता ह्या जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेद्वारे दिल्या जातात. सदर निवासस्थान दुरुस्ती अनुषंगाने कामाचे प्रशासकीय मान्यता. तसेच दुरुस्ती करण्यात येणा-या बाबी याविषयीची माहिती ही बांधकाम विभागाकडे उपलब्ध असून का.अ. (बांध) यांनी सदर माहिती देणे अपेक्षित आहे

सन्मा.सदस्य श्री.शेळके संदिपान अनिरुद्ध :- मा.अध्यक्ष महोदया यांच्या निवासस्थानी झालेली चोरीची घटना हा विषय अतिशय महत्वाचा आहे. तसेच उद्या लातूर जिल्ह्यामध्ये मा.मुख्यमंत्री महोदय दुष्काळ पाहणी दौ-यावर येणार असून या विषयावर देखील आजच्या बैठकीत चर्चा होणे अत्यंत आवश्यक आहे. लोकांना दुष्काळाच्या अत्यंत तीव्र झळा लागत आहेत. ग्रामीण भागात पीण्याच्या पाण्याचा तसेच जनावरांच्या चा-याचे संकट निर्माण झाले असून या विषयावर आजच्या जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेमध्ये चर्चा होणे आवश्यक आहे. दुष्काळी परिस्थिती अनुषंगाने विविध धोरणात्मक निर्णय घेणे आज आवश्यक आहे.

सन्मा.सदस्या श्रीमती सोनाली रमेश थोरमोटे :- सदर विषय केवळ मा.अध्यक्षांचा नसून हा त्या पदाच्या गरीमेचा विषय आहे. एक महिला जिल्हा परिषदेची अध्यक्ष असताना त्यांच्या निवासस्थानी आवश्यक सुविधा पुरविणे ही जबाबदारी कोणाची आहे. दुष्काळी परिस्थितीवर देखील चर्चा झाल्याशिवाय आजची जिल्हा परिषद

सर्वसाधारण सभा संपन्न होणार नाही. परंतु मा.अध्यक्षांच्या निवासस्थानी झालेल्या चोरीसाठी जबाबदार असणा-या अधिकारी-कर्मचारी यांच्यावर देखील कार्यवाही होणे आवश्यक आहे.

मा.अध्यक्ष महोदया :- एक महिला जिल्हा परिषदेची अध्यक्ष असतांना सन्मा.सदस्य श्री.शेळके आपणास अध्यक्षांच्या निवासस्थानी झालेल्या चोरीचा विषय का महत्वाचा वाटत नाही. या पदाची गरिमा राखली गेली नाही.

सन्मा.सदस्य श्री.होरे चंद्रकांत विठ्ठलराव :-जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेमध्ये एखादा विषयावर चर्चा सुरुवात असताना त्या विषयावरील चर्चा पूर्ण झाल्याशिवाय परत पुढील विषय चर्चेसाठी घेतला जाऊ नये असा देखील ठराव घेण्याची वेळ आली आहे असे माझे मत आहे. मा.अध्यक्षांच्या निवासस्थानी झालेल्या चोरीच्या संदर्भातील विषयावर चर्चा पूर्ण झाल्यानंतरच सन्मा.सदस्यांनी नमूद केल्याप्रमाणे दुष्काळाच्या संदर्भातील विषय घेण्यात यावा.

सन्मा.सदस्य श्री.शेरे रामलिंग शेषेराव :- मा.अध्यक्षांच्या निवासस्थानी शासन नियमानुसार काय काय सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे याबाबत माहिती देण्यात यावी. त्यासाठी जिल्हा परिषद अधिनियमातील नियम, शासन निर्णय याची माहिती देण्यात यावी. मा.अध्यक्ष महोदयांसाठी मंजूर असलेल्या कर्मचा-यांची व परिचर संवर्गीय कर्मचा-यांची निश्चित संख्या सांगण्यात यावी.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सचिव :- मा.अध्यक्ष महोदय यांना त्यांचे शासकीय कामकाज पाडण्यासाठी प्रशासनामार्फत शासकीय वाहन, वाहन चालक लघुलेखक व क्लर्क, प्रत्येक वर्षी प्रवासासाठी ६००० लिटर इंधन दिले जाते, त्याचबरोबर त्यांना शासकीय निवासस्थान उपलब्ध करून दिले जाते. निवासस्थानासाठी परिचर दिला जातो. मा.अध्यक्ष महोदयांच्या निर्देशानुसार वेळोवेळी परिचर देण्यात आलेले आहेत. बांधकाम विभागाने मा.अध्यक्ष महोदय यांच्या निवासस्थानी किती सुरक्षारक्षक पुरविले आहेत याची सभागृहास माहिती यावी.

कार्यकारी अभियंता (बांध.) :- सुरक्षा रक्षकाची निविदा ही मागील वर्षी जी प्रसिद्ध करण्यात आली होती तीच सुरू असून, मागील वर्षी मा.अध्यक्ष कार्यरत नसल्यामुळे अध्यक्षांच्या निवासस्थानी सुरक्षारक्षकाची उपलब्धता केलेली नव्हती, त्यामुळे तीन सुरक्षारक्षक तीन शिफ्ट मध्ये कार्यरत होते म्हणजे एकूण नऊ सुरक्षारक्षक कार्यरत होते. आपण त्या ठिकाणी एक सुरक्षा रक्षक नियुक्त केला होता परंतु संबंधिताच्या कामकाजाबाबत तक्रारी आल्याने, दुसरा सुरक्षारक्षक नियुक्त करण्याची कार्यवाही सुरू होती तसेच नवीन निविदा प्रसिद्ध करण्यासाठी ची संचिका देखील अंतिम टप्प्यात असून आजच लागू झालेल्या विधान परिषद निवडणुकांच्या आदर्श आचारसंहितेमुळे सदर कार्यवाही विधानपरिषद आचारसंहिता नंतर पूर्ण करण्यात येत आहे. ज्या ज्यावेळी मा.अध्यक्ष महोदयांकडून सुरक्षारक्षका बाबत तक्रार प्राप्त झाली आपण संबंधित आउटसोर्सिंग एजन्सीच्या प्रतिनिधींना याबाबत कळविले असून मा.अध्यक्ष यांच्या निवासस्थानी चांगला व्यक्ती नियुक्त करण्याची सूचना केली आहे.

सन्मा.सदस्य श्री.शेरे रामलिंग शेषेराव :- सुरक्षा रक्षकांची निविदा प्रसिद्ध करत असताना त्यांच्या वयोमर्यादेबाबत काही निकष असतील. ७० वर्ष वयाचा सुरक्षा रक्षक निवासस्थानाची काय सुरक्षा करणार. आज जिल्हा परिषदेमध्ये पदाधिकारी येऊन सात ते आठ महिन्यांचा कालावधी झालेला असताना मा.अध्यक्षांचे निवासस्थानी सुरक्षारक्षक देखील पुरविले जात नाहीत ही गंभीर बाब आहे.

सन्मा.सदस्या श्रीमती आशा शिवाजीराव भिसे :- आत्ताच कार्यकारी अभियंता यांनी केवळ तीनच सुरक्षा रक्षक यांची नियुक्ती केल्याचे नमूद केले. एकीकडे आपण सभागृहाच्या दुरुस्तीसाठी कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च केला आहे. मग जिल्हा परिषद निवडणूकीनंतर लोकनियुक्त पदाधिकारी, सदस्य येणार आहेत याचा विचार करून जास्तीचे सुरक्षा रक्षक का घेतले नाही. कोट्यवधी रुपयाच्या कामाच्या निविदा आठ दिवसात प्रसिद्धी होतात मग सुरक्षारक्षकाचे नियुक्तीची निविदा प्रसिद्ध होण्यास एवढा कालावधी लागण्याचे कारण काय.

मा.अध्यक्षांच्या निवासस्थानी सीसीटीव्ही बसविण्याबाबतचा मा.अध्यक्षांचा अर्ज आपल्या विभागाकडे कधी प्राप्त झाला त्यावर आपण किती दिवसात कार्यवाही केली तसेच अध्यक्षांच्या निवासस्थानाच्या दुरुस्तीच्या अंदाजपत्रकामध्ये सीसीटीव्ही का घेतली गेली नाही याचीही माहिती मिळणे आवश्यक आहे.

कार्यकारी अभियंता (बांध.) :- दिनांक ३०.०६.२०२६ रोजी मा.अध्यक्ष महोदयांनी त्यांचे निवासस्थानी सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्यासाठीचे पत्र दिले होते परंतु सबंधित कर्मचारी एस.आय.आर. अनुषंगाने कामकाजात असल्यामुळे पत्र टपालातच प्रलंबित राहिले व दिनांक ०४.०९.२०२६ रोजी विभागास प्राप्त झाले. विभागाकडे सदरचे पत्र प्राप्त होताच आपण मा.अध्यक्षांच्या निवासस्थानी सीसीटीव्ही बसविण्यासाठी रु.६.०० लक्ष चे अंदाजपत्रक तयार करून, कालच्या विषय समिती बैठकीमध्ये प्रशासकीय मान्यतेसाठी देखील प्रस्तावित केले आहे.

सन्मा.सदस्या श्रीमती आशा शिवाजीराव भिसे :- मा.अध्यक्ष महोदयांनी तीन महिन्यापूर्वी आपल्या विभागाकडे पत्र दिलेले असताना आपण तीन महिने विलंबाने त्यावर कार्यवाही केली यास जबाबदार कोण आहे. तसेच सुरक्षा रक्षक पुरविणा-या एजन्सीची मुदत लवकरच संपणार असून त्यापूर्वीच नवीन निविदा अनुषंगाने कार्यवाही का अनुसरण्यात आली नाही.

सन्मा.सदस्या श्रीमती सोनाली रमेश थोरमोटे :- सर्व अधिकारी यांना ज्ञात होते माहे जानेवारी-फेब्रुवारी मध्ये जिल्हा परिषद निवडणुकांचा कार्यक्रम संपन्न झालेला आहे. आपल्याकडे पदाधिकारी येणार आहेत मग त्यापूर्वीच या बाबींची तजवीज का केली गेली नाही. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे निवासस्थानी किती सुरक्षारक्षक आहेत त्यांची नियुक्ती कधी करण्यात आलेली आहे व त्यांचा वयोगट काय आहे याचीही माहिती देण्यात यावी.

सन्मा.सदस्य श्री गुंडरे प्रफुलचंद्र निवृत्तीराव :- सुरक्षा रक्षक नियुक्तीसाठी काढण्यात आलेल्या निविदेच्या अटी व शर्ती मध्ये सुरक्षारक्षकाच्या नियुक्तीचे काय निकष आहेत त्यांचा वयोगट काय आहे याचीही माहिती सभागृहाला द्यावी. ७० वर्षाचा सुरक्षा रक्षक का देण्यात आला. जर सुरक्षा रक्षक एजन्सी ने ७० वर्षाचा सुरक्षारक्षक दिला असेल तर तो विभागाने का स्वीकारला.

कार्यकारी अभियंता (बांध.) :- माहे जुन-२०२६ मध्ये जुन्या निविदेची मुदत संपली व नवीन निविदा पूर्ण होण्याच्या कालावधीपर्यंत संबंधितास मुदतवाढ दिली गेली. त्यामुळे संबंधित एजन्सीवर कार्यवाही करता आली नाही त्यांनाच विनंती करून एक अतिरिक्त सुरक्षारक्षक मा.अध्यक्ष महोदय यांचे निवासस्थानी दिला.

सन्मा.सदस्या श्रीम. सोनकांबळे उषा गोविंद :- सुरक्षा रक्षक एजन्सी द्वारा आपण सुरक्षारक्षक घेतो त्यांना वेळेवर त्यांचे वेतन अदा केले जात नाही त्यामुळे असे वयोवृद्ध लोक देतात.

सन्मा.सदस्य श्री.शेरे रामलिंग शेषेराव :- सदरची जी घटना घडली आहे या घटनेस जे दोषी आहेत त्यावर आपण निश्चित काय कारवाई करणार आहेत याबाबत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सभागृहास माहिती द्यावी.

मा.सभापती, पं.स. निलंगा :- या चोरीच्या प्रकरणांमध्ये प्रशासनाची अत्यंत दिरंगाई निदर्शनास आली असून यास जबाबदार असणा-या अधिकारी कर्मचारी यांचे विरुद्ध प्रशासकीय कारवाई करण्यात यावी.

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी :- सदर घटनेच्या बाबतीत घटनेची माहिती माहिती समजताच मी घटनास्थळी स्वतः पाहणी करून आलो. तसेच जिल्हा पोलीस अधीक्षक महोदयांना देखील मी व्यक्तीशः फोनवरून सदर प्रकरणाचा तपास तातडीने करण्याबाबत देखील सांगितले आहे. व जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी फोनवरून बोलल्यानंतर त्यांनी तात्काळ त्यांचे तपासणी पथक घटनास्थळी पाठवून स्थानिक गुन्हे शाखेद्वारा तपास देखील सुरू करण्यात आलेला आहे. भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी ज्या काही उपाययोजना करणे आवश्यक आहे याची मी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी कार्यकारी (साप्र),

कार्यकारी अभियंता बांधकाम यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन पाहणी करून संबंधितांना आवश्यक त्या सूचना दिलेल्या आहेत.

सन्मा.सदस्य श्री.दिलीपकुमार मारोती मटके :- घटना घडल्यानंतर जी कार्यवाही सुरु आहे त्याबाबत आमचं काही म्हणणे नसून घटना घडण्यामध्ये जो निष्काळजीपणा झाला त्यास जबाबदार असणा-या अधिकारी यांच्याविरुद्ध आपण काय कार्यवाही करणार आहेत याची माहिती सभागृहास द्यावी. कनिष्ठ कर्मचारी काम करत नसेल तर त्यावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी कोणाची आहे.

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी :- घटना घडण्यास जबाबदार असणा-या अधिकारी कर्मचा-यांच्या विरुद्ध योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करण्याबाबत मा.अध्यक्ष महोदयांना कालच आश्वासन दिलेले आहे. तसेच मा.अध्यक्ष महोदयांच्या सूचनानुसार त्या ठिकाणी सुरक्षा रक्षकासाठी एक खोली त्याच बरोबर मागील बाजू संरक्षण भिंत व इतर उपाययोजना करण्यात येत आहेत.

सन्मा.सदस्य श्री. उमापूरे उमाजी रामराव :- पूर्वी जी घटना घडली आहे त्यास जबाबदार दोषींविरुद्ध आपण काय कारवाई करणार आहेत ते सांगावे. नंतरचे काय प्रयोजन केलेले आहे हे सांगू नये. सभागृहाचा वेळ विनाकारण घेऊ नये दुष्काळासारख्या महत्वाच्या विषयावर देखील सभागृहात चर्चा करायची असून घटना घडण्यास जबाबदार असणा-या दोषी अधिकारी कर्मचारी यांच्या विरुद्ध काय कार्यवाही करण्यात येणार आहे याची माहिती द्यावी. कार्यकारी अभियंता श्री कुलकर्णी जबाबदार आहेत की कुलकर्णी साहेबांच्या वर असलेले अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री तडवी हे जबाबदार आहेत ते सभागृहास सांगावे.

अति.मुख्य कार्यकारी अधिकारी :- आताच का.अ. (बांध.) यांनी सीसीटीव्ही कॅमेरा संदर्भातील विषय नमूद केला आपण प्रत्येक वर्षी प्रत्येक विभागाला निधीची तरतूद करून देतो. प्रत्येक विभागाला मंजूर केलेली तरतूद ही त्या त्या विभागाने त्यांच्या विभागाच्या अत्यावश्यक कामासाठी निश्चित करून त्याप्रमाणे कामांच्या प्रशासकीय मान्यता त्यांच्या विषय समितीमध्ये मंजुरीसाठी सादर करणे आवश्यक आहे. सीसीटीव्ही चे काम विषय समितीमध्ये विषय ठेवून त्यास मंजुरी घेऊन काम सुरू करणे हे विषय समिती व संबंधित विषय समितीच्या सचिवांचे काम आहे. सदर विषय का.अ. (बांध.) यांनी विषय समिती सभापती यांचे निदर्शनास आणून देऊन तातडीने त्यास मंजुरी घेणे आवश्यक होते.

सन्मा.सदस्य श्री.दिलीपकुमार मारोती मटके :- मा.अध्यक्ष महोदयांनी सात महिन्यांपासून पत्र देऊन ही कार्यकारी अभियंता (बांध) यांनी जर काम केले नसेल तर त्यांच्यावर नियंत्रण कोणाचे आहे. अति.मु.का.अ. म्हणून आपण आपल्या अधिनिस्त असलेल्या खाते प्रमुखांचा आढावा घेत असताना या बाबींचा आढावा का घेतला नाही. आपल्याकडे जे पदाधिकारी आहेत त्यांच्याकडे सुरक्षा रक्षक आहेत का त्या ठिकाणी त्यांच्या निवासस्थानी आवश्यक सुविधा आहेत का याचा तुम्ही आढावा का घेतला नाही. खाते प्रमुख चर्चा करत नसतील तर तुमचे काम आहे खाते प्रमुखांना याबाबत सूचना करणे. जर त्यांनी काम केले नसेल तर मग आपली काय जबाबदारी आहे व आपल्या पदाची काय गरज आहे.

अति.मुख्य कार्यकारी अधिकारी :- सदर विषय का.अ. (बांध) यांनी माझे निदर्शनास आणून दिला असता तर मी त्याबाबतचा आढावा घेऊन तात्काळ सदर काम करण्याबाबत सूचना दिल्या असत्या. विषय समितीमध्ये विषय सादर करून विषय समितीची मान्यता घेण्याची जबाबदारी का.अ. (बांध) यांची आहे. आताच मा.मु.का.अ. यांनी सांगितल्यानुसार सदर घटनेस जबाबदार असणा-या अधिकारी कर्मचारी यांच्याविरुद्ध जबाबदारी निश्चित करण्यात येणार असून दोषींविरुद्ध योग्य ती प्रशासकीय कारवाई अनुसरण्यात येईल.

सन्मा.सदस्य श्री.दिलीपकुमार मारोती मटके :- एखादा चुकीचा प्रस्ताव खाते प्रमुखांकडून अति.मु.का.अ. यांचेकडे सादर केल्यास आपण तो मान्य करणार का ? सदर प्रस्ताव तपासण्याची आपली जबाबदारी नाही का. का.अ. (बांध) यांची जबाबदारी आहे असे कसे म्हणता येईल. घटना घडली त्यादिवशी मा.अध्यक्ष महोदया

त्यांचे निवासस्थानी असत्या तर त्याचे आणखी काही गंभीर परिणाम झाले असते याचा काहीच विचार केला गेला नाही. त्यास जबाबदार कोण असते.

सन्मा.सदस्या श्रीमती माने शरयु संभाजी :- संबंधित अधिकारी यांच्याकडून कामे करण्यास दिरंगाई होत नसून आपण लवकर निवडून आलोत त्यामुळे कामे वेळेवर झालेली नाहीत असे म्हणण्याची वेळ आली आहे. त्यांनी सीसीटीव्ही बसवणारच होते परंतु चोरी आधी झाली. त्यामुळे नंतरचे न सांगता आधी सीसीटीव्ही का बसवले नाही व त्याला कोण जबाबदार आहे व आपण त्यांच्यावर काय कारवाई करणार आहेत ते सभागृहास सांगावे.

मा.सभापती, पं.स. शिरुर अनंतपाळ :- यामध्ये सभागृहाचा अधिक वेळ न जाता संबंधित जे जे दोषी अधिकारी कर्मचारी आहेत त्यांच्यावर तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

अति.मुख्य कार्यकारी अधिकारी :- सदर घटनेस जबाबदार असतील त्यांच्यावर योग्य ती प्रशासकीय कारवाई केली जाईल.

सन्मा.सदस्य श्री. उमापूरे उमाजी रामराव :- जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीवर आजच्या बैठकीत चर्चा होणे अत्यंत आवश्यक आहे. तेव्हा या विषयावर सभागृहाचा अधिक वेळ न घालवता घटनेस जबाबदार कोण आहेत ते सभागृहात स्पष्ट करावे सबंधितावर काय कार्यवाही करण्यात येणार आहे याची माहिती द्यावी व मगच पुढील विषय घेण्यात यावा. केवळ का.अ. (बांध) हे घटनेस जबाबदार आहेत किंवा त्यांचे वरीष्ठ म्हणून अति.मुख्य कार्यकारी अधिकारी जबाबदार आहेत ते सभागृहास सागांवे.

सन्मा.सदस्य श्री.दिलीपकुमार मारोती मटके :- जे जबाबदार म्हणजे कोण, त्यांची नावे सभागृहात सांगण्यात यावी. घटनेस का.अ. (बांध), अति.मुख्य कार्यकारी अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.) की मुख्य कार्यकारी अधिकारी जबाबदार असतील त्यांनी स्वतः सांगावे व स्वतःवर निलंबनाची कार्यवाही करून घ्यावी.

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी :- आताच अति.मु.का.अ. यांनी सांगितल्याप्रमाणे प्रत्येक विभागाला आवश्यक कामांकरिता आर्थिक तरतूद उपलब्ध करून दिली जाते. त्यानुसार बांधकाम विभागाने निवासस्थान दुरुस्ती, सी.सी.टी.व्ही. व इतर आवश्यक कामे त्यांच्या विषय समितीमध्ये मंजुरीसाठी सादर करून तात्काळ मंजूर करून घेऊन सुरू करणे अपेक्षित होते. ह्या सर्व बाबींचा योग्य विनियोजन करून आवश्यक ती कामे करणे ही त्या विभागाची व विषय समितीची जबाबदारी राहते. विषय समितीने एखादे काम करण्यासाठी ठराव घेऊन विहित प्रक्रियेद्वारे कामास मंजुरी दिलेली असून देखील काम सुरू झालेले नसल्यास ही त्या विभाग प्रमुखांची जबाबदारी राहते.

सन्मा.सदस्य श्री.पवार सुभाष पांडूरंग :- जिल्हा परिषद अंतर्गत काम करत असताना जबाबदारी नावाची कुठलीही गोष्ट राहिली नसल्याने सभागृहात येण्याची मानसिकता देखील राहिली नाही ही वस्तुस्थिती आहे. लिफ्ट बंद आहे ही जबाबदारी कोणाची आहे. कुठलाही विषय मार्गी लागला जात नसून सन्मा.सदस्यांना मूर्खात काढले जात आहे.

सन्मा.सदस्या श्रीमती आशा शिवाजीराव भिसे :- आताच मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितल्याप्रमाणे विषय समितीची जबाबदारी आहे. सन्मा.पदाधिकारी यांनी निवासस्थान पुरविणे, निवासस्थानाची दुरुस्ती करणे ही विषय समितीची जबाबदारी असते का याबाबत खुलासा करावा. जिल्हा परिषद इमारतीमधील लिफ्ट बंद आहे ही विषय समितीची जबाबदारी आहे का.

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी :- एखादे काम आवश्यक आहे व ते करणे आवश्यक आहे त्यास आर्थिक तरतूद उपलब्ध करून देऊन त्या कामाचा विहित ठराव विषय समितीमध्ये घेणे आवश्यक असते. व असा

ठराव झाल्यानंतर कामाची अंमलबजावणी करण्याचे काम हे त्या त्या विभाग प्रमुखाचे राहते. का.अ. (बांध.) यांनी सी.सी.टी.व्ही.चौ. मान्यता साठीचा प्रस्ताव विषय समितीमध्ये सादर केला होता का याबाबतची वस्तुस्थिती सभागृहाचे निदर्शनास आणून द्यावी.

सन्मा.सदस्या श्रीमती माने शरयु संभाजी :- सुरक्षारक्षक नियुक्ती करणा-या कंपनीवर आपण या घटनेनंतर काय कार्यवाही केली. त्या कंपनीला ब्लॅक लिस्ट मध्ये टाकले आहे का ? त्या कंपनीचे पोलीस व्हेरिफिकेशन झाले होते का. पोलीस व्हेरिफिकेशन करून घेण्याची जबाबदारी तरी बांधकाम विभागाची असेल.

कार्यकारी अभियंता (बांध.) :- संबंधित एजन्सीची मुदत ही माहे जुन-२०२६ मध्ये संपलेली आहे विभागाने त्यांना पुढील निविदा होईपर्यंत मुदत वाढ दिलेली असल्याने संबंधित कंपनीविरुद्ध कार्यवाही करता येणार नाही.

सन्मा.सदस्य श्री. उमापूरे उमाजी रामराव :- विषयाचे विषयांतर होत आहे घडलेल्या घटनेची जबाबदारी कोण घेणार व त्यांच्यावर काय कार्यवाही करण्यात येणार याची माहिती सभागृहास द्यावी. दोषींवर जबाबदारी निश्चित करून निलंबनाची कार्यवाही करावी व सभागृहाचे पुढील कामकाज सुरू करावे. कार्यकारी अभियंता यांनी उत्तर न देता त्यांचे वरिष्ठ अधिकारी यांनी उत्तर द्यावे. जर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सदर घटनेसाठी जबाबदार असतील तर त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करावी व सभेचे कामकाज सुरू करावे.

सन्मा.सदस्य श्री.दिलीपकुमार मारोती मटके :- आतापर्यंत विषय समितीच्या किती बैठका झाल्या याची माहिती द्यावी व विषय समितीच्या १ ल्या, दुस-या किंवा तिस-या बैठकीमध्येच मा.अध्यक्षांच्या निवासस्थानी सीसीटीव्ही बसविण्याचा विषय का घेतला गेला नाही. तोपर्यंत अति.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी याचा आढावा का घेतला नाही. ही त्यांची जबाबदारी आहे. आपल्या विभागांतर्गत जे जे विभाग आहेत त्या विभागांतर्गत च्या सभापतींचे निवासस्थानी आवश्यकत्या सोयी-सुविधा आहेत का व त्या सोयी सुविधेची कामे विषय समिती बैठकीमध्ये मंजूर झालेली आहेत का हे पाहणे अति.मुख्य कार्यकारी अधिकारी यांची जबाबदारी आहे. विषय समिती जर एखादा विषय घेतच नसेल तर तो निदर्शनास आणून देण्याची अति.मुख्य कार्यकारी अधिकारी यांची जबाबदारी आहे. आपण आपल्या विभाग प्रमुखांना तशा सूचना करणे आवश्यक होते. आपण प्रत्येक विषय कार्यकारी अभियंतावर ढकलत असून आपण काय केले याची माहिती द्यावी. आपण सात महिन्यांमध्ये आपल्या विभागाला सूचना का केल्या नाहीत.

अति.मुख्य कार्यकारी अधिकारी :- या संदर्भात कार्यकारी अभियंता बांधकाम यांनी सभागृहास अवगत करावे सदर निवेदन आपल्या विभागाकडे कधी प्राप्त झाले व आपण पुढे काय कार्यवाही केली.

सन्मा.सदस्य श्री. उमापूरे उमाजी रामराव :- कार्यकारी अभियंता यांची चूक झालेली आहे हे सभागृहाचे निदर्शनास आलेले आहे परंतु त्या विभागाचे विभाग वरीष्ठ विभागप्रमुख अति.मु.का.अ. आहेत व त्यांचे वरिष्ठ अधिकारी कोण आहेत.

सन्मा.सदस्या श्रीमती आशा शिवाजीराव भिसे :- विषय समितीने मा.पदाधिकारी यांना निवासस्थान द्यावे म्हणून ठराव घेणे अपेक्षित आहे का त्यांनी सांगायचे का. असा विषय समितीने ठराव करायचा असतो का याची माहिती द्यावी. निवासस्थान पुरवणे ही जर जिल्हा परिषदेची जबाबदारी असेल तर निवासस्थानाच्या ठिकाणी आवश्यक त्या सोयीसुविधा पुरवणे हे देखील जिल्हा परिषदेची जबाबदारी असून. यासाठी विषय समितीचा ठराव लागतो का याची माहिती द्यावी.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र) तथा सचिव :- सन्मा.पदाधिकारी यांना निवासस्थान सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी ही जिल्हा परिषदेची आहे.

सन्मा.सदस्या श्रीमती आशा शिवाजीराव भिसे :- राज्यमंत्री महोदयाचा दर्जा असलेल्या अध्यक्षांच्या निवासस्थानी सुरक्षा रक्षक लागतो त्यांच्या निवासस्थानी सीसीटीव्ही बसविणे संरक्षक उपाययोजना करणे हे अपेक्षित नाही का.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र) तथा सचिव :- विषय समितीच्या सचिवांनी विषय समिती समोर सन्मा.पदाधिकारी महोदय यांच्या निवासस्थानासाठी आवश्यक असणा-या उपाययोजना सोयी सुविधा बसविण्यासाठी विषय सादर करणे आवश्यक आहे. संबंधित विभाग प्रमुखांची आपल्या वरीष्ठ अधिकारी यांना ही माहिती देण्याची जबाबदारी आहे. त्यामुळे कार्यकारी अभियंता यांनी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सदरची बाब निदर्शनास आणून देणे आवश्यक होते. जिल्हा परिषद अंतर्गत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना साप्रवि कामकाजा बाबत ची माहिती देण्यासाठी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा) त्यांच्या अधिनिस्त सहायक प्रशासन अधिकारी, कनिष्ठ प्रशासन अधिकारी याप्रमाणे कर्मचारी आहेत त्या कर्मचारी अधिकारी यांनी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विशिष्ट महत्त्याच्या बाबी निदर्शनास आणून देणे आवश्यक असते. त्याचप्रमाणे मा.अध्यक्ष महोदयांच्या निवासस्थानी आवश्यक असलेल्या सोयी सुविधा करण्यासाठी ज्या बाकी आहेत त्या बाकी असलेल्या कामांची माहिती कार्यकारी अभियंता यांनी मा.अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निदर्शनास आणून देणे अपेक्षित होते.

सन्मा.सदस्य श्री.दिलीपकुमार मारोती मटके :- सदर निवासस्थान दुरुस्ती या माहे मार्च- २०२६ पूर्वी म्हणजेच जिल्हा परिषदेमध्ये पदाधिकारी येण्यापूर्वी झालेल्या आहेत. त्यावेळी आपण सदर निवासस्थानांची पाहणी केली नाही का. आपण पाच वर्षातून एखादी वेळेस निवासस्थानाची दुरुस्ती करतो मग त्या निवासस्थानाच्या दुरुस्ती वेळी आपल्यापैकी कोणी सदर निवासस्थान दुरुस्तीच्या कामास भेट दिली का. या कामावर आपण रु.५०.०० लक्ष रुपयापर्यंत खर्च करतात एवढ्या मोठ्या रकमेतून सुरू असलेल्या कामास भेट देण्याची आपली जबाबदारी नाही का. आपणही त्याच यंत्रणेचा घटक आहेत हे मान्य करा. सभागृहाचा विनाकारण वेळ न घालवता सदर झालेल्या घटनेची जबाबदारी कोणाची आहे त्याच्यावर निलंबनाची कार्यवाही करण्याचे आजच्या सभागृहात घोषित करावे व बैठकीचे कामकाज सुरू करावे.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र) तथा सचिव :- यासाठी सभागृहास अवगत करू इच्छितो की विविध विकास कामे पाहण्यासाठी विशिष्ट यंत्रणा असून त्या यंत्रणेने या कामांना नियमितपणे भेटी देणे अपेक्षित राहते. याबाबतची सर्व जबाबदारी ही कार्यकारी अभियंता यांची आहे.

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी :- सदर घटनेस जबाबदार असणा-या दोषीविरुद्ध योग्य ती प्रशासकीय कार्यवाही केली जाणार आहे याची नोंद घ्यावी.

सन्मा.सदस्या श्रीमती आशा शिवाजीराव भिसे :- जबाबदार अधिकारी कर्मचारी यांच्या विरुद्ध आताच जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर प्रशासकीय कारवाई करावी व नंतरच बैठकीचे कामकाज सुरू करावे.

सन्मा.सदस्य श्री.दिलीपकुमार मारोती मटके :- सदरचे निवासस्थान दुरुस्तीची कामे हे विषय समितीच्या नियुक्तींच्या पूर्वी मार्च महिन्यात झालेली आहेत. विषय समित्या स्थापन होण्याच्या अगोदरच या कामांची निविदा प्रक्रिया, कार्यारंभ आदेश झाले असतील. मग आताच्या विषय समितीवर ही जबाबदारी कशी. जो कोणी जबाबदार असेल चालणार नाही सभागृहात संबंधित दोषी चे नाव जाहीर करावे त्याच्या निलंबनाचा प्रस्ताव सादर करावा व मग पुढील कार्यवाही सुरू करावी.

मा.सभापती, पं.स. शिरुर अनंतपाळ :- सदर प्रकरणात दोषी असणा-या अधिकारी कर्मचा-याविरुद्ध तात्काळ निलंबनाची कार्यवाही करून त्यांना सभागृहाच्या बाहेर काढण्यात यावे.

सन्मा.सदस्य श्री. उमापूरे उमाजी रामराव :- सदर विषयावर आजच्याच बैठकीत निलंबनाची कार्यवाही होऊनच नंतर पुढील विषय चर्चेसाठी घेतला जावा. सभागृहाचा महत्त्याचा वेळ वाया न घालवता जबाबदार अधिकारी

यांच्याविरुद्ध निलंबनाच्या कार्यवाहीचा निर्णय घेऊन सभागृहाचे पुढील कामकाज सुरू करावे. सबंधित अधिकारी यांचेवर निलंबनाची कार्यवाही आजच्या बैठकीत न झाल्यास सर्व सन्मा.सदस्य सभात्याग करतील याची गांभिर्याने नोंद घ्यावी.

मा.अध्यक्ष महोदया :- जी गोष्ट व्हायला नको होती ती घडलेली आहे मा.अध्यक्षांच्या पदाची काय गरिमा असते त्यांचे निवासस्थानी घडलेल्या घटनेची तात्काळ चौकशी करून दोषींविरुद्ध तात्काळ जबाबदारी निश्चित करून कार्यवाही करण्यात यावी.

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी :- सदर प्रकरणात दोषींविरुद्ध कार्यवाही करण्यासाठी प्रकरणाची चौकशी होवून जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे. मा.अध्यक्ष महोदया यांच्या निवासस्थानी आवश्यक सुरक्षा पुरविली गेली नाही किंवा सीसीटीव्ही कॅमेरे बसविले गेले नाहीत याची वरिष्ठ अधिका-यामार्फत चौकशी करून, अहवाल घ्यावा लागेल व त्यानंतर जबाबदारी निश्चित करून कार्यवाही करण्यात येईल.

सन्मा.सदस्य श्री.दिलीपकुमार मारोती मटके:- मा.मुख्य कार्यकारी अधिकारी हे सभागृहाची दिशाभूल करत आहेत. घटना घडली त्यामागील जबाबदार कोण दोषी कोण हे सर्व सभागृहास माहित आहे. संबंधित व्यक्तीवर निलंबनाची कार्यवाही करण्याचे अधिकार आपल्याला आहेत. त्यामुळे तात्काळ संबंधिताचे निलंबनाचे आदेश द्यावेत. आपल्याला आपले अधिकार वापरायचे नसतील तर आम्हीही सभागृहाच्या बाहेर निघून जातो. ७-८ महिने सभागृहात लोकनियुक्त प्रतिनिधी येऊनही आपल्याला त्याचे गांभीर्य नसेल व आजही निलंबनाची कार्यवाही होणार नसल्यास आम्ही सभागृहाबाहेर निघून जातो. मागील काळात मुख्य कार्यकारी अधिकारी श्री विपिन इटनकर यांच्या काळात लातूर जिल्हा परिषदेमध्ये असाच प्रकार घडला होता त्यांनी जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेमध्ये संबंधित अधिका-यांच्या निलंबनाचा आदेश जाहीर केला होता. तत्कालीन मु.का.अ. साठी काही वेगळा व तुमच्यासाठी काही वेगळा नियम आहे का. तुम्ही लोकप्रतिनिधीचे काही ऐकायचे नाही असे ठरविले आहे का तसेच स्पष्ट सांगावे.

सन्मा. सदस्य श्री.शेळके संदीपान अनिरुद्ध :- मा.अध्यक्ष महोदय यांनी आताच चौकशी करून जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्याचे निर्देश देत असताना आपण आजच्याच बैठकीत निलंबनाचे आदेश द्यावेत असे का म्हणत आहेत.

मा.सभापती पं.स. शिरुर अनंतपाळ :- मा.अध्यक्ष महोदय यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना तात्काळ संबंधित अधिकारी यांना निलंबन करण्याचे आदेश द्यावेत ही विनंती.

सन्मा.सदस्या श्रीमती सोनकांबळे उषा गोविंद :-मा.अध्यक्ष महोदयांनी सभागृहामध्ये संबंधितांच्या निलंबनाचे आदेश द्यावेत. आपल्याला अधिकार आहेत आपण निलंबनाची कार्यवाही करू शकता. सर्व सभागृह आपल्या पाठीशी आहे.

सन्मा.सदस्या श्रीमती सोनाली रमेश थोरमोटे :- सदर विषय हा मा.अध्यक्षांचा पदाच्या गरिमेचा आहे. लातूर जिल्ह्याच्या अस्मितेचा प्रश्न असून लातूर जिल्ह्याला एक विशिष्ट आदर्श प्राप्त आहे सदर घडलेल्या घटनेसाठी आम्ही सर्वच सर्वपक्षीय लोकप्रतिनिधी मा.अध्यक्षांच्या पाठीशी असून आपण अध्यक्ष म्हणून सक्षम आहात. त्यामुळे निलंबन करण्यासाठी जबाबदारी निश्चित करावी सभागृहाचा अधिक वेळ न घालवता संबंधित अधिका-यांचे निलंबन करून पुढील विषय घेण्यात यावा.

मा.सभापती पं.स. शिरुर अनंतपाळ :- जिल्हा परिषदेमध्ये मा.अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व सभापतींच्या निवासस्थानी आवश्यक सुविधा, सुरक्षा रक्षक व सीसीटीव्ही बसविण्यात आले आहेत का याचाही खुलासा करावा.

मा.उपाध्यक्ष महोदय :- मा.जिल्हा परिषद अध्यक्षांच्या घरीच जर सुरक्षा नसेल तर इतर सभापती यांचे काय परिस्थिती असेल. आता सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे सात-सात महिने होऊनही लोकप्रतिनिधींना त्यांचे निवासस्थानचा सेवक कुठे गेला, होता सुरक्षारक्षक का नव्हते हा विषय अत्यंत संवेदनशील व गांभीर्याने घेण्याचा आहे. संबंधित एजन्सीला आपण मुदत वाढत का दिली. बांधकाम विभागाची संबंधित एजन्सीवर काहीही नियंत्रण नसल्याचे दिसत आहे. आजच्या जि.प. सर्वसाधारण सभेमध्ये मा.अध्यक्ष महोदयांच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सूचना आहे की त्यांनी सदर घटनेसाठी जबाबदार असणा-या दोषींवर जबाबदारी निश्चित करावी व त्यांच्यावर निलंबनाची कार्यवाही करावी. ८-८ महिन्यापासून जिल्हा परिषदेच्या सभापतींना जर निवासस्थाने मिळत नसतील तर ही अतिशय दुर्दैवी गोष्ट आहे. मा.अध्यक्ष महोदयांनी निवासस्थानी सीसीटीव्हीची मागणी केलेली असताना तो विषय बांधकाम विभागाने विषयी समितीमध्ये का ठेवला नाही तो ठेवण्याची जबाबदारी कोणाची आहे.

मा.अध्यक्ष महोदया :- घटना घडल्यानंतर काल निवासस्थानी सीसीटीव्ही बसविलेल्या आहेत त्याची मान्यता दाखवण्यात यावी एवढ्या तातडीने आता मान्यता कशी मिळाली.

मा. सभापती पं.स. शिरुर अनंतपाळ :- सदर प्रकरणात चौकशी समिती नियुक्त करण्याची काहीही आवश्यकता नसून तात्काळ निलंबनाची कार्यवाही झाली पाहिजे.

मा.सभापती, पं.स. अहमदपूर :- मा.अध्यक्ष महोदय यांच्या निवासस्थानी घडलेली घटना ही अतिशय निंदनीय असून आज जिल्हा परिषद मध्ये लोकनियुक्त पदाधिकारी निवड होऊन ८ महिने झाले. मा.उपाध्यक्ष असतील किंवा सर्व विषय समिती सभापती असतील त्यांना निवासस्थान जर मिळत नसतील तर हा काय प्रकार सुरू आहे. ही जी दिरंगाई होत आहे ही कुणाची जबाबदारी आहे. प्रत्येकच गोष्टीला चौकशी करण्यात येईल असे उत्तर दिले जाते हे चुकीचे असून जो काही निर्णय घ्यायचा आहे तो आजच्या आजच घेतला जावा. आम्ही काहीही ऐकून घेणार नाहीत सर्व सभापतींची निवासस्थाने का तयार नाहीत मा.अध्यक्ष महोदयांच्या निवासस्थानी किती सुरक्षारक्षक नियुक्ती करण्यात आले होते. याची उत्तरे सचिव, अतिरिक्त मुख्य कार्यकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी द्यावीत.

सन्मा.सदस्य श्री.मस्के महादेव प्रभाकर:- निलंबनाची कार्यवाही ही वर बसलेल्या पदाधिकारी, अधिकारी यांच्यापासून करण्यात यावी.

सन्मा.सदस्य श्री.उमाजी रामराव उमापूरे :- सदर विषयावर आता अधिक चर्चा न करता तात्काळ निलंबनाची कार्यवाही अनुसरावी.

सन्मा.सदस्य शेळके संदीपान अनिरुद्ध :- विषयाच्या सुरुवातीसच याबाबत बोललो होतो की तातडीने चर्चा होऊन पुढील विषय घेण्यात यावा जिल्ह्यात दुष्काळी परिस्थिती आहे आज आठ महिने झाले जिल्हा परिषदेमध्ये लोकनियुक्त प्रतिनिधी येऊन परंतु अजूनही जिल्हा परिषदेच्या माध्यमातून कुठलेही विकास काम झालेले नाही. एखादाच विषय धरून सभागृहात किती वेळ चर्चा करावी हे चुकीचे आहे.

सन्मा.सदस्य श्री. शेरे रामलिंग शेषेराव :- सभागृहाचा अधिकचा वेळ न वाया जाऊ देता मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा परिषद अधिनियम १९६४ मधील नियमानुसार संबंधित अधिका-यावर निलंबनाची कार्यवाही करावी ही विनंती.

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी :- या प्रकरणामध्ये संबंधित सर्वच दोषींवर योग्य ती प्रशासकीय कारवाई केली जाणार आहे. परंतु सन्मा.सभागृहाने ही गोष्ट विचारात घ्यावी की कुठल्याही प्रकरणात कारवाई करत असताना त्याचे दोषारोप बनवावे लागतात, काही तरी अहवाल असतो त्या आधारेच कार्यवाही केली जाते वस्तुनिष्ठ अहवाला आधारे दोषींवर कार्यवाही केली जाते. कोणाचे चुकले कुठे चुकले कोणाची काय जबाबदारी होती याचे सर्व अभिलेख गोळा करणे आवश्यक आहे. परंतु जर आपण आजच निलंबनाची कारवाई करावी असे म्हणत

असाल तर तसे करता येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. कोणालाही निलंबित केले व त्याची चौकशी प्रस्तावित केली तर शासनास दोषारोप सादर करावे लागतात त्यावेळी दोषारोप सादर करण्यासाठी आपल्याला चौकशी समितीचा अहवाल अपेक्षित आहे.

सन्मा.सदस्या श्रीमती आशा शिवाजीराव भिसे :- मा.अध्यक्ष महोदया यांचे निवासस्थानी चोरीची घटना घडली आहे. त्याठिकाणी सी.सी.टी.व्ही. व सुरक्षा रक्षक उपलब्ध करून देण्यात आलेले नव्हते. तेव्हा दोषींच्या निलंबनासाठी आपणास हा आधार वाटत नाही का.

सन्मा.सदस्य श्री.उमाजी रामराव उमापूरे :- जि.प. अधिनियम १९६४ नुसार आपल्याला निलंबन करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आहेत. त्यामुळे त्यांनी आज संबंधितांना निलंबित करावे व समजा आपल्या चौकशीमध्ये संबंधित अधिकारी कर्मचारी दोषी नसतील तर त्यांचे निलंबन नंतर रद्द करण्यात यावे. निलंबनाला काही आधार असणे आवश्यक असते. कोणाला निलंबित करावयाचे आहे यासाठी एक चौकशी अहवाल तरी लागेल. विविध सोयी सुविधा पुरविणे ही बांधकाम विभागाची जबाबदारी असून तो विभाग कोणाच्या अखत्यारित येतो ते आपल्याला माहिती आहे. यासाठी चौकशी करण्याची आवश्यकता नाही. सदर घटनेचे गांभीर्य आपल्याला लक्षात आलेले नाही. आम्ही स्वतः मा.अध्यक्ष महोदयांच्या घरी भेट दिलेली आहे. त्यांचे घरात मोठ्या प्रमाणात दगड होते सुदैवाने त्या दिवशी त्यांचे घरी कोणी नव्हते अन्यथा यापेक्षाही गंभीर घटना घडली असती.

सन्मा.सदस्या श्रीमती सोनाली रमेश थोरमोटे :- मला वाटते मुख्य कार्यकारी अधिकारी यांना घटनेचे गांभीर्य नाही व एक महिला जिल्हा परिषद अध्यक्ष असल्याने दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे. चोरी झालेली आहे ही वस्तुस्थिती असून मा.अध्यक्षांच्या निवासस्थानी एवढ्या निष्काळजीपणा कोणामुळे झाला याच्यावर आपल्याला निलंबनाची कार्यवाही करायची आहे. आधी संबंधिताचे निलंबन करा व मग नंतर दोषारोप तयार करा.

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी वर्ग १, वर्ग २ दर्जाच्या अधिका-यांना निलंबित करण्याचे अधिकार हे शासन स्तरावर आहेत याबाबत सभागृहाने नोंद घ्यावी. वर्ग 3 व वर्ग ४ कर्मचा-यांना निलंबित करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आहेत.

सन्मा.सदस्य श्री.देशमुख अजिंक्य प्रकाशराव :- चोरीच्या घटनेचा एफ.आय.आर. दाखल झाला आहे हे दोषी अधिकारी-कर्मचारी यांना निलंबित करण्यासाठी पुरेसे कारण आहे. मा.अध्यक्ष महोदया यांच्या निवासस्थानाच्या सुरक्षेमध्ये कुठेतरी कमतरता/उनिवा राहिल्या आहेत हे सिद्ध झालेले आहे. या आधारेच आपण संबंधित अधिका-यांचे निलंबन करू शकता. कारण निलंबन ही शिक्षा नाही. उद्या चौकशी मध्ये संबंधिताचे निलंबन चुकीचे झाल्याचे दिसून आल्यास आपण ते रद्दही करू शकता. आपल्याकडे चौकशीचा कुठलाही अहवाल नसताना आपण निलंबित करू शकत नाही असे म्हणने चुकीचे आहे. घटनेच्या प्रकरणात पोलीस गुन्हा नोंद झालेला आहे त्या आधारे देखील निलंबन होऊ शकते. मागील एक दीड तासाच्या चर्चेमध्ये संबंधित विभाग प्रमुख हे दोषी आहेत हेच सिद्ध होत आहे.

सन्मा.सदस्या श्रीमती आशा शिवाजीराव भिसे :- सदरची घटना होऊन आज तीन दिवस झाले आहेत. या तिन दिवसामध्ये प्रशासनाला घटनेस कोण जबाबदार आहेत याचा शोध का घेता आला नाही. आताच मा.अध्यक्ष महोदय आणि सांगितलं की घटना घडल्यानंतर काल निवासस्थानी सी.सी.टी.व्ही. बसविण्यात आले आहेत. तर यासाठी विषय समितीची परवानगी घेण्यात आली होती का विषय समितीचा ठराव देण्यात आला होता का याची माहिती देण्यात यावी.

सन्मा.सदस्य श्री.शेरे रामलिंग शेषेराव :- मा.अध्यक्ष महोदय यांनी दिनांक ३०.०६.२०२६ रोजी सीसीटीव्ही बसविण्याबाबत लेखी निवेदन दिले होते त्यावर काय कार्यवाही झाली त्या निवेदनावर विलंब करण्यास कोण जबाबदार आहेत. ते पत्र देखील अवलोकनासाठी देण्यात येत आहे.

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी :- प्रथमदर्शनी सदर घटना घडण्यास कोण कोण जबाबदार आहेत यासाठी तरी किमान आपल्याला चौकशी अहवालाचा आधार घ्यावा लागेल. तसेच सन्मा.सभागृहाने ही बाब देखील विचारात घ्यावी की वर्ग ३ व वर्ग ४ कर्मचा-याचे नियुक्ती प्राधिकारी हे मुख्य कार्यकारी अधिकारी असून त्यांच्यावरच कार्यवाही करण्याचे अधिकार मु.का.अ. यांना आहेत. वर्ग १ व वर्ग २ अधिका-यांच्या बाबतीत संबंधित विभागाचे वरिष्ठ कार्यालयाला अहवाल सादर करण्यात येईल. कार्यकारी अभियंता बांधकाम यांनी विषय समितीमध्ये प्रस्ताव सादर केला होता का प्रस्ताव सादर केला असल्यास त्यास मंजुरी मिळाली किंवा नाही या बाबींची देखील तपासणी करणे आवश्यक आहे. यासाठी चौकशी करावी लागेल.

सन्मा.सदस्य श्री.दिलीपकुमार मारोती मटके :- मा.अध्यक्ष महोदय यांच्या निवासस्थानाची जी दुरुस्ती करण्यात आली त्या दुरुस्तीची प्रशासकीय मान्यता किती रकमेची, किती तारखेची प्रशासकीय मान्यता आहे ते सांगावे. निवासस्थान दुरुस्तीची प्रशासकीय मान्यता किती तारखेला देण्यात येईल याची माहिती द्यावी. सदर कामाची निविदा कधी काढण्यात आली.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र) तथा सचिव :- सदर विषयाची माहिती कार्यकारी अभियंता (बांध) यांनी देणे अपेक्षित असून कार्यकारी अभियंता बांधकाम यांनी सभागृहास माहिती द्यावी.

कार्यकारी अभियंता (बांध):- आपण मूळ अंदाजपत्रकामध्ये निवासस्थान दुरुस्तीसाठी रुपये ५० लक्ष रकमेची तरतूद केली होती. तथापि सदर विषयास अद्याप विषय समितीची प्रशासकिय मान्यता अप्राप्त आहे.

सन्मा.सदस्य श्री.दिलीपकुमार मारोती मटके :- ज्या निवासस्थान दुरुस्तीच्या विषयाबाबत आपण बोलत आहात त्या निवासस्थान दुरुस्ती च्या कामास जिल्हा परिषदेच्या विषय समितीची प्रशासकीय मान्यता मिळालेली नसल्यास सीसीटीव्ही कॅमेरा बसविण्यासाठी विषय समितीचे मान्यता का लागत आहे याचे उत्तर यावे. प्रशासकीय मान्यता नसताना ५० लक्ष रुपयांच्या दुरुस्तीची कामे होतात व पाच-दहा हजार रुपये किमतीचे सीसीटीव्ही बसवण्यासाठी प्रशासकीय मान्यता नसल्याचे चुकीचे सांगून सभागृहाची दिशाभूल केली जाते.

सन्मा.सदस्या श्रीमती आशा शिवाजीराव भिसे :- याबाबत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सभागृहास माहिती द्यावी.

सन्मा.सदस्य श्री.उमाजी रामराव उमापूरे :- प्रशासकीय मान्यते शिवाय काम कसे झाले याची जबाबदारी निश्चित करावी.

सन्मा.सदस्य श्री.दिलीपकुमार मारोती मटके :- थोड्यावेळापूर्वीच अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर निवासस्थान दुरुस्तीच्या कामाच्या प्रगती बाबत प्रत्यक्ष पाहणी केली असल्याचे नमूद केले. तेव्हा ज्या कामाची प्रशासकीय मान्यताच नाही त्या कामाची पाहणी करण्याचे अधिकार आपल्याला आहेत का. पाहणी करत असताना सदर कामाची संचिका अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे निदर्शनासच आलेली नाही ही बाब आपल्याला समजली नाही का. प्रशासकिय मान्यतेशिवाय काम कसे सुरु झाले याचा आपणास प्रश्न पडला नाही का.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी साप्र तथा सचिव :- माहे फेब्रुवारी-मार्च-२०२६ मध्ये नियडणूका झाल्यानंतर सन्मा.पदाधिकारी यांची दालने सुस्थितीत आहेत किंवा कसे हे पाहण्यासाठी आम्ही सदर निवासस्थानांना भेट दिली होती काम सुरू असताना त्या ठिकाणी भेट दिलेली नाही.

सन्मा.सदस्य श्री.दिलीपकुमार मारोती मटके :- एखादे काम करत असताना त्या कामाच्या निविदेची संचिका अति.मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे येत असेल मग या कामाची संचिका/ प्रस्ताव आपल्याकडे आला होता का.

मा.सभापती (आरोग्य व बांधकाम) :- बांधकाम समितीमध्ये जे विषय निर्णयासाठी येतात त्यावर तात्काळ निर्णय घेतले जातात कुठलेही काम प्रलंबित ठेवले जात नाही. आताच सभागृहामध्ये चर्चा सुरू असताना मा.अध्यक्ष महोदयांच्या निवासस्थान दुरुस्ती असो किंवा इतर विकास कामे असो विषय समिती पुढे विषय सादर झाल्यास त्यास तात्काळ मंजुरी दिली गेलेली आहे. घडलेली घटना ही दुर्दैवी असून याचे कोणीही समर्थन करणार नाही. घटनेस जे कोणी जबाबदार असतील त्यांवर कठोर प्रशासकीय कारवाई करावी.

सन्मा.सदस्य श्री.उमाजी रामराव उमापूरे :- सदर विषयाचे उत्तर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी द्यावे सभापती महोदयांनी सदर विषयाचे उत्तर देऊ नये. प्रकरणात उत्तर अपेक्षित नसून दोषींविरुद्ध निलंबनाची कार्यवाही अपेक्षित आहे. आधीच जिल्ह्यातील दुष्काळाच्या परिस्थितीमुळे शेतकरी हवालदिल झालेला आहे त्यामुळे शेतक-यांचे प्रश्न मांडण्यासाठी देखील सभागृहास वेळेची आवश्यकता आहे. त्यामुळे या विषयावर जास्त वेळ न घालवता तात्काळ निलंबनाची कार्यवाही करून पुढील विषय चर्चेसाठी घेण्यात यावा. प्रशासकीय मान्यता नसताना काम चालू कसे केले यास जबाबदार कोण ? जिल्हा परिषद चालवतोय कोण हे सांगावे ? कार्यकारी अभियंता यांनी आता सांगितले की प्रशासकीय मान्यता नसताना कामे सुरू आहेत मग त्यांच्यावर नियंत्रण कोणाचे आहे त्यांनी सभागृहास उत्तर द्यावे.

सन्मा.सदस्य श्री.दिलीपकुमार मारोती मटके :- कार्यकारी अभियंता यांनी सदरची निवासस्थान दुरुस्तीची कामे सुरू करत असताना उपमुख्य कार्यकारी अधिकारी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा मुख्य कार्यकारी अधिकारी यांची पूर्वसंमती घेऊन सुरू केली होती किंवा कसे ही माहिती द्यावी.

कार्यकारी अभियंता (बांध) :- याबाबत तत्कालीन कार्यकारी अभियंता बांधकाम श्री गणेश क्षिरसागर यांनी माहिती असेल. त्यावेळी मी कार्यरत नव्हतो.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी साप्र तथा सचिव :- सदरची कामे सुरू असताना कार्यकारी अभियंता श्री गणेश क्षिरसागर हे सद्यस्थितीत त्यांची महाराष्ट्र शासनाने बदली केलेली आहे. तथापि त्यावेळी देखील उप विभागाचे अभियंता म्हणून श्री कुलकर्णी साहेब कार्यरत होते.

सन्मा.सदस्या श्रीमती सोनकांबळे उषा गोविंद :- कामाची प्रशासकीय मान्यता झालेलीच नाही ते काम सुरू झाले कसे व झाले असेल तर त्या कामाचे देयक अदा करण्यात आलेले आहे किंवा नाही याची माहिती द्यावी.

सन्मा.सदस्य श्री.पोटे भानुदास तुकाराम :- प्रशासकीय मान्यता नसताना जर अधिका-यांना कामे करता येत असतील तर आम्हालाही पंधरावा व सोळावा वित्त आयोगाच्या कामासाठी प्रशासकीय मान्यताचे बंधन घालण्यात येऊ नये.

सन्मा.सदस्या श्रीमती आशा शिवाजीराव भिसे :- या विषयावर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सभागृहास उत्तर द्यावे. दोषींची नावे सभागृहास सांगून त्यांच्या निलंबनाची कारवाई करावी व पुढील विषय घेण्यात यावा.

मा.अध्यक्ष महोदया :- सर्व सन्माननीय सदस्यांनी विषयावर शांततेच चर्चा करावी. या प्रकरणात प्रकल्प संचालक यांनी सीसीटीव्ही आणि सुरक्षा रक्षकांची चौकशी करुन दोन दिवसात आपला अहवाल सादर करावा. दोन दिवसात चौकशी अहवाल सादर करून जे वर्ग १ व २ चे अधिकारी आहेत यांच्या विभागीय चौकशीचा प्रस्ताव शासनास तात्काळ सादर करावा.

सन्मा.सदस्य श्री.दिलीपकुमार मारोती मटके :- सभागृहांमध्ये सदर विषयावर कार्यवाही केली जावी चौकशी किंवा इतर काहीही ऐकून घेतले जाणार नाही. घडलेल्या घटनेस दोषींवर कारवाई करावी. कारवाई करत असताना दोन विषयांमध्ये कारवाई करण्यात यावी जी चोरीची घटना झाली त्याच जबाबदार असणा-या अधिकारी कर्मचा-यावर निलंबनाची कारवाई करावी व दुसरी म्हणजे जी प्रशासकीय मान्यता नसताना कामे

सुरू झाली त्यास जबाबदार कोण त्यांच्यावर देखील कार्यवाही करावी. चौकशी कशाची करणार आहेत याचे सभागृहास उत्तर द्यावे. घटना घडली किंवा नाही याची चौकशी करणे अपेक्षित असते घटना घडली आहे हे निश्चित आहे मग दोषींवर तात्काळ कारवाई करावी.

सन्मा.सदस्य श्री.बिरादार तानाजी विनायक :- आताच मा.अध्यक्ष महोदयांनी रुलिंग दिले असून त्यानुसार प्रकरणाची चौकशी करून दोषींवर तात्काळ कार्यवाही करण्यात यावी व पुढील विषय घेण्यात यावा.

सन्मा.सदस्य श्री. सुभाष पांडुरंग पवार :- मागील तीन वर्षापासून प्रशासक कालावधी होता सद्यस्थितीत जे प्रकार सुरू आहे तो पदाधिकारी व अधिकारी यांची मिली भगत असल्यासारखे दिसून येत आहे. यास पदाधिकारी व अधिकारी दोन्हीही जबाबदार आहेत. ग्रामीण भागात लोकप्रतिनिधींना गावात फिरू देखील देत नाहीयेत ही परिस्थिती असून १५ व १६ वा वित्त आयोगाच्या प्रशासकीय मान्यता अजूनही प्रलंबित आहेत. व चुकीच्या मार्गाने आपण ५० लक्ष रुपयांच्या कामांना मंजुरी देता प्रशासकीय मान्यता न घेता हा गंभिर प्रकार आहे. ४-४ तास सभागृहात एकाच विषयावर चर्चा सुरु राहते.

सन्मा.सदस्य श्री.गायकवाड माणिक दौलतराव :- मा.अध्यक्ष महोदय यांचे सहित सर्व सभापतींनी सांगावे की आपण आपल्या निवासस्थानाची दुरुस्तीची जी कामे सुरु आहेत ती करत असताना संबंधित कंत्राटदाराला विचारले का सदरची कामे मंजुरी झालेली आहे त्याची निविदा झालेली आहे किंवा कसे याबाबत.

मा.उपाध्यक्ष महोदय :- सदरच्या कामाची मंजुरी ही जिल्हा परिषदेमध्ये पदाधिकारी येण्यापूर्वी झालेली आहे सदरची कामे ही प्रशासक कालावधीतील आहेत. या विषयावर आता सभागृहात बरीच चर्चा झाली आहे. मा.अध्यक्ष महोदय यांनी आताच रुलिंग दिले असल्याने त्याचा आदर करून पुढील विषय चर्चेसाठी घेण्यात यावा. प्रकल्प संचालक यांना समितीचा अध्यक्ष म्हणून नियुक्त करून दोन दिवसात अहवाल घेऊ.

सन्मा.सदस्य श्री.गुंडरे प्रफुलचंद्र निवृत्तीराव :- आता जी चौकशी समिती नियुक्ती केली आहे त्यामध्ये कनिष्ठ कर्मचा-यांवर दोष निश्चित केले जातील हे मी आजच सांगतो. वरिष्ठ अधिका-यांची काहीही जबाबदारी नाही का.

सन्मा.सदस्या श्रीमती आशा शिवाजीराव भिसे :- अशा प्रकारे प्रशासकिय मान्यता नसताना जि.प. द्वारा कोण कोणती कामे घेण्यात आली आहेत याची माहिती देण्यात यावी.

सन्मा.सदस्य श्री.उमाजी रामराव उमापूरे :- प्रशासकीय मान्यता नसतांना कामे कशी सुरु झाली याबाबत मी जिल्हा परिषदेबाहेर उपोषणाला बसणार आहे याची नोंद घ्यावी.

मा.उपाध्यक्ष महोदय :- सदर कामांना प्रशासकीय मान्यता नसत्या तर आता कॅमेरे लावले गेले नसते प्रशासकीय मान्यता होत्या परंतु सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे राहिले होते.

सन्मा.सदस्या श्रीमती सोनाली रमेश थोरमोटे :- प्रशासकीय मान्यता नसताना कामे कशी सुरु केली गेली निधी खर्च कसा केला गेला. ज्याप्रमाणे प्रशासकीय मान्यता नसताना निवासस्थान दुरुस्तीची कामे करण्यात आलेली आहेत त्याचप्रमाणे पंधरावा व सोळावा वित आयोगाच्या कामांना देखील कामे करण्यास मान्यता द्यावी.

सन्मा.सदस्य श्री.दिलीपकुमार मारोती मटके :- आपण सुरुवातीस समितीने मान्यता दिली नसल्यामुळे सीसीटीव्ही राहिले असल्याचे नमूद केले होते. त्यामुळे हा विषय काढण्याची वेळ आली प्रशासकीय मान्यता नसताना सदर कामे कशी झाली ते सांगावे व हा विषय इथेच थांबवून पुढील विषय घेण्यात यावा तोपर्यंत संबंधित कंत्राटदाराचे देयक अदा केले जाऊ नये सदरचे देयक अदा करण्यापूर्वी विषय जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेसमोर सादर करण्यात यावा.

सन्मा.सदस्या श्रीमीती सोनकांबळे उषा गोविंद :- मा.अध्यक्ष महोदयांनी विषय पत्रिकेनुसार पुढील विषय घेण्याचे निर्देश दिलेले आहेत तेव्हा पुढील विषय घेण्यात यावा.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी साप्र तथा सचिव :- मागील जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा दिनांक ०७/०७/२०२६ रोजीचे इतिवृत्त कायम करणे पृष्ठ क्रमांक एक

सन्मा.सदस्य श्री. शेळके संदिपान अनिरुद्ध :- आता ज्या विषयावर सभागृहात दोन तास चर्चा झाली तो विषय विषय पत्रिकेमध्ये नमूद होता का. विषय पत्रिकेवर नव्हता तर एवढा वेळ का घेण्यात आला.

मा.उपाध्यक्ष महोदय :- मा.अध्यक्ष महोदय यांच्या निवासस्थानी सीसीटीव्ही कॅमेरे बसले नाहीत म्हणजेच दुरुस्तीचे कुठलेही काम झालेले नाही.

सन्मा.सदस्य श्री.गुंडरे प्रफुलचंद्र निवृत्तीराव :- याप्रमाणे चुकीची माहिती सभागृहात दिली जाऊ नये आताच कार्यकारी अभियंता बांधकाम यांनी प्रशासकीय मान्यता झालेली नसली तरी कामे सुरू केली गेली आहेत असे सांगितले आहे.

सन्मा.सदस्या श्रीमती सोनाली रमेश थोरमोटे :- या विषयाचे उत्तर न मिळाल्यास आम्ही देखील आमच्या मतदारसंघात पंधरावा व सोळावा वित आयोगाची कामे प्रशासकीय मान्यते शिवाय सुरु करु याची नोंद घ्यावी. मा.उपाध्यक्ष महोदय यांनी सभागृहाची दिशाभूल करू नये. प्रशासकीय मान्यता नसताना कामे कशी केली गेली याचे उत्तर यावे.

सन्मा.सदस्य श्री.सुभाष पांडूरंग पवार :- सदर विषय गंभीर होत चालला असून यामध्ये तातडीने हस्तक्षेप करून योग्य ती कार्यवाही होणे आवश्यक आहे. प्रशासकिय मान्यता नसताना कामे कशी होत आहेत. अजून अशी किती कामे प्रशासकीय मान्यते शिवाय सुरू आहे याचीही माहिती सभागृहास देण्यात यावी.

सन्मा.सदस्य माने श्रीकांत ऊर्फ बाळू पंडीतराव :- माझे मतदार संघातील कामाची निविदा अद्यापही का प्रसिद्ध करण्यात आलेली नाही याबाबत संबंधित विभागाचे विभाग प्रमुख यांना सातत्याने फोन करून देखील निविदा ओपन करण्यात आलेली नाही.

सन्मा.सदस्या श्रीमती सोनाली रमेश थोरमोटे :- जिल्हा परिषद सदस्य म्हणून आपल्या मतदारसंघात जात असताना ग्रामीण नागरिकांकडून विविध विकास कामासाठी विचारणा केली जाते तेव्हा आम्हाला त्यांना बोलण्यासही वाव नाही अशा स्थितीत आपण प्रशासकीय मान्यते शिवाय कामे करता.

सन्मा.सदस्य श्री.उमाजी रामराव उमापूरे :- आजच्या बैठकीतील प्रशासकीय मान्यते शिवाय झालेल्या कामाबाबत आपण काय करणार आहेत याविषयी माहिती देऊनच पुढील विषय घेण्यात यावा अन्यथा मा.अध्यक्ष, उपाध्यक्ष सर्व सभापती व प्रशासन यांची मिली भगत आहे असे आम्ही समजावे का. संबंधित अधिका-याने प्रशासकीय मान्यते शिवाय कामे झाली असल्याचे मान्य केले असताना आपणाला परत चौकशी समिती नियुक्त करण्याची काय आवश्यकता आहे.

सन्मा.सदस्य श्री.गुंडरे प्रफुलचंद्र निवृत्तीराव :- अधिका-यांनी त्यांना वाटेल तशी कामे करायची व सन्माननीय सदस्यांनी सांगितले की त्याला विषय समितीची मान्यता जीबी चा ठराव अशा सभेची सांगायच हे चुकीचे आहे.

मा.उपाध्यक्ष महोदय :- जिल्हा परिषद अंतर्गत विकास कामे करत असताना सर्व सन्माननीय सदस्यांना विचारात घेऊनच विकास कामे केली जातात-जातील याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. सीसीटीव्हीचे कामे निवासस्थानी झालेली नाहीत याचाच अर्थ दुरुस्तीचे काम झालेले नाही.

सन्मा.सदस्या श्रीमती सोनाली रमेश थोरमोटे :- मा.उपाध्यक्ष महोदयांनी सभागृहाची दिशाभूल करू नये सदर निवासस्थानाच्या ठिकाणी दुरुस्ती अनुषंगिक कामे झालेली असून केवळ सीसीटीव्ही चे काम झालेले नाही व जर कामे झालीच नाहीत असे मा.उपाध्यक्षांचे म्हणणे असेल तर चोरी देखील झालेली नाही असे समजावे का.

मा.सभापती, पं.स. अहमदपूर :- सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नांची उत्तरेही सचिव अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी यावीत अध्यक्ष उपाध्यक्ष महोदय यांनी उत्तरे देऊ नयेत.

सन्मा.सदस्या श्रीमती सोनाली रमेश थोरमोटे :- सभागृहाची मा.अध्यक्ष महोदयाची दिलगिरी व्यक्त करून असे म्हणावे लागत आहे की आज जिल्हा परिषदेमध्ये पदाधिकारी येऊन सन्माननीय जिल्हा परिषद सदस्य निवडून येऊन आठ महिन्याचा कालावधी झाला मागील चार स्थायी समितीच्या बैठकांपासून मध्ये देखील हाच विषय मांडत आहे कुठल्याही विषयावर निर्णय क्षमतेचा अभाव दिसत आहे. ही सर्व सभागृहाची भावना असून मतदारसंघात फिरत असताना रस्त्यावरील खड्डे बुजवण्यासाठी देखील विभागाकडे निधी उपलब्ध नसल्याची सबब सांगितली जाते व दुसरीकडे ५० लक्ष रुपयाची दुरुस्तीची कामे प्रशासकीय मान्यते शिवाय केली कशी जातात. सदर विषयावर ठोस निर्णय झाल्याशिवाय सभागृहाचे कामकाज चालू दिले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

सन्मा.सदस्या श्रीमती माने शरयु संभाजी :- कुठल्याही विषयावर सभागृहात निर्णय होत नाही जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेत केवळ नाष्टा करण्यासाठी आम्ही आलेलो नाही ग्रामीण नागरिकांचे प्रश्न मांडण्यासाठी आलेलो आहोत.

मा.सभापती, (आरोग्य व बांध) :- जिल्हा परिषद अध्यक्ष महोदयांचे निवासस्थानी दुरुस्तीचे कामास प्रशासकीय मान्यता दिलेली नाही याचाच अर्थ कुठलेही काम झालेले नाही व कुठलेही देयक अदा केले गेलेले नाही. ज्या कामाला प्रशासकीय मान्यता झालेली नाही त्या कामाचे देयक अदा केले जाणार नाही. मागील कालावधीत ज्या कामाची प्रशासकीय मान्यता झालेली आहे केवळ अशाच कामाची देयके अदा केली जातील व ज्या कामाची प्र.मा. झालेली नाही त्या कामाची देयके अदा केली जाणार नाहीत.

सन्मा.सदस्य श्री.उमाजी रामराव उमापूरे :- कार्यकारी अभियंता सांगत आहेत प्रशासकीय मान्यता झालेल्या नसताना दुरुस्तीची कामे झालेली आहेत व बांधकाम सभापती दुरुस्तीची कामे झाली नसल्याची सांगत आहेत ही सभागृहाची दिशाभूल आहे. हा सभागृहाचा अवमान आहे.

मा.अध्यक्ष महोदया :- यासंदर्भात मी आताच रुलिंग केलेले असून त्यानंतर सदर विषयावर आता चर्चा होणार नाही पुढील विषय घेण्यात यावा जिल्ह्यातील पाणीटंचाई बाबत ची माहिती सभागृहात देण्यात यावी .

उप मुख्य कार्यकारी अधिकारी साप्र तथा सचिव :- राज्य शासन व जिल्हा परिषदेच्या कृषी विभाग प्रमुख यांनी जिल्ह्यातील पर्जन्यमान व पीक पाहणी विषयी सभागृहास माहिती यावी.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी साप्र तथा सचिव :- मा.अध्यक्ष महोदयाच्या निर्देशानुसार राज्य शासनाच्या कृषी विभागाने जिल्ह्यातील पाणीटंचाईच्या परिस्थिती विषयी सभागृहास अवगत करावे .

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी :- अनियमित पावसामुळे जिल्ह्यात सोयाबीन पेरणी वेगवेगळ्या कालावधीत झालेली आहे परंतु जिल्ह्यात सरासरीच्या ५० टक्के एवढे पर्जन्यमान झालेले आहे. जे सोयाबीनचे पीक फुलो-याच्या स्थितीत होते त्याचा फुलोरा गळून गेलेला आहे. सुरुवातीला जी पेरणी झाली होती त्या पिकाला शेंगा लागण्याची प्रक्रिया झाली होती परंतु कमी पावसामुळे दाणे भरलेले नाहीत. सोयाबीन पिकाचे जवळपास शंभर टक्के नुकसान झालेले आहे. यामध्ये पीक कापणी प्रयोगात सदरची बाब निदर्शनास येईलच परंतु दुष्काळाचे जे दोन ट्रिगर राहतात त्यातील पहिला ट्रिगर म्हणजे कमी पावसाचा व दुसरा म्हणजे हायड्रोलॉजिकल सर्वे म्हणजेच भूजल पातळीचा. माहे सप्टेंबर-२०२६ अखेर जर ७५ टक्के पाऊस कमी झाला तर माहे ऑक्टोबर

मध्ये दुष्काळ जाहीर होऊन दुष्काळाच्या अनुषंगाने सर्वेक्षणाची कार्यवाही सुरू करण्यात येईल. सद्यस्थितीत पीक कापणी प्रयोग सुरू झालेले असून माझी जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेच्या माध्यमातून सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की जेथे जेथे पीक कापणी प्रयोग सुरू असतील त्या ठिकाणी आपण प्रत्यक्ष जाऊन पाहणी करावी. तलाठी, ग्राम पंचायत अधिकारी व सहायक कृषि अधिकारी यांचे मार्फत पीक कापणी प्रयोगाचे स्थळ निश्चिती केली जाते. ४.७३ लाख हेक्टर वर सोयाबीनची लागवड झालेली असून जवळपास सर्व क्षेत्र बाधित आहे ज्या ठिकाणी सोयाबीन पिकासाठी काही प्रमाणात पाण्याचा सिंचनाची सुविधा आहे असेच ठिकाणी पीक बरे आहे.

सन्मा.सदस्य श्री.बिरादार तानाजी विनायक :- पीक कापणी प्रयोग करत असताना स्थळ निश्चितीसाठी काय निकष आहेत.

सन्मा.सदस्य श्री.गायकवाड माणिक दौलतराव :- लातूर जिल्ह्यात सोयाबीन, तुर, मुग, उडीद या सर्वच खरीप पिकाची किती क्षेत्रावर लागवड झालेली आहे व आतापर्यंत आपण केलेल्या पीक कापणी प्रयोगामध्ये काय निष्पन्न झाले आहे याची माहिती द्यावी. सबंधित अधिकारी हे अतिशय असंवेदनशील असून ग्रामीण नागरिक जेव्हा निवेदन देण्यासाठी आपल्या कार्यालयाला येतात तेव्हा आपण सेवकामार्फत कार्यालयात नसल्याचे सांगितले जाते. हा विषय दिशा समिती बैठकीत देखील झालेला आहे. ज्या पद्धतीने आपण शेतक-यांना जिओ टॅगीग चे फोटो मागणी करतात त्याच पद्धतीने आपण आज पावेतो किती ठिकाणी भेटी दिल्या याची आम्हाला माहिती द्यावी. माझ्या साकोळ मतदार संघातील गौस शेख या शेतक-याने ६.५ एकर वर सोयाबीन लागवड केली होती, परंतु त्याच्या पिकाला काहीही पीक लागले नाही. त्याबाबत आपण काय चौकशी केली आपण ते सांगावे. जिल्ह्यात ५० % तरी पर्जन्यमान झाले आहे हे कशावरून काढले.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी :- जे पर्जन्यमापक विविध मंडळात बसविण्यात आलेले आहेत त्यातील आकडेवारीनुसार ऑनलाइन पद्धतीने जी माहिती प्राप्त झाली आहे त्यानुसार मी सभागृहात ५० टक्के पर्जन्य झाल्याचे सांगितले आहे. सदरची माहिती ही ऑनलाईन विहित पोर्टलवर नोंदविली जाते व नंतर आम्हाला उपलब्ध होते.

सन्मा.सदस्य श्री.गायकवाड माणिक दौलतराव :- मागील वर्षीचा पिक विमा देखील बहुतांश शेतक-यांना मिळालेला नाही. लातूर जिल्ह्यात किती मंडळाला मागील वर्षीचा पिक विमा मिळाला याची माहिती द्यावी. मागील वर्षी अतिवृष्टी मध्ये मांजरा नदीच्या पात्रामध्ये जवळपास सहा-सहा किलोमीटरच्या परिसरातील पिके अतिवृष्टी मध्ये नुकसान झाली यामध्ये पूर्ण जिल्ह्यातील पिक विम्याचा विषय असताना केवळ चार मंडळात पिक विमा का मंजूर झाला व इतर मंडळातील शेतकरी पिक विमा पासून वंचित राहण्यास कोण जबाबदार आहे. मागील वर्षी अतिवृष्टी मध्ये किती क्षेत्र बाधित झाले होते याची माहिती मला आज बैठक संपण्यापूर्वी देण्यात यावी.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मागील वर्षीचा पिक विमा हा ज्या शेतक-यांना मंजूर झाला आहे त्यांच्या खात्यात जमा झालेला असून मागील वर्षी जिल्ह्यातील चार मंडळांना पिक विमा मंजूर झाला होता. पिक विमा हा दोन निकषांवर मंजूर केला जातो यामध्ये ५०% महत्व हे पीक कापणी प्रयोगाला व ५० टक्के महत्व हे सॅटॅलाइट द्वारे घेतलेल्या इमेजेस ला राहते. सॅटॅलाइट इमेजद्वारे फोटोमध्ये जर ग्रीनरी दिसली तर त्यावरून संभाव्य उत्पन्न गृहीत धरले जाते. यावर्षी ६० टक्के महत्व हे सॅटॅलाइट इमेजेसला तर ४० टक्के महत्व हे पीक कापणी प्रयोगांना असणार आहे.

सन्मा.सदस्य श्री. शेळके संदिपान अनिरुद्ध :- आजच्या जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेमध्ये वाळलेल्या सोयाबीनचे काड सभागृहाचे समोर आणून ठेवले आहे हीच परिस्थिती सर्व जिल्ह्यात असताना केवळ सॅटॅलाइट इमेज च्या आधारे किंवा चांगल्या ठिकाणी घेतलेल्या पिक कापणी प्रयोगाच्या आधारे सरसकट शेतकरी पिक

विमा पासून वंचित राहतात. विभागाने शासनस्तरावर सिचनाची सुविधा असलेल्या क्षेत्रावरील पिक कापनी प्रयोगाची माहिती कळविल्यास जिल्हा पिक विमा पासून वंचित राहतो हे विभागाने विचारात घ्यावे. उद्या मा.मुख्यमंत्री महोदय लातूर जिल्ह्याच्या दुष्काळ पाहणी दौऱ्यावर येत आहेत. माजी आजच्या जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेच्या माध्यमातून मा.अध्यक्ष महोदय यांना विनंती आहे की आपण सर्वपक्षीय सदस्य असलेले एक शिष्टमंडळ मा.मुख्यमंत्री महोदय यांना भेटून पूर्ण जिल्हाच दुष्काळग्रस्त जाहीर करावा असे निवेदन देण्यात यावे.

सन्मा.सदस्य श्री.बिरादार तानाजी विनायक :- शेतक-यांना लाभ मिळण्यासाठी कृषी विभागाच्या माध्यमातून जे शक्य आहे ते सर्व करावे.

कृषि विकास अधिकारी :- जिल्ह्यातील खताच्या उपलब्धते बाबतीत सभागृहास नमूद करण्यात येते की ४३९७६ MT एवढे खत उपलब्ध असून सध्या दुष्काळी परिस्थिती असल्याने खतांचा उठाव कमी आहे त्यामुळे खतांची कुठेही टंचाईची स्थिती नाही.

सन्मा.सदस्य श्री.माने श्रीकांत उर्फ बाळू पंडीतराव :- तांदुळजा महसूल मधून मागील वर्षीचा विमा देण्यासाठी प्रत्येक शेतक-याकडुन ५००/-रुपये घेतले जात आहेत. कृषी विभागाचे अधिकारी देखील या अनियमिततेस जबाबदार आहेत.

सन्मा.सदस्य श्री.गुंडरे प्रफुलचंद्र निवृत्तीराव :- सन्माननीय सदस्यांनी नमूद केलेली माहिती सत्य असून माझे मतदारसंघातील काही ठराविक लोक ज्या पिकाचा विमा भरतात त्यांनाच विमा मंजूर होतो. मागील दहा वर्षापासून हाच प्रकार सुरु आहे.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी :- सर्वेक्षण हे पिक विमा कंपनीचे प्रतिनिधी व सहाय्यक कृषी अधिकारी यांनी करणे अपेक्षित असून विमा कंपनीचे प्रतिनिधी यांनी परस्पर केलेले असून सहायक कृषी अधिकारी यांना त्याबाबत माहिती दिलेली नाही. पिक विमा कंपनीने परस्पर सदर ठिकाणी पंचनामे केलेली आहेत. अशा जवळपास ६८ हजार तक्रारी प्राप्त असून या अगोदर तालुकास्तरीय समितीने कंपनीला पंचनामे सादर करण्याबाबत सूचना केल्या होत्या. परंतु कंपनीने ते सादर केलेले नाहीत. त्यामुळे तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखालील समितीने सरसकट या ६८ हजार तक्रारी असलेल्या शेतक-यांना पिक विम्याची भरपाई यावी असा निर्णय दिलेला आहे. त्यानंतर मा.जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीने देखील असाच निर्णय घेतला आहे.

सन्मा.सदस्य श्री.गायकवाड माणिक दौलतराव :- माहे जून पासून जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांनी किती खत, बी बियाणे, औषध दुकानांना भेटी दिल्या व किती दुकानांवर कार्यवाही केली याची माहिती द्यावी.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी :- माहे जुन-२०२६ पासून ब-याच दुकानांना मी व्यक्तीशा भेटी देऊन काही दुकानांवर त्यांचा परवाना रद्दची कारवाई देखील केलेली आहे सन्मा.सदस्यांना सदरची माहिती देण्यात येईल. आतापर्यंत ४१ दुकानांचे परवाने निलंबित केले असून ०३ परवाने रद्द केले आहेत.

सन्मा.सदस्य श्री.माने श्रीकांत उर्फ बाळू पंडीतराव :- जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी सदर विषय गांभिर्याने घ्यावी. बहुतांश वेळा दुकानांच्या चौकशीचा केवळ फार्स केला जात असून सबंधित दुकानदारांकडून आर्थिक हीत जोपासून काहीही कार्यवाही केली जात नसल्याचे प्रकार देखील निदर्शनास आलेले आहेत. तेव्हा केवळ दुकानांना भेटी न देता संबंधितांचे परवाने रद्द करण्याची देखील कारवाई करावी.

उपायुक्त, पशुसंवर्धन :- खरीप हंगामात पर्जन्यमान कमी झाले असल्याने जिल्ह्यातील चा-याची परिस्थिती गंभीर आहे.सद्यस्थितीत जो चारा उपलब्ध आहे तो माहे फेब्रुवारी-२०२७ अखेरपर्यंत पुरेल एवढाच शिल्लक आहे. प्रत्येक महसूल मंडळातील लागवड क्षेत्राच्या माहिती आधारे सदर चारा उपलब्धतेची माहिती सभागृहास

देण्यात आलेली आहे. प्राप्त माहितीनुसार २० मंडळामध्ये डिसेंबर-२०२६ अखेर पुरेल एवढा चारा उपलब्ध असून उर्वरित मंडळामध्ये त्यापुढे जास्तीत जास्त १५ ते २० दिवस याप्रमाणे चा-याची उपलब्धता आहे.

मा.उपाध्यक्ष महोदय :- असे कुठले सर्वेक्षण विभागाने केले आहे याची माहिती सभागृहात यावी. जिल्ह्यात चारा टंचाईची अतिशय भयावह स्थिती असून माहे डिसेंबर अखेरही पुरेल एवढाच चारा जिल्ह्यात शिल्लक आहे. शेतकरी जनावरांना चारा टाकत असताना तो मोजून टाकत नाही त्यामुळे विभागाने गांभीर्याने माहिती द्यावी. माझे मतदारसंघातील जरी पशुवैद्यकीय दवाखान्याच्या क्षेत्रा अंतर्गत डिसेंबर अखेर पुरेल एवढाही चारा शिल्लक नाही. तसेच आताच सन्मा.सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे चारा हा छावणीला नाही तर दावणीला उपलब्ध करून द्या.

सन्मा.सदस्य श्री.सुभाष पांडूरंग पवार :- जनावरांच्या चा-याची परिस्थिती पुढील दिवसात गंभीर होणार असून जिल्ह्यात कुठेही चारा उपलब्ध होणार नाही त्यामुळे आजपासूनच आवश्यक त्या उपाययोजना करणे आवश्यक आहे. विभागाद्वारे जनावरांसाठी जो चारा दिला जातो तो निकृष्ट दर्जाचा असल्याने जनावरे खात नाही. अशाप्रकारे माहे फेब्रुवारी-२०२६ अखेरपर्यंत चारा उपलब्ध असल्याची माहिती शासनास दिली गेल्यास सर्वच अडचणीत येतील त्यामुळे वस्तुनिष्ठ व योग्य असलेली माहितीच उद्या मा.मुख्यमंत्री महोदयांना सादर करावी. आज जिल्ह्यातील शेतकरी अडचणीत असून अशा प्रकारे चुकीची माहिती दिली गेल्यास त्याचे गंभीर परिणाम शेतक-यावर होतील.

सन्मा.सदस्य श्री.गायकवाड माणिक दौलतराव :- आपण २०१६ चा दुष्काळ देखील पाहिलेला असून त्याच्या तुलनेत यावर्षीचा दुष्काळ अत्यंत तीव्र आहे. ५००-६०० फुट एवढ्या खोलीवर पाण्याची पातळी खालावलेली असून जनावरांना पाणी व चारा टंचाईसाठी छावणीला चारा न देता त्यांच्या दावणीला चारा द्यावा. मागील कालावधीत जनावरांच्या छावणीमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता झाली आहेत. जेणेकरून शेतकरी त्यांच्या जनावराचे संगोपन व्यवस्थित करू शकतील. तसेच मी मा.अध्यक्ष महोदयांच्या संमतीने हा देखील विषय सभागृहात सादर करतो की शासनाच्या मदतीबरोबरच जिल्हा परिषदेने जिल्ह्याच्या कृषी व पशुसंवर्धन विभागास जास्तीत जास्त आर्थिक मदत करावी व शेतकरी पशुपालकाच्या लाभाच्या योजना घ्याव्यात. जेणेकरून लातूर जिल्ह्याचा आदर्श सर्व राज्याने घेतला जाईल.

सन्मा.सदस्य श्री.बिरादार तानाजी विनायक :- पशुसंवर्धन व कृषी विभागास जास्तीत जास्त निधी देऊन येणा-या टंचाई परिस्थितीत शेतक-यांना व पशुपालकांना जास्तीत जास्त मदत करावी.

सन्मा.सदस्य श्री.सुभाष पांडूरंग पवार :- जिल्ह्यातील चारा टंचाई ही अतिशय तीव्र असून मागील वर्षाच्या तुलनेत ऊस पिकाचे वाढ देखील अत्यल्प झालेली आहे तेव्हा अशास्थितीत सदर उसाचा चारा म्हणून वापर करण्यासाठी शेतक-यांना शासनाने काही आर्थिक मदत द्यावी असाही आजच्या जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेत ठराव घ्यावा ही विनंती.

मा.सभापती, (कृषि व पशुसंवर्धन) :- आताच सभागृहामध्ये झालेल्या चर्चे अनुषंगाने सन्मा.सदस्यांना नमूद केलेला चारा व पाणी टंचाईच्या विषयायची नोंद घेवून शासनस्तराव आवश्यक त्या कार्यवाहीसाठी प्रस्ताव सादर करावा ही विनंती.

प्रतिनिधी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण :- महाराष्ट्र जिवन प्राधिकरण अंतर्गत सुरु असलेल्या योजनाच्या प्रगतीचा आढावा सभागृहास सादर करण्यात आला. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अंतर्गत सुरू असलेल्या योजनांपैकी १५ योजना पूर्ण असून १३ योजना अंतीम टप्प्यावर आहेत.

मा.सभापती (समाज कल्याण) :- आताच महाराष्ट्र जीवन प्राधिकरण च्या प्रतिनिधी यांनी त्यांचा आढावा दिला मी पहिल्या जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेपासून १८ खेडी पाणीपुरवठा योजनेबाबत पाठपुरावा करत असून

दोन दिवसापूर्वी सदर योजनेतून आमच्या गावातील गावापर्यंत पाणीपुरवठा सुरु झाला आहे त्याबाबत विभागाचे अभिनंदन.

मा.उपाध्यक्ष महोदय :- मा.सभापती (समाज कल्याण) यांनी महाराष्ट्र जिवन प्राधिकरण विभागाचे अभिनंदन केले असून त्यास माझे अनुमोदन आहे. विभागाच्या संबंधित अभियंता यांचे मुळे १८ खेडी योजनेचे पाणी गावापर्यंत पोहोचू शकले तसेच उर्वरित कामे देखील तातडीने पूर्ण करून विभागाने यापुढेही असेच चांगले काम करावे अशी अपेक्षा व्यक्त करतो.

सन्मा.सदस्य श्री.नागराळे अश्विन धोंडीराम :- मतदार संघातील मेथी या गावी गावातील घरांना नळ जोडणी द्वारे पाणीपुरवठा दिलेला असून संबंधित कंत्राटदाराचे देयक अदा करणे बाकी आहे.

कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पु.) :- सद्यस्थितीत रेट्रो फिटिंगच्या योजनांसाठी शासन स्तरावरून निधी उपलब्ध होण्याची शक्यता आहे. शासन स्तरावरून निधी मागणी करण्याबाबत सूचना प्राप्त होत्या त्यानुसार आपण जिल्ह्यासाठी १९० कोटी रुपये निधी मागणीचा प्रस्ताव शासनाकडे सादर केलेला आहे. निधी प्राप्त होताच सबंधिताचे देयक अदा करण्यात येईल.

सन्मा.सदस्य श्री.गायकवाड माणिक दौलतराव :- मागील जि.प.सर्वसाधारण सभेमध्ये हिसामाबाद येथील पाणीपुरवठा योजना अपूर्ण असल्याबाबत विभागास निदर्शनास आणून दिले होते आजही सदरची योजना अपूर्ण अवस्थेत आहे. मागील बैठकीत आपण सदर योजनेचे काम सुरू असल्याचे नमूद केले होते परंतु आजही या क्षणाला आपण आपला कोणीही प्रतिनिधी सदर गावाच्या ठिकाणी पाठवावा व काम सुरु आहे किंवा कसे याची तपासणी करावी. आपण दिशा समिती बैठकीमध्ये देखील काम सुरू असल्याचे दिशाभूल करणारे उत्तर दिले आहे.

कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पु.) :- मौ.हिसामाबाद येथील पाणीपुरवठा योजनेच्या बाबतीत सद्यस्थितीत काम बंद आहे. संबंधित कंत्राटदाराने काम थांबविले होते परंतु राज्य शासनाने निधी देण्यास तयार झाले असल्याने सदरची कामे लवकरच पूर्ण करण्यात येतील. निधी उपलब्ध झाल्याबरोबर संबंधित कंत्राट दाराकडे पाठपुरावा करून सदर काम पूर्ण करण्याची नोंद घेण्यात येत आहे. ० ते ५० टक्के प्रगती असलेल्या योजनांना पूर्ण करण्यासाठी देखील निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासन स्तरावर पत्रव्यवहार केलेला आहे. सदर हिसामाबाद येथील योजनेची सर्व माहिती सन्माननीय सदस्यांना देण्यात येईल व योजना पूर्ण करण्यासाठी आवश्यक ती दक्षता घेण्यात येत आहे

सन्मा.सदस्य श्री.गायकवाड माणिक दौलतराव :- ग्रामीण भागामध्ये सध्याच्या दुष्काळी स्थितीत हातपंप, विद्युत पंप दुरुस्ती युनिट अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावत असून त्यांना मागील कालावधीमध्ये आपण जे मानधन देत होतो ते अत्यल्प होते. त्या कामगारांना आपण २१०००/- रुपये मानधन देण्याचे मागील कालावधीत मान्य केले होते. परंतु अद्यापही त्यांना मानधन वाढ सुरू झालेली नाही. तसेच १५ महिन्यापासून संबंधित कर्मचा-यांचे मानधन अदा करण्यात आलेले नाही. तेव्हा मानधन वाढीसह सदर कर्मचा-यांना तात्काळ मानधनही अदा केले जावे.

उप अभियंता यांत्रिकी :- सदरची संचिका मान्यतेस्तव सादर करण्यात आली आहे.

मा.सभापती, शिरूर अनंतपाळ :- या अनुषंगाने संबंधित हातपंप विद्युत पंप दुरुस्ती कर्मचा-यांचे मानधन वाढीबाबत मागील जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेमध्ये ठराव झालेला असून त्याची अंमलबजावणी तातडीने करण्यात यावी. २०२२ पासून त्यांना वाढीव मानधनानुसार फरकाची रक्कम देखील अदा केली पाहिजे. तसेच एका-एका कर्मचा-याकडे दोन-दोन तालुक्यातील काम सोपविण्यात आलेले आहे हे करत असताना त्यांनी दोन तालुक्यात प्रवास कसा करावा व प्रवासाचे पैसे देण्यासाठी काही तरतूद आहे का.

सन्मा.सदस्य श्री.गायकवाड माणिक दौलतराव :- कर्मचारी ज्या तालुक्यात पूर्वी होते त्यांना त्याच ठिकाणी पूर्ववत देण्यात यावे सध्याच्या दुष्काळी परिस्थितीमध्ये त्यांना इतरत्र पाठविण्यात येऊ नये.

मा.उपाध्यक्ष महोदय :- सन्मा.सदस्य श्री माणिक गायकवाड यांनी नमूद केलेला विषय अत्यंत महत्त्वाचा असून त्याबाबत त्यांचे अभिनंदन करतो तसेच मागील बैठकीमध्ये संबंधित कर्मचा-यांच्या मानधन वाढीबाबतचा विषय झालेला आहे. व आताच सदर कर्मचा-यांचे मानधन १६५००/- एवढे वाढविण्यात आले आहे.

मा.सभापती, शिरूर अनंतपाळ :- सदस्य सन्माननीय सभागृहांनी संबंधित कामगारांचे वेतन हे मानधन हे रु. १००००/- हुन वाढवून १६५००/- एवढे केले आहे याबद्दल मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष सर्व सन्मा.पदाधिकारी व अधिकारी यांचे अभिनंदन करतो. तसेच १६५००/- हून त्यांना अधिक मानधन दिले जाण्याची आवश्यकता आहे याचीही कृपया नोंद घ्यावी.

मा.अध्यक्ष महोदया :- सदय स्थितीत सदर हातपंप विद्युत पंप दुरुस्ती कर्मचा-यांचे मानधन रु.१००००/- वरून वाढवून १६५००/- इतके वाढवण्यात आले असून पुढील कालावधीत टप्प्याटप्प्याने संबंधिताचे मानधन वाढ करण्यात येईल.

<u>ठराव क्र.</u> (३८) <u>:-</u> दिनांक ०७.०७.२०२६ रोजी झालेल्या जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे बाबत सभागृहामध्ये सविस्तर चर्चा होऊन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

सुचक :- सन्मा.सभापती कृषी,पशुसंवर्धन व दुग्धविकास समिती श्रीमती कविता किसन गोरे

अनुमोदक :- सन्मा.सभापती महिला व बाल कल्याण समिती श्रीमती शिवकन्या महेंद्र गोडभरले

सन्मा.सदस्या श्रीमती आशा शिवाजीराव भिसे :- मागील स्थायी समिती बैठकीत एक विषय मांडला होता. त्यासंदर्भात मा.अध्यक्ष महोदय यांना लेखी निवेदन देखील दिलेले असून त्यानुसार मा.अध्यक्ष महोदयांनी आरटीओ ची बैठक देखील घेतली आहे. त्या बैठकीस सर्व खाजगी ट्रॅव्हल्स मालक देखील उपस्थित होते. ज्या राज्य मार्गावरून खाजगी ट्रॅव्हल्स प्रवास करतात त्या खाजगी ट्रॅव्हल्सचे थांबे निश्चित करावे व त्या ठिकाणी महिलांसाठी स्वच्छ व सुरक्षित स्वच्छतागृहाची व्यवस्था करण्यात यावी. लातूर जिल्ह्यातील शहरी तसेच ग्रामीण भागातून मुली-महिला या खाजगी ट्रॅव्हल्स द्वारे प्रवास करत असतात. याबाबत सदर बैठकीत चर्चा करण्यात आली तेव्हा महामार्गावरील जे पेट्रोल पंप आहेत त्या ठिकाणी स्वच्छतागृहाची संख्या वाढवावी व त्या ठिकाणी सुरक्षित व स्वच्छतागृहे निर्माण करावी असा विषय झालेला आहे. तेव्हा आजच्या जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेत लातूर जिल्ह्यातील सर्व महामार्गाच्या वरील पेट्रोल पंप ठिकाणी ग्रामीण तसेच शहरी भागातील खाजगी ट्रॅव्हल्स द्वारे प्रवास करणा-या मुली महिलांसाठी स्वच्छ व सुरक्षित स्वच्छतागृहे निर्माण करावीत असा आजच्या जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेत ठराव मांडत असून त्या सभागृहाने अनुमोदन द्यावे व सदर ठराव केंद्रीय पेट्रोलियम मंत्रालयाकडे देखील आवश्यकता कार्यवाहीसाठी सादर करावा.

मा.उपाध्यक्ष महोदय :- सदर ठरावाची तातडीने अंमलबजावणी करून ठराव शासन स्तरावर सादर करण्यात यावा.

<u>ठराव क्र.</u> (३९) <u>:-</u>) महामार्गावर असलेल्या पेट्रोल पंपावर महिलांकरिता स्वच्छ व सुरक्षित स्वच्छतागृह उपलब्ध करणे बाबतचा ठराव शासनास पाठविणे बाबत सर्वानुमते ठराव मंजुर करण्यात आला.

सुचक :- सन्मा.सदस्या श्रीम. आशा शिवाजीराव भिसे

अनुमोदक :- सन्मा.सदस्या श्रीम. सोनाली रमेश थोरमोटे

सभागृहाचे कामकाज सुरु असतांना सन्मा.जि.प. सदस्य श्री.गायकवाड माणिक दौलतराव, श्री.टेकाळे दत्तात्रय काकासाहेब, श्री.भालेराव मुकेश भिवाजी व इतर यांनी सभागृहात वाळलेले सोयाबीनचे काड आणून खालील प्रमाणे घोषणा दिल्या.

विषय :-लातूर जिल्ह्यातील शेतक-यांना दुष्काळग्रस्त मदत मिळालीच पाहिजे"लातूर जिल्हा दुष्काळग्रस्त जाहीर झालाच पाहिजे"

सन्मा.सदस्य श्री.गायकवाड माणिक दौलतराव यांनी :- "लातूर जिल्ह्यातील शेतक-यांना दुष्काळग्रस्त मदत मिळालीच पाहिजे" लातूर जिल्हा दुष्काळग्रस्त जाहीर झालाच पाहिजे" मागील दीड महिन्यापासून लातूर जिल्ह्यात कुठेही पाऊस नसल्याने ग्रामीण भागातील शेतक-यांच्या हाता-तोंडाशी आलेला घास निसर्गाच्या लहरीपणामुळे गेला आहे. बळीराजा संकटात सापडला आहे. लातूर जिल्ह्यातील सोयाबीन, ऊस, तुर व इतर सर्वच खरीप पिके पावसामुळे वाया गेली असून शेतकरी मरणाच्या उंबरठ्यावर उभा आहे. कुठलाही प्रशासकीय अधिकारी अद्यापही शेतक-यांना बांधावर पोहोचलेला नाही. सोयाबीन पिकासाठी शेतक-याला हेक्टरी ७५०००/- तर उसाच्या पिकाला हेक्टरी १००००००/- ऐवढे अनुदान शासनाने तात्काळ जाहीर करावे. त्याच प्रमाणे शेतीवर अवलंबून असणा-या शेतमजुराला देखील अनुदान देण्यात यावे. असा आजच्या जि प सर्वसाधारण सभेमध्ये ठराव मांडत असून त्यास सभागृहाने व मा.अध्यक्ष महोदयांनी अनुमोदन देवून सदर ठराव शासनास सादर करण्यात यावा ही विनंती. त्याच बरोबर लातूर जिल्ह्यातील सर्व शाळा, महाविद्यालया मध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची फीस देखील शासनाने माफ करावी. तसेच जिल्ह्यातील पाणी व चा-याची स्थिती अत्यंत भयावह असून त्यावर शासनाने काय उपाययोजना केल्या आहेत याची सभागृहास माहिती द्यावी. दुष्काळी परिस्थितीत शेतक-यांचे पशुधन जगवण्यासाठी जनावरांना चारा हा छावणीला नको तर त्या दावणीला देण्यात यावा. याबाबत काय उपाययोजना करण्यात आल्या आहेत याची माहिती सभागृहात द्यावी. तसेच पूर्वी केवळ शेतकरीच आत्महत्या करत होते परंतु आता शेतक-यांच्या महिला देखील आत्महत्या करू लागल्या असून सदर विषयाचे गांभीर्य विचारात घेऊन आजच्या जि.प.सर्वसाधारण सभेमध्ये मांडलेला ठराव शासनास तात्काळ सादर करावा.

सन्मा.सदस्या श्रीमती आशा शिवाजीराव भिसे :- आताच सन्माननीय सदस्यांनी जिल्ह्यातील शेतक-यांची परिस्थिती सभागृहाचे निदर्शनास आणून दिली असून त्यांनी नमूद केलेला ठरावास सर्व सभागृहाने एकमुखाने मान्यता द्यावी ही विनंती. लातूर जिल्हा हा सरसकट दुष्काळग्रस्त जाहीर करून सभागृहाने घेतलेला ठराव शासनस्तरावर तात्काळ सादर करावा.

सन्मा.सदस्या श्रीमती सोनाली रमेश थोरमोटे :- शेतक-याचे आयुष्य हे कॅलेंडरच्या तारखेवर चालत नसून ते मातीच्या ओलाव्यावर, पिकाच्या स्थितीवर, पाण्यावर व उद्याच्या आशेवर चालते, सध्या जगाचा पोशिंदा असलेला बळीराजा हा अतिशय अडचणीत असून सभागृहांनी मांडलेला ठराव एकमुखाने मंजूर करून तातडीने शासनस्तरावर सादर करून आवश्यक त्या उपाययोजना तातडीने होण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करावा.

सन्मा.सदस्य श्री.दिलीपकुमार मारोती मटके :- सदर ठरावास सर्व सभागृहाच्यावतीने अनुमोदन आहे.

सन्मा.सदस्य श्री.शेरे रामलिंग शेषेराव :- महाराष्ट्राचे मा.मुख्यमंत्री महोदय लवकरच लातूर जिल्हा दुष्काळ पाहणी दौरा करणार असून त्यापूर्वी आजच्या जि.प. सर्वसाधारण सभेतील ठराव शासनास सादर करण्यात यावा ही विनंती व शेतक-यांना जास्तीत जास्त मदत कशी मिळवता येईल यासाठी आपण पाठपुरावा करावा.

श्री.गायकवाड माणिक दौलतराव :- आजच्या जि.प. सर्वसाधारण सभेमध्ये सर्व सभागृहाने सदर ठरावास अनुमोदन दिल्याबद्दल सभागृहाचे आभार व्यक्त करतो व सदर ठराव शासनस्तरावर तात्काळ सादर करावा अशी ही विनंती करतो.

मा.उपाध्यक्ष महोदय :- सर्व सभागृह या दुष्काळी परिस्थितीत शेतक-यांसोबत असून आस्मानी संकटामुळे बळीराजा कोलमडून गेला आहे. मागील शंभर वर्षांमध्ये आला नसेल असा दुष्काळ जिल्हयात पडला आहे.

त्यामुळे या दुष्काळी परिस्थितीत शासनाने शेतक-यांना जास्तीत जास्त मदत करण्यासाठी आजच्या जि प सर्वसाधारण सभेत मांडलेला ठराव तात्काळ सादर करण्यात यावा.

सन्मा.सदस्य श्री.सुभाष पांडूरंग पवार :- आजच्या ठरावा सोबतच जिल्ह्यातील कमी पावसामुळे ऊस पीकाची देखील अपेक्षित वाढ झालेली नसून ज्या शेतक-यांचा ऊस हा चारा छावणीसाठी घेतला जाणार आहे त्यांनाही शासनाने विशिष्ट अनुदान मंजूर करावे असा ठराव घेण्यात यावा. त्याचबरोबर मागील वर्षाचा तसेच यावर्षीचा पिक विमा अद्यापही शेतक-यांना मिळालेला नसून तो विमा देखील सबंधित शेतक-यांना तातडीने अदा करण्यात यावा असाही ठराव घेऊन शासन स्तरावर सादर करण्यात यावा ही विनंती.

मा.अध्यक्ष महोदया :-मागील दोन्ही वर्षांचा पीक विमा जिल्ह्यातील शेतक-यांना मिळण्यासाठी शासन स्तरावर लेखी कळविण्यात यावे.

ठराव क्र. (४०) :- लातूर जिल्ह्यातील शेतक-यांना दुष्काळग्रस्त मदत मिळालीच पाहिजे", "लातूर जिल्हा दुष्काळग्रस्त जाहीर झालाच पाहिजे बाबतचा ठराव शासनास पाठविणे बाबत सर्वानुमते ठराव मंजुर करण्यात आला.

सुचक :- सन्मा.सदस्या श्रीम. आशा शिवाजीराव भिसे
अनुमोदक :- सन्मा.सदस्या श्री.दिलीपकुमार मारोती मटके

सन्मा.सदस्या श्रीमती चव्हाण शालिनी रामदास :- लामजना हे मोठ्या लोकसंख्येचे गाव असूनही ३० खेडी योजनेचे पाणी या गावात नियमितपणे का येत नाही. या योजनेच्या वितरणात किंवा पाईपलाईनमध्ये तांत्रिक/ प्रशासकीय अडचण असल्यास ती दूर करून लामजना गावाला सुरळीत व वेळेवर पाणी मिळण्यासाठी प्रशासनाकडून नेमकी काय उपाययोजना व कारवाई केली जात आहे याचा सविस्तर तपशील द्यावा.

कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पु.) :- लामजना हे ३० खेडी योजनेतील सर्वात मोठे गाव असून सदर पाणीपुरवठा साखळीतील सगळ्यात शेवटचे गाव आहे. सदर योजनेसाठी मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजनेअंतर्गत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण द्वारे योजना राबवलेली आहे. साखळीतील शेवटचे गाव असल्यामुळे सदर गावाला पाणीपुरवठा होत नाही ही वस्तुस्थिती आहे. सदर ठिकाणी नवीन पाईपलाईनचे काम होऊन देखील त्या ठिकाणी पाणी गळती होत आहे व सदर योजना देखभाल दुरुस्तीसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने जिल्हा परिषदेकडे एकतर्फी हस्तांतरित केलेली आहे. तरीही लोकांना टंचाईमध्ये पाणीपुरवठा होण्यासाठी योजनेवरील दुरुस्तीचे काम वेळोवेळी आपण करत आहोत परंतु पाईपलाईन मध्ये वारंवार लिकेज होत आहेत. सद्यस्थितीत सदर पाईपलाईन वर लिकेजेस झालेले असून लिकेजेस काढण्याचे काम सुरू आहे. २-३ दिवसात दुरुस्तीचे काम करून सदर गावाला पाणीपुरवठा सुरू करण्यात येत आहे.

मा.अध्यक्ष महोदया :- दुष्काळाच्या स्थितीत ग्रामीण नागरिकांना पाण्याची टंचाई होणार नाही याची दक्षता घेवून तात्काळ लिकेजेस काढून गावाचा पाणीपुरवठा सुरळीत करावा.

कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पु.) :- योजनेवरील दुरुस्तीची कामे करत असताना वेळोवेळी ग्रामपंचायतीस स्पष्टपणे सांगण्यात आले होते की नियमित पाणीपट्टी भरल्याशिवाय योजना सुरळीत चालू शकणार नाही. योजनेवर वीस ते तीस कोटी रुपये खर्च केल्यानंतर देखील एम.एस.ई.बी व एम.एस.ई.डी.सी.एल यांचे नियमित वीज बिल भरण्याएवढी ही पाणीपट्टी वसूल झालेली नाही. योजनेअंतर्गत च्या प्रत्येक ग्रामपंचायतीने जर आपला पाणीपट्टीचा भार उचलला तर योजना सुरळीतपणे चालू शकते. यातील योजनेवरील ३० गावांपैकी केवळ १९ गावेच नियमितपणे पाणीपट्टी भरतात उर्वरित गावी केवळ टंचाई कालावधीतील पाणीपट्टी भरतात. या अनुषंगाने सर्व ग्रामपंचायतच्या सरपंचांच्या बैठका देखील गटविकास अधिकारी यांचे समवेत झालेले आहेत. सदरची पाईपलाईन ही महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मार्फत नव्याने टाकण्यात आलेली आहे तरीसुद्धा लिकेजेस

होत आहेत. सदर विषयाची अधिक माहिती महाराष्ट्र जीवन प्राधिकरण देऊ शकेल नवीन पाईपलाईन करून तीन वर्षे झालेले असून पाईपलाईन तीस वर्षांपर्यंत चालू शकते.

सन्मा.सदस्या श्रीमती सोनाली रमेश थोरमोटे :- सदरची पाईपलाईन कधी नवीन करण्यात आलेली आहे नवीन पाईपलाईन केल्यानंतर किती दिवस ही पाईपलाईन चालणे अपेक्षित आहे याची माहिती यावी २८ कोटी रुपयांची योजना राबवून देखील जर गावाला पाण्यापासून वंचित राहावे लागत असेल तर ही जबाबदारी कोणाची आहे. दोन दिवसात माहिती देण्यात यावी. मूळ योजना चे काम करत असताना मग या बाबींची तपासणी का केली गेली नाही एवढ्या मोठा निधी शासनाचा मंजूर होऊन योजनेच्या कामाला सातत्याने दुरुस्ती करावी लागत असल्यास ही जबाबदारी कोणाची. २८ कोटी रुपये गेले कुठे.

कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पु.):- सन १९९३-९४ मध्ये सदर योजनेचे काम सुरू झाले होते ते १९९८ ला योजना पुर्ण होवून साधारण २००० मध्ये जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित करण्यात आली. २०००-२०२६ पर्यंत आपण ती योजना चालवत आहोत परंतु मूळ पाईपलाईन ही ॲस्बेस्टॉस सिमेंट (AC) मधील योजना असल्याने तो एम.जे.पी ने दुरुस्त करून देणे आवश्यक होते. सदर योजना ही पूर्ण काळी माती असलेल्या परिसरातून गेल्यामुळे पाण्याच्या दबावामुळे सातत्याने लिकेजेस होत आहेत. सुरुवातीचे काम तसेच नंतर झालेले २८ कोटी रुपयाचे काम देखील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने केलेले आहे.

प्रतिनिधी म.जि.प्रा. :- सदर योजनेच्या कामाची माहिती संबंधित उपविभागीय अधिकारी यांच्याकडून घेऊन सन्माननीय सदस्यांना अवगत करण्यात येत आहे.

सन्मा.सदस्य श्री.सुभाष पांडूरंग पवार :- सद्यस्थितीत काहीतरी पर्याय करून गावाला योजनेद्वारे तात्काळ पाणीपुरवठा करणे आवश्यक आहे. मला मिळालेल्या माहितीनुसार गावाला आज रोजी टँकरची मागणी आलेली आहे.

मा.उपाध्यक्ष महोदय :- उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.) यांनी सदर योजनेवरील सर्व ३० ग्रा.पं. चे ग्रामसेवकांना योजना ची नियमितपणे दुरुस्ती करण्याचे निर्देश द्यावेत व नियमित विद्युत देयक भरण्याबाबतही निर्देश द्यावेत.

सन्मा.सदस्य श्री.पाटील अमर माणिकराव :- घरणी मध्यम प्रकल्पातून महाराणाप्रतापनगर या ग्रामपंचायतीस पाणीपुरवठा देण्याची योजना मंजुर असून सदर प्रकल्पात परिसरातील पाणीपुरवठा होऊन महाराणा प्रताप नगर पाणीपुरवठा होईल असे पाणी उपलब्धतेचे काही प्रमाणपत्र दिले होते का. सदर प्रकल्पावर आज शिरूर अनंतपाळ व चाकूर असे दोन तालुके अवलंबून आहेत व परत महाराणा प्रताप नगर या ३०००० लोकसंख्येच्या ग्रामपंचायतीस पाणीपुरवठा मिळू शकेल का. मग सदर योजना ही लातूरच्या जवळील ग्रामपंचायतला आणण्यासाठी चा घाट कोणासाठी घातला जात आहे हे सभागृहाला सांगण्यात यावे. लातूरच्या शेजारीच मुबलक पाणीसाठा उपलब्ध असताना एवढे ४० कि.मी. दुरहून असलेल्या घरणी प्रकल्पातून पाणी का नेले जात आहे. परिसरातील असलेल्या नागरिकांवर यामुळे अन्याय होत नाही का याचे मार्गदर्शन करावे. तेथे तेवढ्या प्रमाणात मुबलक पाणीसाठा आहे का. योजना मंजूर करण्यापूर्वी असे ना हरकत प्रमाणपत्र देत असताना चुकीच्या पद्धतीने दिले गेले आहे.

प्रतिनिधी म.जि.प्रा.:- घरणी प्रकल्पातून महाराणा प्रताप नगरला पाणी आनत असताना योजनेचे काम सद्यस्थितीत स्थानिक नागरिकांनी अडवले असल्याने योजना सद्यस्थितीत अपूर्ण आहे.

मा.सभापती, पं.स. शिरुर अनंतपाळ :- सदर प्रकल्पावर अवलंबून असलेल्या शिरूर व चाकूर या तालुक्यांनाच प्रकल्पातून पाणीपुरवठा करण्यास पाणी कमी पडत आहे. मग परत लातूर जवळील महाराणा प्रताप नगर या ४० कि.मि. अंतरावरील ग्रामपंचायत साठी योजना का मंजूर केली गेली. प्रकल्पात मुबलक पाणीसाठा असेल तर तो नक्की दिला जावा परंतु महाराणाप्रतापनगर ही ग्रामपंचायत लातूर शहराच्या जवळील असून लातूर

शहराला ज्या पाईपलाईन द्वारे पाणीपुरवठा दिला जातो त्याच पाईपलाईन द्वारे महाराणा प्रताप नगर ग्रामपंचायतला दिला जावा.

सन्मा.सदस्य श्री.मस्के महादेव प्रभाकर :- आताच सभागृहामध्ये महाराणाप्रतापनगर ग्रामपंचायती साठी घरणी प्रकल्पातून पाणी न देण्याबाबतचा विषय सन्माननीय सदस्य व सभापती यांनी मांडला परंतु अशी भूमिका असल्यास प्रत्येक जिल्हा देखील अशीच भूमिका घेईल महाराणा प्रताप नगर ग्रामपंचायत ही लातूर जिल्ह्याच्या बाहेर नसून तीस हजार लोकसंख्येची ग्रामपंचायत असल्याने त्या ठिकाणी पाणीटंचाई सातत्याने भेडसावत आहे तेव्हा घरणी प्रकल्पातील पाईपलाईन चे काम तात्काळ सुरू करण्यात यावे. महाराणा प्रताप नगर ग्रामपंचायत मध्ये राहत असलेले लोक देखील आपल्या जिल्ह्याचे नागरिक आहेत.

सन्मा.सदस्य श्री सुभाष पांडुरंग पवार :- मागील बैठकीमध्ये जिल्ह्यातील ग्रामपंचायत स्तरावर बसविण्यात आलेल्या आर.ओ. फिल्टर ची माहिती देण्याबाबत सांगितले होते.

जिल्हा आरोग्य अधिकारी :- यासंदर्भात जिल्ह्यातील ग्रामपंचायतीचे ठिकाणी ग्रामपंचायतच्या मालकीचे व खाजगी मालकीचे किती आरो प्लांट आहेत याची माहिती घेतली असून. सद्यस्थितीत जिल्हा परिषद अंतर्गत ८ जिल्हा परिषद गटातील आरो प्लांटच्या पाणी नमुन्यांची तपासणी केली जाणार आहे सद्यस्थिती तपासणी करण्यासाठी एक पाने नमुना तपासण्यासाठी किमान पाचशे रुपये खर्च येत असल्याने टप्प्याटप्प्याने सर्व पाणी नमुन्यांची तपासणी करण्यात येईल.

मा.उपाध्यक्ष महोदय :- एकट्या आरोग्य विभागाने सदरचे पाणी नमुने तपासणी करण्याचे ठरविल्यास आर्थिक अडचणीचे होणार आहे. त्यासाठी ग्रामपंचायत विभागाने ग्रामसेवकांमार्फत त्यांच्या ग्राम पंचायत अंतर्गत असलेल्या खाजगी व शासकीय आर.ओ. प्लांन्टचे पाणी नमूने तपासणीचे निर्देश द्यावेत.

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी :- उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.) सर्व ग्रामसेवकांना त्यांच्या ग्रा.प. अंतर्गत पाणी नमूने तपासणी करणेबाबत लेखी निर्देश द्यावेत. व तात्काळ पाणी नमुने तपासणी करून द्यावेत.

जिल्हा आरोग्य अधिकारी :- तसे लेखी पत्र आपण सर्व ग्रामसेवकांना दिलेले असून आरोग्य विभागाने रॅन्डमली ८ जि.प. मतदारसंघातील १५० पाणी नमुने तपासणीसाठी घेतले आहेत. पुढील सात ते आठ दिवसात आपल्याला पाणी नमुने तपासणीचा अहवाल प्राप्त होईल.

सन्मा.सदस्य श्री.सुभाष पांडूरंग पवार :- जे पाणी नमुने दूषित असल्याचे दिसून येईल त्या संबंधित प्लांटच्या मालकांना नोटीस देऊन तात्काळ आवश्यक त्या उपाययोजना करण्यात याव्यात.

मा.सभापती, पं.स. शिरुर अनंतपाळ :- तालुक्यातील पाणी नमुन्यांची तपासणी ही निलंगा येथील प्रयोगशाळेतून केली जाते तेव्हा आजच्या जि प सर्वसाधारण सभेमध्ये माझी मा.अध्यक्ष महोदयांना विनंती आहे की शिरूर अनंतपाळ तालुक्यासाठी स्वतंत्र पाणी तपासणी प्रयोगशाळा मंजूर करण्यासाठी कार्यवाही करावी.

सन्मा.सदस्य श्री.होरे चंद्रकांत विठ्ठलराव :- प्रा.आ.केंद्र अंबुलगा केंद्राची अत्यंत दुरावस्था झालेली असून नुकतीच मा.अध्यक्ष महोदयांनी सदर प्राथमिक आरोग्य केंद्रास भेट दिली असता त्यांनी देखील ही अवस्था पाहिली आहे. जवळपास ४० हजार ग्रामीण लोकसंख्या सदर दवाखान्यावर अवलंबून आहे. प्रा.आ.कें.च्या दुरावस्थेबाबत जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर देखील त्यांनी सदर प्राथमिक आरोग्य केंद्राची जिल्हा परिषद स्तरावरून अधिकारी पाठवून पाहणी केल्यानंतर आवश्यक ती कार्यवाही केली जाईल असे पत्रात नमूद केले आहे. मग मा.अध्यक्ष महोदयांनी सदर प्राथमिक आरोग्य केंद्रास भेट दिल्यानंतर जी दुरावस्था दिसून आली ते चुकीचे आहे का. स्वतः अध्यक्षांनी भेट देऊन संबंधित वैद्यकीय अधिका-यांचे वर्तन पाहिले आहे. तेव्हा तात्काळ संबंधित ठिकाणी दुसरा वैद्यकीय अधिकारी देण्यात यावा.

मा.अध्यक्ष महोदया :- सदर प्राथमिक आरोग्य केंद्रास मी व्यक्तिशः भेट दिली होती त्या ठिकाणी वैद्यकीय अधिकारी नव्हते, तसेच इतर आवश्यक भौतीक सुविधांचा देखील अभाव होता. स्वच्छतागृहांची दयनीय अवस्था होती.

जिल्हा आरोग्य अधिकारी :- सदर विषयाबाबत सन्मा.सदस्य तसेच मा.अध्यक्ष महोदय यांनी निर्देश दिल्यानंतर मी तात्काळ संबंधित तालुका आरोग्य अधिकारी यांना याबाबत विचारणा केली होती. सदर ठिकाणच्या वैद्यकीय अधिका-याबाबत देखील सन्माननीय सदस्य महोदयांनी तक्रार दिली होती. तथापि मी व्यक्तिशः प्राथमिक आरोग्य केंद्रास भेट देऊन योग्य ती कार्यवाही तात्काळ अनुसण्याची नोंद घेतली आहे. पुढील ७ दिवसात त्या ठिकाणी इतर वैद्यकीय अधिका-यांची प्रतिनियुक्ती करण्याची व्यवस्था करण्यात येईल. संबंधित वैद्यकीय अधिका-यांची बदली करण्याचे अधिकार हे शासनाचे असल्याने त्या ठिकाणी इतर वैद्यकीय अधिका-याची प्रतिनियुक्ती करण्यात येईल.

मा.उपाध्यक्ष महोदय :- सन्मा.जिल्हा परिषद सदस्य हे त्या ठिकाणच्या रुग्ण कल्याण समितीचे अध्यक्ष आहेत त्यांनी स्वतः तक्रार दिलेली असताना आपण परत तिथे स्वतः व्यक्तीशः जाऊन चौकशी करणे अपेक्षित होते परंतु तसे न करता आपण तालुका आरोग्य अधिकारी यांना पाठवले आहे हे चुकीचे असून तात्काळ त्या ठिकाणी इतर वैद्यकीय अधिकारी देण्यात यावा.

मा.सभापती (आरोग्य व बांध.) :- सन्मा.अध्यक्ष महोदया यांनी स्वतः भेट दिलेली आहे सन्मा.सदस्य हे त्या ठिकाणच्या रुग्ण कल्याण समितीचे अध्यक्ष आहेत तेव्हा आणखी परत चौकशी न करता त्या ठिकाणी इतर वैद्यकीय अधिका-याची तात्काळ प्रतिनियुक्ती करून तसे सन्मा.सदस्यांना अवगत करावे.

मा.सभापती, पं.स. शिरुर अनंतपाळ :- माझ्या तालुक्यामध्ये क्षेत्रभेटीवर जात असताना प्रा.आ.केंद्र, उपकेंद्र, शाळा, अंगणवाडी, व इतर कार्यालयांना भेटी देतो तेव्हा बहुतांश वेळा कर्मचारी, वैद्यकीय अधिकारी उपस्थित नसतात. यासंबंधीचे मी पुरावे देखील देऊ शकतो. माझ्या तालुक्यातील तालुका आरोग्य अधिकारी यांना त्याबाबतचे पुरावे देखील मी वेळोवेळी पाठवले आहेत परंतु त्यावर त्यांनी कुठलीही कार्यवाही केलेली नाही.

जिल्हा आरोग्य अधिकारी :- सर्व आरोग्य केंद्र, उपकेंद्राच्या ठिकाणी कार्यरत असणा-या कर्मचा-यांसाठी बायोमेट्रिक उपस्थिती बंधनकारक केलेली असून सन्माननीय सभागृहाच्या नम्रपणे निदर्शनास आणून देऊ इच्छितो की मागील महिन्यात १२२ कर्मचा-यांच्या बायोमेट्रिक उपस्थिती १० दिवसापेक्षा कमी आहे अशा कर्मचा-यांचे वेतन मी थांबवले आहे. व त्यांनी लिखित स्वरूपात पुढील महिन्यात बायोमेट्रिक अटेंडन्स करण्याचे मान्य केल्यानंतरच संबंधितांचे वेतन अदा केले गेले आहे. ११३ वैद्यकीय अधिकारी आहेत त्यापैकी दहा दिवसापेक्षा कमी बायोमेट्रिक उपस्थिती असणा-या वैद्यकीय अधिका-यांची वेतन देखील कमी केलेले आहे. तसेच आजच्या जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेच्या अनुषंगाने सर्व सन्माननीय सदस्यांना नम्रपणे सांगू इच्छितो की आपण आपल्या मतदारसंघात जेव्हा क्षेत्रभेटीवर जाता त्यावेळी आपल्याही निदर्शनास अशा बाबी आल्यास मला व्हाट्सअप द्वारे कळविण्यात यावे मी संबंधितावर योग्य ती प्रशासकीय कारवाई अनुसरेल.

सन्मा.सदस्य श्री.बिरादार तानाजी विनायक :- येणा-या काळात असे प्रकार घडू नयेत ग्रामीण भागातील रुग्णांना रुग्णसेवेसाठी अतिशय आवश्यक अशी आपली विभागाची जबाबदारी आहे.

सन्मा.सदस्य श्री.दिलीपकुमार मारोती मटके :- मागील सात महिन्यापासून आरोग्य विभाग अंतर्गत जे कंत्राटी वाहन चालक आहेत त्यांचा वेतनाचा विषय प्रत्येक स्थायी समिती, जि.प. सभेत मांडत आहे परंतु सदर विषयावर अंतिम निर्णय का घेतला जात नाही हे समजत नाही. यामध्ये कोणाचा काय इंटरेस्ट आहेत ते हे सांगावेत मा.न्यायालयाचे स्पष्ट निर्देश आहेत जे २७ कर्मचारी यांचे मानधन जिल्हा परिषदेने अदा करण्याचे स्पष्ट निर्देश असून देखील आपले संबंधित एजन्सी सोबत काय संबंध आहेत की एजन्सीच्या मार्फत संबंधित वाहनचालकांचे वेतन अदा केले जात आहे. आपण मा.न्यायालयाचे आदेश असताना देखील संबंधितांना थेट

मानधन दिले नाही याविषयी बैठकीत तसेच आपणास व्यक्तिशः बोललो आहे. आपल्या कायदेविषयक सल्लागार मार्फत आपण मार्गदर्शन घेतल्यानंतर देखील त्यांचा असाच सल्ला आला की त्यांचे वेतन जिल्हा परिषदेने करावे. तरीदेखील संचिका CAFO कडे सादर आहे.

जिल्हा आरोग्य अधिकारी :- या संदर्भात शासनाचे धोरणच आहे की एजन्सी मार्फत संबंधित वाहनचालकाचे मानधन अदा करावे. आपली एजन्सी ही माहे एप्रिल-२०२६ मध्ये निश्चित झाली त्यानंतर सबंधित एजन्सीमार्फत त्यांचे नियमित मानधन अदा केले जात आहे. थेट जि.प. द्वारा सबंधित वाहनचालकांचे मानधन अदा केल्यास ते कर्मचारी भविष्यात नियमित करण्यासाठी मा.न्यायालयात जाण्याची शक्यता असल्याने जिल्हा परिषदेवर दायीत्व निर्माण झाले असते यामुळे एजन्सीमार्फत सबंधिताचे मानधन अदा केले जाणार आहे.

मा.मुख्य कार्यकरी अधिकारी :- सबंधित एजन्सीची जर निवड अंतिम झालेली नसेल तर त्यांना जिल्हा परिषदेने थेट वेतन संबंधित वाहन चालकांना द्यावे किंवा कसे याबाबत विभागाने संचालकांना मार्गदर्शन मागविलेले आहे. भविष्यामध्ये जर काही दायित्व निर्माण झाले तर संबंधित कर्मचारी हे जिल्हा परिषदेला मा.न्यायालयात पार्टी करतात त्यामुळे मार्गदर्शन घेण्यात येत आहे.

सन्मा.सदस्य श्री.दिलीपकुमार मारोती मटके :- आपण शासनाचे मार्गदर्शन घेण्यासाठी माहे एप्रिल मध्येच का कार्यवाही केली नाही आज सप्टेंबर पर्यंत कशाची वाट पाहिली. सदर वाहन चालकांची नियुक्तीची एजन्सी कोणती आहे. सर्व ठिकाणी या दिशा एजन्सीचे नाव का पुढे येत आहे हे संशयास्पद आहे.

मा.अध्यक्ष महोदया :- सदरील दिशा एजन्सी ही बंद करण्यात यावी.

सन्मा.सदस्य श्री.दिलीपकुमार मारोती मटके :- आताच मा.अध्यक्ष महोदयांनी निर्देश दिल्यानुसार संबंधित दिशा एजन्सीवर बंदी घालण्यात यावी. संबंधित एजन्सीला मनुष्यबळ पुरवठा करण्यासाठी दिलेली सर्व कंत्राट रद्द करण्याचा मी आजच्या जि प सर्वसाधारण सभेमध्ये ठराव मांडत आहे असून त्यास सभागृहाने अनुमोदन द्यावे ही विनंती

<u>ठराव क्र.</u> (४१) दिशा एजन्सीवर बंदी घालण्यात यावी. संबंधित एजन्सीला मनुष्यबळ पुरवठा करण्यासाठी दिलेली सर्व कंत्राट रद्द करण्याचा बाबतचा ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.
सुचक :- सन्मा.सदस्य श्री.दिलीपकुमार मारोती मटके
अनुमोदक :- सन्मा.सदस्य श्री.बिरादार तानाजी विनायक

सन्मा.सदस्या श्रीम. देशमुख राजश्री धनंजय:-प्रा.आ.केंद्र भांतांगळी नवीन इमारत करण्यात यावी त्या ठिकाणी कर्मचारी संख्या अत्यंत कमी असून वैद्यकिय अधिकारी राहत नाहीत. याबाबत योग्य ती कार्यवाही अनुसरण्यात यावी.

जिल्हा आरोग्य अधिकारी :- सदरचे काम पुढील पंधरा दिवसात सुरू होणार आहे.

सन्मा.सदस्य श्री.गायकवाड माणिक दौलतराव :- साकोळ प्रा.आ.केंद्र अंतर्गत ६ उपकेंद्र आहेत. हिसामाबाद येथील उपकेंद्रास जागेची अडचण असून इमारत दोन मजली करण्यात यावी. साकोळ प्रा.आ.कें. ची OPD अत्यंत चांगली असून त्याठिकाणी एक बॉन्डेड वैद्यकिय अधिका-यांची तात्काळ नियुक्ती करून द्यावी. तसेच त्याठिकाणी विद्युत प्रवाह वारंवार खंडित होत सोलार देण्यात यावे. तसेच साकोळ प्रा.आ.केंद्रास अंदाजे ७ एकर जागा उपलब्ध असून नवीन इमारत तातडीने मंजुरी यावी. त्या ठिकाणी तात्काळ सोलार संच, किरकोळ दुरुस्ती, पाणी पुरवठ्याची उपलब्धता करून द्यावी. कर्मचारी वर्ग देखील त्या ठिकाणी चांगला आहे.

मा.सभापती, पं.स. शिरुर अनंतपाळ :- प्रा.आ.केंद्र वलांडी नंतर सर्वाधिक ओपीडी असणारे साकोळ प्राथमिक केंद्र असून सन्माननीय सदस्यांनी नमूद केलेला विषय अत्यंत महत्वाचा आहे. त्याठिकाणी दुरुस्तीची अत्यंत आवश्यकता असून, त्याठिकाणी असलेली जागेची उपलब्धता पाहता त्या ठिकाणी मोठे प्राथमिक आरोग्य केंद्र

इमारत होणे आवश्यक आहे. तसेच तालुक्यामध्ये 5-6 उपकेंद्र आहेत त्या ठिकाणी देखील नवीन इमारतीची आवश्यकता असून त्या अनुषंगाने लेखी पत्र व्यवहार केलेला आहे त्या ठिकाणच्या इमारती देखील नवीन होण्यासाठी आवश्यक ती तरतूद करण्यात यावी.

जिल्हा आरोग्य अधिकारी :- साकोळ प्राथमिक आरोग्य केंद्राचे आपण स्ट्रक्चरल ऑडिट पूर्ण केलेले असून त्याचा डिसमेंटल व नवीन इमारतीचा प्रस्ताव शासन स्तरावर सादर करण्यात आलेला आहे. तसेच उपकेंद्राच्या इमारतीची कामे देखील प्रस्तावित करण्यात आलेली आहेत.

सन्मा.सदस्य श्री.गायकवाड माणिक दौलतराव :- हिसामाबाद उपकेंद्र ची इमारत देखील दोन मजली केल्यास त्या ठिकाणी रुग्णांना व कर्मचा-यांना आरोग्य सेवेचे काम करणे सुलभ होईल त्या ठिकाणची ओपीडी देखील चांगली आहे.

सन्मा.सदस्य श्री.माने श्रीकांत उर्फ बाळू पंडीतराव :- गाधवड उपकेंद्राची देखील अत्यंत दुरावस्था झालेली असून सदर ठिकाणचे छत केव्हाही पडल अशा स्थितीत आहे.

जिल्हा आरोग्य अधिकारी :- सदर उपकेंद्र डिसमेंटल करून नवीन उपकेंद्र इमारतीची मागणी प्रस्तावित केलेली असून तात्पुरत्या दुरुस्तीची देखील व्यवस्था करण्यात आलेली आहेत.

सन्मा.सदस्य श्री.शेरे रामलिंग शेषेराव :- प्रा.आ.केंद्र वलांडी येथील दैनंदिन ओ.पी.डी. ही अंदाजे ३०० पेक्षा अधिक आहे. त्या ठिकाणी अपुरा कर्मचारी वृंद असून, सोयी सुविधांचा अभाव असून तातडीने योग्य त्या उपायोजना करण्यात याव्यात. सद्यस्थितीत केवळ एकच वैद्यकिय अधिकारी कार्यरत आहेत.

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी :- त्या ठिकाणचे एक वैद्यकीय अधिकारी हे प्रसूती रजेवर असून तात्पुरती प्रतिनियुक्ती तात्काळ करण्यात यावी. तसेच सेवकांच्या बाबतीत सा.प्र.वि. शी समन्वय करून तात्काळ व्यवस्था करण्यात यावी.

सन्मा.सदस्य श्री.शेरे रामलिंग शेषेराव:- मी २०२४ मध्ये जवळगा व दवन हिप्परगा प्रा.आ.केंद्रासंदर्भात पत्रव्यवहार करत आहे परंतु अद्यापही विभागाकडून योग्य ती कार्यवाही झालेली नाही व माझे निवेदनावर विभागाकडून उत्तरही मिळालेले नाही. सदस्य दोन्ही ठिकाणी जागेचा अभाव आहे.

जिल्हा आरोग्य अधिकारी :- पंधरावा वित आयोगामध्ये सदर दोन्ही जवळगा व दवन हिप्परगा प्राथमिक आरोग्य केंद्र करता निधीची मागणी आपण केलेली आहे. त्याचबरोबर NHM अंतर्गत देखील निधीची मागणी नोंदविण्यात येत आहे.

सन्मा.सदस्य श्री.पांचाळ औदुंबर रामदास :- माझे मतदार संघातील मौ.होनाळी येथे उपकेंद्र मंजुरीसाठी मी सरपंच असल्यापासून पाठपुरावा करत असून उपकेंद्रासाठी देखील प्राधान्याने विचार करण्यात यावा. तसेच मी नुकतीच आशा कार्यकर्त्यांची बैठक घेतली त्यात त्यांनी विविध माहिती ऑनलाईन करण्यासाठी अँन्ड्रॉईड फोन ची आवश्यकता नमूद केली असून सर्व आशा कार्यकर्तींना जिल्हा परिषदेच्या माध्यमातून विविध माहिती ऑनलाईन करण्यासाठी अँन्ड्रॉईड मोबाईल देण्यात यावा असा ठराव मांडत असून त्यास सभागृहाने अनुमोदन यावे ही विनंती.

सन्मा.सदस्या श्रीमती सोनाली रमेश थोरमोटे :- आताच सन्मा.सदस्यांनी जो आशा कार्यकर्तींना मोबाईल देण्याची मागणी केली तो विषय अत्यंत महत्त्वाचा असून विविध ऑनलाईन कामकाज करण्यासाठी अद्ययावत असा 5G अँड्रॉइड मोबाईल देण्यात यावा. आवश्यकतेनूसार सी.एस.आर. किंवा बँका मार्फत किंवा आरोग्य विभागाच्या सेस मधून सर्व आशा कार्यकर्त्यांना एक अँड्रॉइड मोबाईल दिवाळीची भेट म्हणून देण्यात यावा.

मा.सभापती, पं.स. शिरुर अनंतपाळ :- सदर विषयास अनुमोदन असून केवळ मोबाईल न देता मोबाईल मध्ये 5g इंटरनेट सुविधेसह रिचार्ज देखील करून देणे आवश्यक आहे.

सन्मा.सदस्य श्री.गायकवाड माणिक दौलतराव :- सन्माननीय सदस्यांनी नमूद केलेला विषयास माझे अनुमोदन आहे. गाव खेडयांमध्ये कामकाज करत असताना चांगली व तत्पर आरोग्य सेवा उपलब्ध होणे आवश्यक आहे.

<u>ठराव क्र.</u> **(४२) मौ.होनाळी ता.देवणी येथे उपकेंद्र मंजुरीस मान्यता व आशा कार्यकर्तीना विविध माहिती ऑनलाईन करण्यासाठी अद्ययावत असा 5G अँड्रॉइड मोबाईल देण्याबाबतचा ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.**

सुचक :- सन्मा.सदस्य श्री.पांचाळ औदुंबर रामदास

अनुमोदक :- सन्मा.सदस्य श्री.गायकवाड माणिक दौलतराव

जिल्हा आरोग्य अधिकारी:-सदर विषय हा राज्य शासनस्तरावरील असून याबाबत शासनस्तरावर कळविण्यात येईल.

सन्मा.सदस्य श्री.पांचाळ औदुंबर रामदास :- नागराळ या ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र बांधकाम झालेले आहे परंतु त्या ठिकाणी निवासी सुविधा उपलब्ध नसल्याने शासकिय कर्मचा-यांसाठी निवासस्थाने बांधकाम करण्यात यावे ही विनंती.

सन्मा.सदस्य श्री.गुंडरे प्रफुलचंद्र निवृत्तीराव :- आताच सन्मा.सदस्यांनी अंबुलगा प्राथमिक आरोग्य केंद्राचा जो विषय मांडला त्यामध्ये जि.आ.अ. यांनी सात दिवसात कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. परंतु या बाबतीत माझा अनुभव वेगळा आहे मी सातत्याने जि.आ.अ. यांना विविध विषय सांगितले परंतु त्यांनी त्याची नोंद देखील घेतली नाही व आश्वासनाची पूर्तता देखील केलेली नाही. मी विचारलेल्या प्रश्नांवर काय कार्यवाही झाली हे कुठेही दिसून येत नाही. सदर विषयांसाठी मी जिल्हा आरोग्य अधिकारी यांना मागील सात महिन्यापासून वारंवार भेटण्याचा प्रयत्न केला परंतु ते एकदाही भेटले नाहीत. याबाबत त्यांनी स्वतःवर काय कार्यवाही करून घेणार आहेत ते सांगावे.

जिल्हा आरोग्य अधिकारी :- सन्मा.सदस्यांनी माझ्याकडे जे दोन विषय नमूद केले होते त्यातील एका विषयाची सन्मा.सदस्यांना माहिती दिलेली असून दुस-या विषयाची माहिती सन्माननीय सदस्यांना देऊ शकलो नाही त्याबाबत दिलगिरी व्यक्त करतो. यापुढे सन्माननीय सदस्यांना सात दिवसात उत्तर दिले नाही तर मी कार्यवाहीस पात्र राहील

सन्मा.सदस्य श्री.दिलीपकुमार मारोती मटके :- मी मागील सहा महिन्यापासून प्राथमिक आरोग्य केंद्र हेर या ठिकाणी एक परिचर कर्मचारी देण्याबाबत पाठपुरावा करत आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी देखील सकारात्मक उत्तरे दिलेली आहेत. परंतु आजही त्या ठिकाणी परिचर दिलेला नाही याबाबत आपण काय कार्यवाही करून घेणार. आपण सभागृहामध्ये काय उत्तर देत आहेत याबाबत आपणास काही तरी वाटू द्या. आपण व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी देखील एक परिचर उपलब्ध करून देण्याचे मान्य केले होते व आता वेगळीच माहिती दिली जात आहे.

जिल्हा आरोग्य अधिकारी :- परिचर हा संवर्गाची आस्थापना सामान्य प्रशासन विभागाअंतर्गत असून त्याबाबत सा.प्र.वि.ने कार्यवाही करणे आवश्यक आहे. तसेच स्थानिक स्तरावर कंत्राटीतत्वावर परिचर घेण्याचे अधिकार रुग्ण कल्याण समिती यांना असून सर्व संबंधित ता.आ.अ. व वैद्यकिय अधिकारी यांना तसेच निर्देश देण्यात येत आहेत.

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी :- आपल्याकडे वर्ग ४ परिचर संवर्गीय कर्मचा-यांची अत्यंत कमतरता असून भविष्यकाळात उर्वरित परिचर यांना देखील आरोग्य सेवक पदावर पदोन्नती दिली जाणार आहे. यासंदर्भात प्राथमिक आरोग्य केंद्रावर आय.पी.डी. सर्जरी केली जाते त्याचे बिल त्यांनी विहित ठिकाणी संकलित करून सदर माहिती केंद्र शासनाकडे सादर केले जाते. आरोग्य विभागाने आतापर्यंत जवळपास १५ ते २० लक्ष रुपयांचे

बिल टाकले आहेत व त्या रकमेतून त्यांना प्राथमिक आरोग्य केंद्राचे ठिकाणी आवश्यकतेनुसार परिचय कंत्राटी किंवा डेली वेजेस वर घेता येतील.

सन्मा.सदस्य श्री.दिलीपकुमार मारोती मटके :- हाच विषय जर आपण मागील चार महिन्यापूर्वीच सांगितला असता तर मी संबंधित प्राथमिक आरोग्य केंद्राचे गावास परिचर देण्यात येणार असल्याबाबत आश्वासन दिले नसते. आपण एवढे जबाबदार अधिकारी असून आपण जर मला यापूर्वी सांगितले असते की परिचर देता येणार नाही तर मी त्या गावाला जाऊन शब्द दिला नसता. जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी मला परिचय देण्याचे मान्य केले होते का हे सांगावे.

जिल्हा आरोग्य अधिकारी :- आपण स्थायी समितीमध्ये विषय मांडल्यानंतर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या निर्देशानुसार मी संबंधित वैद्यकीय अधिकारी व तालुका आरोग्य अधिकारी यांच्याशी चर्चा स्थानिक स्तरावर कंत्राटीतत्वावर परिचर घेण्याबाबत संबंधितांना सुचित केलेले आहे.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी साप्र तथा सचिव :- सन्माननीय सदस्यांनी तीन-चार महिन्यापूर्वी पासून हा विषय सादर केलेला असून त्यावेळी सन्माननीय सदस्यांना प्राथमिक आरोग्य केंद्र हेर येथे परिषद देण्याबाबत मान्य ही केलेले आहे परंतु परिचरांच्या रिक्त पदांच्या संख्येचा विचार करता परिचर देणे अशक्य झालेले आहे.

जिल्हा आरोग्य अधिकारी :- पुढील ३ दिवसात सन्माननीय सदस्यांनी नमूद केलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्र हेर येथे डेली वेजेस वर कंत्राटी तत्वावर परिचर कर्मचारी देण्यात येत आहे.

सन्मा.सदस्य श्री.गुंडरे प्रफुलचंद्र निवृत्तीराव :- मागील वेळी अंधोरी प्रा.आ.केंद्र, दुरुस्ती संदर्भातील एक विषय सादर केला होता त्यावर काय कार्यवाही झाली. यावेळी आपण त्यावेळी आपण सदर प्राथमिक आरोग्य केंद्राचे स्ट्रक्चरल ऑडिट करून घेण्यात येत असल्याचे नमूद केले होते. आजच्या उतरात आपण स्ट्रक्चरल ऑडिटचा अहवाल प्राप्त नसल्याचे सांगितले आहे. अंधोरी जिल्हा परिषद गट हा तीन प्रा.आ.केंद्र अंतर्गत येतो यामध्ये जन आरोग्य समिती स्थापन करत असताना काय नियम आहेत याची मला माहिती देण्यात यावी. जन आरोग्य समितीचा सदस्य म्हणून आपण निवड केली का याची माहिती देण्यात यावी. अंधोरी जिल्हा परिषद गट अंतर्गत किती प्रा.आ.केंद्र येतात व त्या गटातील सन्माननीय सदस्यांना किती प्रा.आ.केंद्राच्या च्या ठिकाणी प्रतिनिधित्व दिलेले आहे याची माहिती यावी. किनगाव, व शिरूर प्रा.आ.केंद्रांचा चा समावेश आंधोरी गटातील जि.प. गटात येत असून असून किनगाव व शिरूर या ठिकाणी समितीचे अध्यक्ष व सदस्य कोण राहतील. एवढे दिवस मी त्या समितीवर सदस्य म्हणून नियुक्त होण्यापासून वंचित राहिलो त्याची जबाबदारी कोणाची. सबंधित ता.आ.अ. यांच्यावर काय कारवाई करण्यात येणार.

जिल्हा आरोग्य अधिकारी :- जिल्ह्यातील १९ दवाखान्याचे स्ट्रक्चरल ऑडिट झालेले असून त्याचे अहवाल अद्याप आलेले नाहीत. १९ प्रा.आ.केंद्रांच्या स्ट्रक्चरल ऑडिटची तरतूद आपण बांधकाम विभागाकडे केलेली असून स्ट्रक्चरल ऑडिट झालेले आहेत परंतु अद्याप त्याचे अहवाल प्राप्त झालेले नाहीत. ज्या मतदार संघातील नागरिकांची संख्या जास्त असेल ते सन्माननीय सदस्य हे त्या जन आरोग्य समितीचे अध्यक्ष राहतील व ज्या इतर सन्माननीय सदस्यांच्या देखील मतदारसंघातील भाग येत असेल त्या सामान्य सदस्यांना समितीचा सदस्य करणे अपेक्षित आहे. सन्माननीय सदस्य नमूद करत असलेल्या अंधोरी जिल्हा परिषद गटातील जन आरोग्य समितीचे अध्यक्ष व सदस्य नियुक्त केले आहेत किंवा कसे याची तालुका आरोग्य अधिकारी कडून माहिती घेवून सन्माननीय सदस्यांना अवगत करण्यात येत आहे. सन्माननीय सदस्यांनी निदर्शनास आणून दिलेल्या मुद्द्याच्या अनुषंगाने संबंधित ता.आ.अ. व वैद्यकिय अधिकारी यांना सात दिवसात समिती स्थापन करून सन्माननीय सदस्यांना समितीचे सदस्य करण्याबाबत निर्देश देण्यात येतील..

मा.सभापती, (आरोग्य व बांध) :- सन्मा.सदस्यांच्या मतदार संघातील लोकसंख्या ज्या प्रा.आ.केंद्राच्या क्षेत्रामध्ये सर्वाधिक आहे ते त्या ठिकाणचे सदस्य हे त्या समितीचे अध्यक्ष राहतात तर ज्या जिल्हा परिषद गटातील

लोकसंख्या त्या प्रा.आ.कें. मध्ये क्रमाने कमी आहेत ते सन्माननीय सदस्य त्या समितीचे सदस्य राहतात याप्रमाणे आरोग्य विभागाने सर्व ठिकाणी अध्यक्ष व सदस्य नियुक्त झालेले आहेत का याची माहिती सन्माननीय सदस्यांना तात्काळ उपलब्ध करून यावी.

मा.उपाध्यक्ष महोदय :- विभागाकडून ही चूक झालेली असून त्यामध्ये तात्काळ सुधारणा करण्यात याव्यात व सन्माननीय सदस्यांना त्यांचे मतदारसंघातील तीनही प्रा.आ.कें. ठिकाणी मतदारसंघातील लोकसंख्येच्या क्रमानुसार अध्यक्ष, सदस्य म्हणून निवड करावी.

सन्मा.सदस्य श्री.मस्के महादेव प्रभाकर :- सभागृहामध्ये महापुरुषांचे फोटो लावण्यात आलेले आहेत परंतु यामध्ये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचे देखील फोटो तात्काळ लावण्यात यावेत.

सन्मा.सदस्य श्री.नागराळे अश्विन धोंडीराम :- लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या फोटोच्या बाजूला स्वर्गीय उपमुख्य मंत्री अजित दादा पवार यांचा देखील फोटो लावण्यात यावा.

मा.उपाध्यक्ष महोदय :- बांधकाम विभागाने याची नोंद घेऊन तात्काळ कार्यवाही करावी व महापुरुषांचे फोटो लावण्यात यावेत. सद्यस्थितीत विधानपरिषद निवडणुकांच्या आदर्श आचारसंहिता लागू असून याबाबतची खातर जमा करून सन्माननीय सदस्यांनी नमूद केलेल्या प्रमाणे कार्यवाही अनुसरावी.

सन्मा.सदस्य श्री.पटेल शाहिद लाला :- निलंगा तालुक्यातील दापका हे मोठे गाव असून त्या ठिकाणी उपकेंद्राची अत्यंत आवश्यकता आहे. उपकेंद्राच्या प्रस्ताव सादर केलेला आहे त्यास तात्काळ मंजुरी देण्यात यावी.

मा.उपाध्यक्ष महोदय :- विधानपरिषद निवडणुकांच्या आचारसंहितेचा असल्याने सदर विषय आजच्या बैठकीत घेता येणार नाही. तथापि विभागाने याबाबत नोंद घेवून योग्य ती कार्यवाही अनुसरावी.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी साप्र तथा सचिव :- सन्माननीय सभागृहाच्या हे अवगत करण्यात येते की आज पासून विधानपरिषद निवडणुकांची आदर्श आचारसंहिता लागू झालेली असून विधानपरिषद निवडणुकांचा कार्यक्रम सर्व सन्मा.सभागृहास देण्यात येत आहे. त्यामुळे सद्यस्थितीत आचारसंहिता लागू असल्यामुळे आजच्या जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेमध्ये आयत्या वेळेचे तसेच धोरणात्मक विषय घेतले जाणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी.

सन्मा.सदस्य श्री.गायकवाड माणिक दौलतराव :- लातूर जिल्ह्यामध्ये खाजगी प्राथमिक व माध्यमिक शाळांचे ११० शिक्षक अतिरिक्त झाल्याची माहिती मला प्राप्त आहे. त्या शिक्षकांना बसून वेतन दिले जात आहे त्यांना कुठलेही काम नाही तेव्हा जिल्हा परिषदेच्या ज्या शाळांच्या ठिकाणी शिक्षकांची आवश्यकता आहे अशा ठिकाणी या खाजगी अतिरिक्त शिक्षकांना तात्पुरत्या स्वरूपात तात्काळ देण्यात यावे.

सन्मा.सदस्य श्री.शेरे रामलिंग शेषेराव :- जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणावर शिक्षकांची कमतरता असल्याचे वेळोवेळी सांगितले जाते. या संदर्भात मागील कालावधीत पवित्र पोर्टल मार्फत इतर जिल्हा परिषदांमध्ये शिक्षक भरतीची प्रक्रिया राबविली गेली आहे. मग लातूर जिल्ह्यामध्ये त्यावेळी शिक्षक भरती का केली गेली नाही पवित्र पोर्टल मार्फत. शिक्षकांची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त असून सुद्धा पवित्र पोर्टल मार्फत भरती प्रक्रिया का राबविली गेली नाही.

सन्मा.सदस्य श्री.बिरादार तानाजी विनायक :- राज्यातील सर्वच जिल्ह्यामध्ये पवित्र पोर्टल मार्फत भरती प्रक्रिया राबविली गेली होती मग आपल्या जिल्ह्यात जागा रिक्त असताना देखील पवित्र पोर्टल मार्फत भरती प्रक्रिया का राबवली गेली नाही. निलंगा तालुक्यातील सर्वच जिल्हा परिषद शाळांच्या ठिकाणी शिक्षकांची बरीच पदे रिक्त आहेत. निलंगा तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणात जागा रिक्त आहेत मा.संभाजी पाटील निलंगेकर साहेब

पालकमंत्री असताना एकदा सदरची पदे भरली गेली होती तेव्हापासून आज पावतो निलंगा तालुक्यात शिक्षकांची पदे रिक्त आहेत.

शिक्षणाधिकारी (प्रा.) :- प्राथमिक पदवीधर ची आपल्याकडे जवळपास १९० पदे रिक्त आहेत. याबाबतीत बिंदू नामावली अंतिम करण्याचे काम सध्या सुरु आहे. पवित्र पोर्टलच्या पहिल्या जाहिराती वेळी आपल्याकडे शिक्षकांची बहुतांश पदे अतिरिक्त होती साधारण जून महिन्यामध्ये आपल्याकडे सेवानिवृतीमुळे शिक्षकांची पदे रिक्त झालेली आहेत. पवित्र पोर्टल द्वारे आपण २०२४ मध्ये भरती प्रक्रिया राबवली होती. दरम्यानच्या काळात काही प्राथमिक शिक्षक अतिरिक्त होते त्यामुळे आपल्याला भरती प्रक्रिया राबविता आली नाही. परंतु मागील तीन महिन्याच्या कालावधीत जवळपास १५० कर्मचारी सेवानिवृत झालेले आहेत. त्यामुळे आता प्राथमिक पदवीधर ची जवळपास १८० पदे पदभरतीसाठी उपलब्ध झालेली आहेत.

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी :- शिक्षण विभागाने बिंदू नामावली तात्काळ अद्ययावत करून घ्यावी व आगामी भरती मध्ये जिल्हा परिषद अंतर्गत सर्व रिक्त पदे १०० % भरुन घेण्यात येतील याची नोंद घ्यावी.

मा.सभापती पं.स. शिरुर अनंतपाळ :- ब-याच गावामध्ये शिक्षक तसेच ग्रामसेवक हे मुख्यालयी राहत नाहीत त्यांना बायोमेट्रिक उपस्थिती बंधनकारक करण्यात यावी. क्षेत्रभेटीदरम्यान ब-याच वेळेस कर्मचारी उपस्थित नसल्याचे प्रकार दिसून येतात. शिक्षक व ग्रामसेवकांनी त्यांच्या गावात जाऊन बायोमेट्रिक करणे आवश्यक आहे का याबाबत शासन निर्णय असल्यास देण्यात यावेत.

सन्मा.सदस्य श्री.गायकवाड माणिक दौलतराव :- शिक्षकांच्या निवड श्रेणीचे काम थांबलेले आहे. तसेच नुकतेच मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा परिषदेच्या शाळेचे सर्वेक्षणास बाबत सर्व शिक्षकांना निर्देश दिले असून शाळेमध्ये काय सोयी सुविधा आहेत जसे फॅन, स्वच्छतागृहे, लाईट बाबतचे सर्वेक्षण केले जात आहे. याबाबतीत माजी सभागृहात विनंती आहे की एखाद्या व्यक्तीने आंदोलनच उभा केल्यानंतर आपण शासन म्हणून आपण सर्वेक्षण करता परंतु या गोष्टीची माहिती आपण यापूर्वीच का घेतली गेली नाही व तातडीने जिल्हा परिषदेच्या शाळांना उपायोजना का केल्या गेल्या नाहीत.

शिक्षणाधिकारी (प्रा.) :- शिक्षकांच्या बायोमेट्रीक उपस्थितीसंदर्भात शासनाने नुकतेच एक पोर्टल विकसीत केले असून त्याद्वारे शिक्षकांची दैनंदिन उपस्थिती घेतली जाणार आहे. जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये सदर पोर्टलची लवकरच अंमलबजावणी करण्यात येत आहे.

मा.सभापती पं.स. शिरुर अनंतपाळ :- भोजनगर येथे असलेल्या जिल्हा परिषदेतील शालेय विद्यार्थ्यांची संख्या जवळपास २७७ असून शालेय विद्यार्थ्यांना वर्गखोल्यांची संख्या कमी परत आहे. याठिकाणी वर्गखोल्यांसाठी जागेचीही कमतरता आहे. तेव्हा दोन मजली इमारत करण्यात यावी. वर्गखोल्यांअभावी विद्यार्थी प्रवेश नाकारण्याची वेळ आलेली आहे. तसेच त्या ठिकाणी सोलार ची देखील व्यवस्था तात्काळ करण्यात यावी. ३० वर्षापूर्वीची इमारत आहे. तसे लेखी पत्र देखील दिलेले असून तातडीने कार्यवाही अनुसरण्यात यावी. शिरूर अनंतपाळ नगरपंचायत अंतर्गत दहा जिल्हा परिषदेच्या अंगणवाड्या असून त्या अंगणवाड्यांची स्थिती देखील अशीच आहे त्या देखील दुरुस्ती करण्याची आवश्यकता आहे. शिरूर अनंतपाळ तालुक्यातील प्रत्येक शाळेच्या पटसंख्या वाढलेली असे आहे परंतु त्या ठिकाणी शिक्षकांची कमतरता व भौतीक सुविधांचा अभाव आहे.

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी :- शिक्षणाधिकारी व जिल्हा कार्यक्रमाधिकारी (महिला व बालविकास) यांनी विषयाची नोंद घेऊन शाळा किंवा अंगणवाडी शहरी हद्दीत असल्या तरी त्या जिल्हा परिषदेच्या असल्याने तात्काळ आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात.

मा.उपाध्यक्ष महोदय :- भोजनगर येथील शाळेच्या इमारतीसाठी आवश्यक ती उपायोजना करण्यात येत आहे. तसेच सोलर देखील जिल्हा परिषदेच्या माध्यमातून लवकरात लवकर बसविण्याबाबत विभागाने नोंद घ्यावी.

समायोजनामध्ये त्या ठिकाणी बरीचशी पदे भरण्यात आलेली आहेत तसेच अजूनही वेळोवेळी शिक्षक देण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

सन्मा.सदस्य श्री. सोमवंशी दिपक संग्राम :- उदगीर मधील मादलापूर शाळेवर दोन शिक्षक असून त्यातील एक शिक्षकाचा अपघात झाल्याने त्याला मागील पाच वर्षांपासून बोलता येत नाही अशा शिक्षकाकडून विद्यार्थ्यांना अध्यायपणाचे काय काम झाले असेल. यावर काय कार्यवाही झाली आहे याची माहिती द्यावी. त्या ठिकाणची इमारत मोडकळीस आलेली आहे तसेच पटसंख्या देखील कमी आहे. तेव्हा मादलापूर मध्ये नवीन वस्तीमध्ये जिल्हा परिषदेची आणखी एक शाळा असून ही शाळा देखील त्या नवीन वस्तीच्या शाळेत स्थलांतरीत करावी. जुन्या वस्तीतील शाळेला संरक्षण भिंत वगैरे काहीही उपाययोजना नाहीत त्यामुळे नवीन वस्तीमध्ये ती शाळा स्थलांतरित/एकत्रित करण्यात यावी.

उपशिक्षणाधिकारी (प्रा.) :- आपण जिल्ह्यातील सर्व शाळांचा नुकतेच सर्वेक्षण केलेले असून प्रत्येक विषयाची प्रश्नावली मध्ये माहिती घेतलेली आहे. मादलापूरच्या बाबतीत गटशिक्षणाधिकारी यांच्याकडून अहवाल घेऊन ८ दिवसात योग्य ती कार्यवाही करून सन्माननीय सदस्यांना अवगत करण्यात येईल.

सन्मा.सदस्य श्री.गायकवाड माणिक दौलतराव :- मागील जि.प. सर्वसाधारण सभेमध्ये जिल्हयातील ज्या शाळा ४ थी पर्यंत आहेत त्याठिकाणचे दोन वर्ग डिजीटल करावेत असा विषय मांडला होता.

मा.उपाध्यक्ष महोदय :- या संदर्भात आपण जिल्ह्यातील सर्व शाळांचे स्ट्रक्चरल ऑडीट करून घेतले आहेत. तसेच शाळा दुरुस्ती व वर्ग खोल्या बांधकामासाठीचा एकत्रित आराखडा देखील तयार केले असून विधानपरिषद आदर्श आचारसंहिता लागू झाल्यामुळे पुढील कार्यवाही थांबलेली आहे. तसेच मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे देखील कौतुक करणे आवश्यक आहे त्यांनी कालबद्ध कार्यक्रम राबवून जिल्ह्यातील सर्व शाळांचे सर्वेक्षण पूर्ण केले आहे व या माहितीच्या आधारे आपल्याला लवकरच प्रत्येक शाळेला आवश्यक त्या सोयी सुविधा पुरविता येतील.

सन्मा.सदस्य श्री. सोमवंशी दिपक संग्राम :- शिक्षणाधिकारी/ उपशिक्षणाधिकारी म्हणून आपण जिल्ह्यातील शाळांना भेटी देणे आवश्यक आहे व आपल्या अधिनिस्त क्षेत्रीय अधिकारी यांनी देखील जिल्हा परिषद शाळांना भेटी देणे आवश्यक आहे परंतु त्याप्रमाणे कार्यवाही होत नसल्याचे दिसून येते.

सन्मा.सदस्य श्री. नागरगोजे सुनिल गणपतराव :- जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांची पटसंख्या वाढविण्यासाठी आपण काय प्रयत्न करतात.

उपशिक्षणाधिकारी (प्रा.) :- यासंदर्भात आपण प्रत्येक वर्षी माहे जुन मध्ये पटसंख्या वाढविण्यासाठी गुढीपाडवा व पट वाढवा हे अभियान राबविलेले असून वेळोवेळी जिल्हा परिषद शाळांची पटसंख्या वाढविण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

सन्मा.सदस्य श्री.दिलीपकुमार मारोती मटके :- आपल्याकडे महाप्रीत नावाची एक संस्था असून या संस्थेच्या माध्यमातून पाणीपुरवठा योजना, पाणी शुद्धीकरण केंद्र, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प, किंवा इतर शासकिय कार्यालय असतील अशा सर्व प्रकल्पाच्या ठिकाणी तसेच पथदिवे या ठिकाणी सोलार यंत्रणा बसविण्याचे काम या संस्थेद्वारा केले जाणार असून तसा सविस्तर आराखडा संबंधित संस्थेकडून तयार केला जात असल्याचे ज्ञात आहे. आपल्याकडे बांधकाम विभागाअंतर्गत ही कामे करण्यासाठी स्वतंत्र तांत्रिक कर्मचारी, अभियंता असताना देखील अशा प्रकारे जर इतर संस्थेद्वारे ही कामे केली जाणार असेल तर जिल्हा परिषद सदस्य म्हणून आपला काय उपयोग. असे घडले तर जिल्हा परिषद सदस्यांना कुठलेही अधिकार राहणार नाहीत त्यामुळे आजच्या बैठकीमध्ये असा निर्णय घेण्यात यावा की शासनाने नियुक्ती केलेल्या या संस्थेला आमचा विरोध विरोध असून अशा प्रकारे कुठलीही संस्था जिल्हा परिषदेमध्ये काम करणार नाही. असे सभागृहाचे म्हणणे असून तसा ठराव आजच्या जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेमध्ये घेण्यात यावा.

सन्मा.सदस्य श्री.गुंडरे प्रफुलचंद्र निवृत्तीराव :- सदर विषय अतिशय गंभीर असून जिल्हा परिषद सदस्यांना कुठलेही अधिकार राहणार नाहीत.

सन्मा.सदस्य श्री.गायकवाड माणिक दौलतराव :- सन्मा.सदस्यांनी नमूद केलेला विषय अत्यंत महत्त्वाचा आहे वास्तविक पाहता आज आठ महिने जिल्हा परिषदेमध्ये लोकनियुक्त पदाधिकारी येऊन झाले असून अजूनही कुठलेही विकास कामे घेता आलेली नाही. अशात अशा संस्थांद्वारे काम करणे कितपत योग्य राहील. सन्माननीय सदस्यांनी मांडलेल्या ठरावास माझे अनुमोदन आहे.

सन्मा.सदस्या श्रीमती सोनाली रमेश थोरमोटे :- जिल्हा परिषद सदस्यांच्या अधिकारावर यामुळे गदा येत आहे. त्यामुळे शासन स्तरावर तसे कळविण्यात यावे.

सन्मा.सदस्या श्रीमती आशा शिवाजीराव भिसे :- सदर ठरावास सर्व सभागृहाचे अनुमोदन आहे याची नोंद घेण्यात यावी.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.) :- महाप्रीत ही शासनाने नियुक्त केलेली संस्था आहे व त्या संस्थेद्वारे शासनाने सदर कंपनीला शासनाने काम दिले असून कंपनीचा शासनासोबत करार झालेला आहे. जिल्ह्यातील जेवढ्या शासकीय प्रशासकीय संस्था आहेत त्या संस्था कार्यालयांना, ग्राम पंचायत इमारती, छतावर ज्या ठिकाणी जागा उपलब्ध आहे अशा सर्व ठिकाणाचे सर्वेक्षणाचे काम संबंधित कंपनीने करावे असे शासनाने निर्देशित केले आहे.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी साप्र तथा सचिव :- जिल्हा परिषदेचे कामकाज चालविण्याच्या अधिनियमातील तरतुदीनुसार शासनाच्या धोरणाविरुद्ध आपल्याला ठराव घेता येणार नाही तथापि जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेचे मत शासनास कळविण्यात येईल.

सन्मा.सदस्य श्री. सोमवंशी दिपक संग्राम :- निडेबन हे गाव उदगीर शहरालगतचे गाव असून त्या ठिकाणी स्वच्छतेचा अतिशय गंभिर प्रश्न निर्माण झाला आहे. सदर ठिकाणी विभागाच्या अधिका-यांनी तात्काळ प्रत्यक्ष भेट देवून स्वच्छतेच्या अनुषंगाने उपाययोजना करणे आवश्यक आहे. त्याठिकाणचा कचरा उचलण्यासाठी तातडीने घंटा गाडी देण्यात यावी.

उप.मु.का.अ. (पा.व स्व.) :- सदर ठिकाणी मी व्यक्तीश लक्ष देऊन आवश्यक उपाययोजना करण्याची नोंद घेण्यात येत आहे.

सन्मा.सदस्या श्रीमती आशा शिवाजीराव भिसे :- रेणापूर गट शिक्षणाधिकारी हे उपस्थित होऊन पंधरा दिवस झालेले असून अद्याप त्यांच्या सहीचा नमुना बदललेला नसल्यामुळे विविध कामकाज करण्यात अडचणीचे आहेत.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी साप्र तथा सचिव :- रेणापुर पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी श्री भराड़ीया हे रजेवर होते रजेवरून उपस्थित झाल्यानंतर शिक्षण विभागाने उपस्थिती अनुषंगाने संचिका सा.प्र.वि. मार्फत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे सादर केली होती. परंतु पदभार सोपवत असताना शिक्षण विभागाने नेमका कोणाला आदेश देण्यात येत आहे याचा उल्लेख नसल्यामुळे संचिका विभागास परत पाठवून तात्काळ फेरसादर करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार संचिका फेरसादर होऊन आजच मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदयांकडे सादर केलेली आहे.

सन्मा.सदस्या श्रीमती आशा शिवाजीराव भिसे :- दीपावलीच्या सुट्टीचे शिक्षण विभागाने काय नियोजन केलेले आहे याची माहिती द्यावी. तसेच शालेय विद्यार्थ्यांच्या गणवेशाचे पैसे अद्यापही देणे बाकी आहेत. शालेय पोषण आहार शिजविणा-या कर्मचा-याचे देखील मानधन अद्याप आदा करण्यात आलेले नाही.

शिक्षणाधिकारी (प्रा.) :- दीपावलीच्या सुट्टी अनुषंगाने संचिका मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे निर्णयास्तव सादर करण्यात येत असून साधारणतः दिनांक ५-नोव्हेंबर पासून दीपावलीच्या सुट्टी लागू केल्या जाणार आहेत.

गणवेषा बाबतीत सुरुवातीस आपल्याकडे प्रति विद्यार्थी प्रत्येक ड्रेसला तीनशे रुपये प्रमाणे निधी मंजूर झाला होता. त्याची ८० टक्के रक्कम म्हणजेच २४०/- रुपये प्रति गणवेश याप्रमाणे शासनाने मंजूर केले होते परंतु दरम्यानच्या काळात SNA Sparsh प्रणाली लागू झाली व प्रति विद्यार्थी दोन ड्रेस साठी सहाशे रुपये याप्रमाणे अंदाजे रु.३.०० कोटी विभागाकडे प्राप्त झाले असून सर्व निधी मागील सप्ताहात सर्व शाळांना वर्ग केला आहे. सदर शालेय गणवेश हे संबंधित शालेय व्यवस्थापन समितीने खरेदी करावयाचे आहेत यापूर्वी एक गणवेश शालेय विद्यार्थ्यांना पुरविण्यात आलेला आहे. शालेय पोषण आहार शिजवणा-या स्वयंपाकी व मदतनीस यांचे मानधनाची रक्कम शासन स्तरावरुन प्राप्त झालेली नाही सदर रक्कम शासन स्तरावरुन प्राप्त होताच सर्व कर्मचा-यांच्या खात्यावर वर्ग केली जाणार आहे.

सन्मा.सदस्य श्री. नागरगोजे सुनिल गणपतराव :- शिक्षणाधिकारी माध्यमिक श्रीमती कुंभार मॅडम यांनी लाल बहादूर शास्त्री विद्यालय माध्यमिक व उच्च माध्यमिक येथे सेवाजेष्ठतेनुसार श्री सौंदागर लहाने यांची नेमणूक न करता सेवा जेष्ठता डावलून श्री गोरे यांची नियुक्ती केलेली आहे याबाबत खुलासा करावा.

शिक्षणाधिकारी (मा.) :- यासंदर्भात जेव्हा दुस-या गटाचे आक्षेप प्राप्त झाले तेव्हा आपण प्रकरणात सुनावणी घेतली. सुनावणी दरम्यान दोन्ही गटांनी मा.उच्च न्यायालयाचे आदेश सादर केले आहेत त्या आदेशानुसार शाळेकडून माहिती मागवली असून नियमानुसार योग्य ती कार्यवाही अनुसरण्यात येईल व सन्मा. सदस्यांना अवगत करण्यात येईल.

सन्मा.सदस्या श्रीमती गोरे सईताई पृथ्वीराज :- औसा पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी हे त्यांना दिलेले आदेश डावलून इतरांना सहकार्य करत आहेत. औसा तालुक्यातील भादा येथे नवीन शाळेचे बांधकाम करत असताना ग्रामपंचायतीने उपोषण केले. तरीदेखील संबंधित गुत्तेदाराने त्या ठिकाणी बांधकाम सुरू केले आहे. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नोंद घेऊन योग्य ती कार्यवाही करावी. बांधकामास दिनांक २६-सप्टेंबर पर्यंत स्थगिती दिलेली असतानाही शाळेचे बांधकाम सुरूच आहे.

शिक्षणाधिकारी (प्रा.) :- भादा येथील शाळेच्या संदर्भात दोन्ही शाळा एकत्रित भरत असून ज्या ठिकाणी नवीन इमारत बांधकाम केली जाणार आहे ती जमीन ग्रामस्थांनी दानपत्राद्वारे जिल्हा परिषदेला दिलेली आहे. तसेच मुलांची व मुलींची शाळा एकत्रित करण्याचे शासनाचे धोरण असून त्यानुसार सदर शाळा एकत्रितपणे भरवली जात आहे.

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी :-या संदर्भात शिक्षण विभागाचा ऑक्टोबर-२०२४ मध्ये शासन निर्णय प्राप्त असून त्यानुसार दोन्ही शाळांचे एकत्रीकरण केलेले आहे. अशा जिल्ह्यातील सर्व शाळांचा शोध घेऊन त्यांच्या एकत्रिकरणाचा प्रस्ताव मा.आयुक्तांना सादर केला जाणार आहे. त्यानुसारच भादा शाळेच्या एकत्रीकरणास मा.शिक्षण आयुक्त महोदयांनी मान्यता देऊनच एकत्रीकरण केलेले आहे व एकच यु डायस क्रमांक दिलेला आहे.

सन्मा.सदस्या श्रीमती चव्हाण शालिनी रामदास :- लामजना येथे स्मार्ट प्राथमिक आरोग्य केंद्र मंजुर झाले असून त्याची वर्क ऑर्डर देखील झाली आहे. परंतु प्रत्यक्षात काम सुरु झालेले नाही. काम रखडण्याची कारणे काय आहेत. तसेच लामजना येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये वर्गखोल्यांची दुरावस्था झाली असून विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचे व आरोग्याचे यामुळे नुकसान होत आहे शाळेस नवीन वर्ग खोल्यांच्या दुरुस्तीसाठी किंवा बांधकामासाठी प्रशासनाचे आर्थिक वर्षात काय नियोजन केले आहे याची माहिती देण्यात यावी.

जिल्हा आरोग्य अधिकारी :- स्मार्ट प्रा.आ.केंद्र लामजनाचे काम पुढील ८ दिवसात सुरु करण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

सन्मा.सदस्या श्रीमती चव्हाण शालिनी रामदास :- फत्तेपूर येथील जि.प. शाळेच्या परिसरात अंगणवाडीसाठी स्वतंत्र खोली उपलब्ध नसल्यामुळे बालकांच्या संगोपनात आणि शिक्षणात अडचणी येत आहेत. फत्तेपूर शाळेच्या या समस्येचे निराकरण करण्यासाठी अंगणवाडी इमारती करण्यासंदर्भात प्रशासनाने काय नियोजन केले आहे व निधी कधी उपलब्ध करून दिला जाईल याची माहिती देण्यात यावी.

तसेच फत्तेपूर येथील जिल्हा परिषद शाळेची सहा खोल्यांची इमारत सध्या परस्पर खाजगी वाचनालयाच्या वापरात असल्याचे निदेर्शनास आले आहे. शाळेची इमारत खाजगी कामासाठी वापरण्यास परवाणगी कोणी दिली. तसेच विद्यार्थ्यांच्या हक्काच्या वर्गखोल्यांचा ताबा पुन्हा मिळवून शाळेच्या वापरासाठी तो कधी उपलब्ध करून दिला जाईल याची माहिती देण्यात यावी.

शिक्षणाधिकारी (प्रा.) :- फत्तेपूर शाळेची जुनी इमारत ही गावांमध्ये असून नवीन इमारत गावठाण भागामध्ये आहे. सदर शाळा नवीन इमारतीमध्ये स्थलांतरित झालेली आहे. इमारतीचा ताबा हा वाचनालयाला दिल्याचा कुठलाही लिखित दस्ताऐवज आपल्याकडे उपलब्ध नाही असे संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांनी लेखी कळविले आहे. यासंदर्भात संबंधित खाजगी वाचनालय चालकांस आपण लेखी कळविले आहे लेखी खुलासा मागवला आहे. संबंधित वाचनालय चालकाकडे जिल्हा परिषदेच्या कुठल्या दस्ताऐवज आहे का याबाबत विचारणा करण्यात आलेली असून सबंधिताकडे अभिलेखे नसल्यास नियामानुसार योग्य ती कार्यवाही अनुसरण्यात येईल.
सन्मा.सदस्या श्रीमती सोनाली रमेश थोरमोटे :- सदर जागा ही जिल्हा परिषदेची असून मागील ब-याच कालावधीपासून खाजगी व्यक्तीने त्या ठिकाणी वाचनालय सुरू केलेले आहे. एवढ्या दिवसात हा विषय कोणाच्याही निदर्शनास कसा आला नाही जिल्हा परिषदेच्या शाळेत विनापरवानगी खाजगी वाचनालय कसे सुरू राहू शकते.

मा.उपाध्यक्ष महोदय :- आपण संबंधित खाजगी व्यक्तीकडून त्यांच्याकडे कुठल्या पुराव्या आधारे जिल्हा परिषदेच्या शाळेत वाचनालय सुरू केलेले आहे याची मागणी केलेली असून जर तसे पुरावे त्यांनी देऊ शकले नाही तर आपण सदर इमारत रिकामी करून घेऊ.

सन्मा.सदस्या श्रीमती सोनाली रमेश थोरमोटे :- सन्मा.जि.प. सदस्या श्रीमती योगिता जाधव यांनी त्यांचे जि.प मतदारसंघातील काही विषय नमूद केले आहेत. औराद शहाजानी येथील जिल्हा परिषदेच्या शाळेस २०१२ मध्ये निर्लेखनास परवानगी दिलेली असून आज २०२६ आहे परंतु आजपर्यंत ही सदर इमारत पाडण्यात आलेली नाही जुनी इमारत आहे ती का पाडण्यात आली नाही याची माहिती देण्यात यावी. केंद्रीय प्राथमिक शाळा आहे. तेथे काही गंभीर घटना झाल्यास याची जबाबदारी कोणाची असेल.

कार्यकारी अभियंता (बांध) :- सदर शाळेच्या निर्लेखनास परवाणगी झालेली असून तातडीने इमारत पाडणे अनुषंगाने योग्य ती कार्यवाही अनुसरण्यात येत आहे.
सन्मा.सदस्या श्रीमती सोनाली रमेश थोरमोटे :- औराद शहाजानी येथील कोटमाळ रोड येथील जिल्हा परिषदेच्या शाळेला स्वतःची जागा नाही जागा उपलब्ध करण्यासाठी तातडीने कार्यवाही करावी. सन्माननीय सदस्या श्रीमती योगिता जाधव यांनी तसे लेखी प्रस्ताव देखील दिलेला आहे त्याप्रमाणे तात्काळ कार्यवाही अनुसरण्यात यावी.

मा.सभापती, पं.स. शिरूर अनंतपाळ :- आपल्या जिल्ह्यातील शैक्षणिक सुविधाच्या संदर्भाने ज्या काही कमतरता जिल्ह्यातील शाळांमध्ये आहेत त्याची माहिती घेऊन सर्व भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्ह्याचे पालकमंत्री महोदयांनी जिल्हा नियोजन समितीचा ३०% निधी या कामासाठी देण्याचे मान्य केले असून याबाबत सभागृहाच्या वतीने मा.पालकमंत्री महोदय यांचे अभिनंदन करतो. तसा ठराव आजच्या जि प सर्वसाधारण सभेत सादर करत असून कृपया सभागृहाने अनुमोदन द्यावे ही विनंती. तसेच जिल्हा परिषदेच्या प्रशासनाने जिल्हा परिषद शाळातील ज्या ज्या भौतिक सुविधांची कमतरता आहे त्याची नोंद घेऊन एक परिपूर्ण असा आराखडा तयार केला त्याबद्दलही जिल्हा परिषद प्रशासनाचे देखील अभिनंदन करतो.

सन्मा.सदस्या श्रीमती आशा शिवाजीराव भिसे :- जिल्हा परिषदेत सद्यस्थितीत विधानपरिषद निवडणुकांच्या आदर्श आचारसंहिता लागू असल्याने असा ठराव घेता येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

सन्मा.सदस्य श्री.भालेराव मुकेश भियाजी :- माध्यमिक शिक्षण विभागासंदर्भातील माझा विषय असून मागील कालावधीत शिक्षणाधिकारी (मा) यांना आम्ही उदगीर तालुक्याचे कामकाजा साठीचा विभाग हा उपशिक्षणाधिकारी (मा.) श्री.हाश्मी यांच्याकडून काढून श्री. क्षीरसागर यांच्याकडे देण्याबाबत विनंती केली होती. परंतु अद्यापही उदगीर तालुक्याचे कामकाज हे श्री.हाश्मी पाहत असून त्यांच्या कामकाजाबाबत खूप तक्रारी आहेत. तसेच शिक्षणाधिकारी (मा) श्रीमती कुंभार मॅडम यांनी पदाचा पदभार स्वीकारल्यापासून किती अपुव्हल दिले याचीही माहिती देण्यात यावी.

मा.उपाध्यक्ष महोदय :- सदर विषय हा शिक्षण विभागाच्या विषय समितीतील आहे याबाबत योग्य ती नोंद घेऊन कार्यवाही केली जाईल.

सन्मा.सदस्य श्री.दिलीपकुमार मारोती मटके :- संबंधिताच्या कामकाजाबाबत वारंवार तक्रारी येत असून विभागाने गांभीर्याने नोंद घ्यावी.

शिक्षणाधिकारी (मा.) :- पदभार स्वीकारल्यापासून मी दोन वैयक्तिक मान्यता दिलेले असून एक अनुकंपा प्रकरणातील वैयक्तिक मान्यता असून एक न्यायालयीन प्रकरणातील वैयक्तिक मान्यता दिलेली आहे. त्याची सविस्तर माहिती सन्माननीय सदस्यांना देण्यात येत आहे.

सन्मा.सदस्य श्री.नागराळे अश्विन धोंडीराम :- उगीलेवाडी जिल्हा परिषद शाळेचा विषय असून त्याचे निर्लेखन झालेले आहे. दोन वर्ग खोल्या पाडण्यात आलेले आहेत. वर्ग बांधकामासाठी काय कारवाई केलेली आहे याची कार्यकारी अभियंता बांधकाम यांनी माहिती द्यावी.

मा.उपाध्यक्ष महोदय :- सदर ठिकाणी वर्ग खोल्या बांधकाम करण्यासाठी निधी उपलब्ध करून तातडीने योग्य ती कार्यवाही अनुसरण्यात येईल.

सन्मा.सदस्य श्री.गुंडरे प्रफुलचंद्र निवृत्तीराव :- उदगीर शहरांमध्ये अक्षर नंदन व व अक्षर विकास या एकाच संस्थेच्या शाळा असून त्या शाळांमधील वाद असून सदर विषय शिक्षणविभागास अवगत करून दिलेला आहे. त्यावर काय कार्यवाही केली याची माहिती द्यावी. सदर शाळांच्या सेवा जेष्ठते संदर्भातील एक विषय होता त्याबाबत काय प्रगती आहे. सदर विषयी यापूर्वी सांगूनही अद्यापही सेवा जेष्ठता अंतिम करून देण्यात आलेली नाही. तसेच एखाद्या विषयात आपण पत्रव्यवहार करत असताना पत्रव्यवहाराची पद्धत काय आहे त्या पद्धतीप्रमाणे पत्रव्यवहार केला गेलेला आहे का. याची माहिती द्यावी. खाजगी संस्थेच्या एखाद्या शिक्षकाने शिक्षण विभागाकडे पत्र व्यवहार करत असताना सदर पत्र व्यवहार हा संस्थेच्या मुख्याध्यापकाच्या मार्फत गटशिक्षणाधिकारी कार्यालयामार्फत शिक्षण विभागाकडे येणे अपेक्षित असताना संस्थेतील एखाद्या शिक्षकाने थेट शिक्षण विभागाकडे पत्रव्यवहार केला व त्याची विभागाने दखल घेऊन कार्यवाही केली हे चुकीचे आहे. ज्या शिक्षकांना अशाप्रकारे काम केले आहे व शिक्षण विभागांतर्गत ज्या कर्मचा-यांनी परत संस्थेकडे पत्रव्यवहार केला आहे त्या कर्मचा-या विरुद्ध जबाबदारी निश्चित करावी. या अनुषंगाने शिक्षणाधिकारी (प्रा.) यांना फोन केला असता त्यांना सन्मा.सदस्य कोण बोलत आहेत याचीही माहिती नव्हती. सन्मा.सदस्यांचा फोन नंबर सेव्ह करावा असेही त्याना वाटत नाही का. सदर प्रकरणात काय कारवाई केली याची माहिती दोन दिवसात लिखित स्वरुपात देण्यात यावी.

उपशिक्षणाधिकारी (प्रा.) :- अक्षर नंदन प्राथमिक शाळा उदगीर व अक्षर विकास प्राथमिक शाळा उदगीर या एकाच संस्थेच्या दोन शाळा असून दोन शाळांपैकी एक शाळा ही टप्प्याटप्प्याने शंभर टक्के अनुदानित तत्वावर रुपांतरित झालेली आहे तर दुसरी शाळा ही पूर्वीपासूनच १००% अनुदानित होती. सदर शाळेच्या ठिकाणाच्या

अतिरिक्त कर्मचा-याबाबत सेवा जेष्ठता अगोदर कोणाची समजण्यात यावी याबाबतचा हा विषय असून अहवाल घेण्यात येत आहे. संबंधित जबाबदार कर्मचा-यास कारणे दाखवा नोटीस देऊन सबंधिताच्या खुलाशा नुसार योग्य ती कार्यवाही अनुसरण्यात येईल.

मा.उपाध्यक्ष महोदय :- सदर प्रकरणाची नोंद घेऊन ज्या कर्मचा-यांनी संस्थेच्या शिक्षकाच्या थेट पत्रव्यवहार वर कारवाई केली आहे त्या कर्मचा-याला तात्काळ कारणे दाखवा नोटीस बजावून खुलासा मागवण्यात यावा.

सन्मा.सदस्य श्री.गुंडरे प्रफुलचंद्र निवृत्तीराव :- माध्यमिक शिक्षण विभागांसंदर्भात प्रश्न आहे एखाद्या खाजगी संस्थेच्या मुख्याध्यापकाचा पदभार देण्यासाठी काय प्रक्रिया आहे. विभागाकडे मुख्याध्यापकाचा पदभार देण्यासाठी सेवा जेष्ठतेप्रमाणे प्रस्ताव आला आहे किंवा कसे याची आपल्याकडून तपासणी केली जाते का. विभागांतर्गत असे प्रस्ताव ब-याच कालावधीपासून प्रलंबित आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विनंती आहे की शिक्षण विभागांतर्गत कर्मचा-यांच्या तातडीने बदल्या करण्यात याव्यात २०-२० वर्षापासून कर्मचारी त्याच विभागात कार्यरत आहेत. संस्थाचालकांची चाकरी करत आहेत. पोदार इंटरनॅशनल स्कूल संदर्भात एक प्रश्न मागील कालावधीत मी विचारला होता की आमच्या परिसरातील शालेय विद्यार्थ्यांसाठीची शाळेची बस बंद करण्यात आली त्यामुळे विद्यार्थ्यांना दुस-या शाळेतच प्रवेश घ्यावा लागला. त्याबद्दल आपण काय चौकशी केली आहे. त्रिस्तरीय चौकशी समितीमध्ये शिक्षण अधिकारी माध्यमिक यांनी देखील असावे व सदर चौकशी समितीचा अहवाल आम्हाला द्यावा.

शिक्षणाधिकारी (मा.) :- सेवा जेष्ठतेनुसार संस्थेकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यानुसार पदभार देण्याची कार्यवाही केली जाते. संस्थेकडून आलेल्या प्रस्तावातील सेवाजेष्ठ कर्मचा-यांची जेष्ठता तपासूनच मुख्याध्यापकाचा पदभार दिला जातो. गट शिक्षणाधिकारी यांचे मार्फत पोद्दार शाळेतील शालेय बस बंद केल्या प्रकरणाची चौकशी केलेली असून चौकशी मध्ये तथ्य आढळून आलेले आहे. त्यानुसार सन्माननीय सदस्यांच्या निर्देशानुसार आपण परत सदर प्रकरणाची त्रिस्तरीय चौकशी करत आहोत. सदर शाळेच्या ठिकाणच्या भौतिक सुविधा व सर्वच बाबींची परत एकदा चौकशी करण्यात येत आहे.

मा.सभापती, पं.स. निलंगा :- बोगस दिव्यांग प्रमाणपत्राच्या आधारे जिल्ह्यातील सात शिक्षक कार्यरत आहेत. सदर बोगस दिव्यांग शिक्षकांचा अहवाल समाज कल्याण विभागाने सामान्य प्रशासन विभागाकडे सादर केला आहे. सामान्य प्रशासन विभागाने या अहवालावर काय कार्यवाही केली याचे उतर द्यावे. एक शिक्षक कर्मचारी तर असा आहे त्याने त्याचे दिव्यांगत्व हे तात्पुरते होते व उपचारानंतर त्याचे दिवंगत्व पूर्ण गेले आहे त्यानंतरही तो त्याचा बेकायदा लाभ घेत आहे. यामुळे जो खरा दिव्यांग कर्मचारी आहे त्यांच्यावर अन्याय होत आहे. शेजारच्या नांदेड व अहिल्यानगर जिल्हा परिषदांनी अशा प्रकारे आढळून आलेल्या बोगस दिव्यांग शिक्षकांवर थेट बडतर्फीची कार्यवाही केलेली असताना आपल्या जिल्हा परिषदेने अद्यापही का कार्यवाही केली नाही.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी साप्र तथा सचिव :- जिल्हा परिषद अंतर्गत असे दहा शिक्षक आहेत ज्यांनी दिव्यांगांचे असलेले यु.डी.आय.डी. कार्ड काढलेले नाहीत. त्यामुळे त्यांच्यावर निलंबनाची कार्यवाही करण्याबाबत जिल्हा दिव्यांग विभागाने शिक्षण विभागाकडे प्रस्तावित केले त्यानुसार शिक्षण विभागाने संचिका सामान्य प्रशासन विभागाकडे सादर केलेली असून ८ दिवसात योग्य ती कारवाई अनुसरण्यात येईल.

सन्मा.सदस्य श्री.दिलीपकुमार मारोती मटके :- स्थायी समिती बैठकीमध्ये एक विषय मांडला होता आरोग्य विभाग अंतर्गत कोणी लेखाविषयक काम करणा-या महिला कर्मचारी आहेत त्यांनी वैयकीय देयके ही कोणाचीही जेष्ठता डावलून काढत नाहीत असे सांगून असे जर जेष्ठता डावलून वैयकीय देयके काढले असेल तर राजीनामा देते असे नमूद केले होते. संबंधित कर्मचा-यांनी तशी कार्यवाही खरोखरच केली असेल तर त्याचे अभिनंदनचा ठराव घेण्याचे मी स्थायी समितीमध्ये मागणी केली होती. परंतु त्यापूर्वी मागील तीन-चार वर्षांपूर्वीची वैयकीय देयके ही नियमानुसार सादर केली गेली आहेत का याचीही चौकशी करा व त्या चौकशीचा अहवाल जि प

सर्वसाधारण सभेच्या दोन दिवस अगोदर मला यावा असे सांगितले होते त्याबाबत आरोग्य विभागाने काय कार्यवाही अनुसरली आहे याची माहिती द्यावी.

जिल्हा आरोग्य अधिकारी :- संबंधित कर्मचा-यांच्या कार्यासना वरील मागील दोन वर्षाची वैद्यकीय बिले जेष्ठतेनुसारच काढलेली आहेत किंवा कसे याची चौकशी करत आहोत. तसेच चौकशी समितीचा अहवाल आगामी स्थायी समितीमध्ये सन्माननीय सदस्यांना देण्यात येईल.सयस्थितीत संबंधित कर्मचारी रजेवर आहे.

सन्मा.सदस्य श्री.शेरे रामलिंग शेषेराव :- जिल्हा परिषद लातूर अंतर्गत विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक या पदासाठी TET/CTET परीक्षा उत्तीर्ण शिक्षकांची सन 2025-26 ची पदोन्नती प्रक्रिया न्यायालयीन निर्णयाच्या निर्देशाप्रमाणे तात्काळ राबविण्यात यावी. याबाबत लेखी निवेदन देखील सादर केले आहे. जिल्हा परिषद अंतर्गत विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक या पदासाठी मा.मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद दि. 07/09/2026 निर्णयान्वये सन 2025-26 साठी दि. 01/09/2025 या अंतिम तारखेस TET/CTET उत्तीर्ण असलेल्या पात्र शिक्षकांची पदोन्नतीची कार्यवाही करण्याबाबत मा. मुंबई उच्च न्यायालय यांचे निर्देश आहेत. शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त न्यायालयीन निर्णयानुसार पदोन्नती प्रक्रिया पूर्ण करुन दिनांक 04/09/2026 रोजी आदेश निर्गमित केलेले आहेत. तथापि शिक्षण विभाग, जिल्हा परिषद लातूर यांनी सन 2025-26 ची पदोन्नती प्रक्रिया अद्याप पूर्ण केलेली नाही. त्यामुळे सन 2025-26 या निवडसूची वर्षात पात्र शिक्षकांच्या पदोन्नती प्रक्रिया विहित वेळेत पूर्ण न केल्याने पात्र शिक्षकांवर अन्याय झालेला आहे. तरी सन 2025-26 या वर्षाची मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद दि. 07/09/2026 च्या निर्णयान्वये दि. 01/09/2025 अर्हता दिनांकानुसार TET/CTET उत्तीर्ण असलेल्या पात्र शिक्षकांची पदोन्नतीची कार्यवाही पूर्ण करुन पात्र शिक्षकांना न्याय मिळवून द्यावा.

उपशिक्षणाधिकारी (प्रा.) :- टी.ई.टी./सी.टी.ई.टी. असल्याशिवाय पदोन्नती प्रक्रिया घेतली जाऊ नये असे शासनाचे स्पष्ट निर्देश आहेत त्यामुळे पदोन्नती प्रक्रिया थांबलेली आहे. त्यानंतरही काही शिक्षकांनी मा.न्यायालयात याचिका दाखल केल्यानंतर मा.न्यायालयाने निर्णय दिला असून त्यानुसार पदोन्नती अनुषंगाने कार्यवाही अनुसरण्यात येत आहे.

सन्मा.सदस्य श्री.गुंडरे प्रफुलचंद्र निवृत्तीराव :- आज रोजी पदोन्नतीसाठी विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक शिक्षण विस्तार अधिकारी पात्र आहेत त्या सर्वांना आपल्याला पदोन्नती द्यावी लागेल.

सन्मा.सदस्या श्रीमती देशमुख राजश्री धनंजय :- माझे मतदार संघातील तांडा वस्तीमध्ये अंत्यवीधी करण्यासाठी जागा उपलब्ध नाही. अत्यवीधीकरण्यासाठी जागा उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच जिल्हयाध्ये ब-याच तांडा वस्तीमध्ये अंत्यवीधी करण्यासाठी जागा उपलबध नाही त्या ठिकाणी जागा उपलब्ध करुन देण्यात यावी.

तसेच भातांगळी येथे प्राथमिक आरोग्य केंद्र मोडकळीस आलेले आहे तरी तेथे नविन इमारत बांधकाम करण्यात यावे. चिकुर्डा प्राथमिक आरोग्य केंद्र येथे श्रीमती दामा आरोग्य सेविका कार्यरत आहेत यांची बदली तात्काळ करण्यात यावी.

मा.उपाध्यक्ष महोदय :- आचार संहिता संपल्यानंतर सदर विषयावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

सन्मा.सदस्या श्रीमती गोरे सईताई पृथ्वीराज:- गणित व विज्ञान शिक्षकांची बरीच पदे रिक्त असून भाषा विषयाच्या शिक्षकांकडून सदरचे काम केले जात असून यामुळे गुणवत्तेवर परिणाम होत आहे. जिल्हा परिषद शाळांमध्ये इयत्ता सहावी व आठवीच्या विद्यार्थ्यांना अध्ययन करण्यासाठी गणित व विज्ञान, शिक्षक कमी आहेत. भाषा विषयाचे शिक्षक गणित व विज्ञान शिकवतात. औसा तालुक्यात गणित व विज्ञान शिक्षकाचे २९ पदे रिक्त असून पवित्र पोर्टल मार्फत सदरची पदे तातडीने भरण्यात यावीत. माझे मतदारसंघातील शाळेमध्ये वर्ग खोल्याची अत्यंत दुरावस्था झालेली असून नवीन बांधकाम तातडीने घेण्यात यावे.

मा.उपाध्यक्ष महोदय :- सदर विषय अत्यंत महत्वाचा आहे याबाबत सन्माननीय सदस्यांचे अभिनंदन करतो त्याच बरोबर विभागाने रिक्त पदभरती अनुषंगाने तात्काळ आवश्यक ती कार्यवाही अनुसरावी असेही सूचित करण्यात येते.

सन्मा.सदस्य श्री.शेरे रामलिंग शेषेराव :- शेरे आर.टी.ई. द्वारे खाजगी शाळांमध्ये प्रवेश मिळालेल्या शालेय विद्यार्थ्यांचे संबंधित शाळेकडून स्वतंत्र वर्ग भरवले जात असल्याबाबत तक्रार असून अशा शाळांची नावे देखील कळविण्यात आलेली आहेत.

शिक्षणाधिकारी (प्रा.) :- या संदर्भात खात्री केली असून अशी कुठलीही परिस्थिती नाही तथापि सन्माननीय सदस्यांनी विशीष्ट शाळांची नावे सांगितले तर त्या ठिकाणी परत अधिकारी यांचे मार्फत चौकशी केली जाईल. आमच्या तपासणीमध्ये कुठेही असे वेगळे वर्ग भरवले जात असल्याचे आढळून आलेले नाही.

सन्मा.सदस्य श्री. नागरगोजे सुनिल गणपतराव :- जिल्हा परिषदेचे शिक्षक व ग्रामसेवक यांना बायोमेट्रिक उपस्थिती बंधनकारक करण्यात यावी.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पं.) :- ग्रामपंचायत स्तरावरील ग्रामसेवकांच्या उपस्थिती संदर्भात शासनाचे पत्र असून सर्व ग्रामपंचायत अधिका-यांसाठी बायोमेट्रिक उपस्थिती प्रणाली लागू करण्यात यावी असे पत्रात नमूद असून सन्मा.सदस्यांना सदर पत्र देण्यात येत आहे.

सन्मा.सदस्या श्रीमती आदमाने दिपाली प्रदिप :- जिल्हा परिषदेच्या इमारतीमधील स्वच्छता ग्रहांची अत्यंत दुरावस्था आहे. तसेच जिल्ह्यातील ग्रामीण भागात जलजीवन मिशन अंतर्गत सर्वच गावात कामे झालेली आहेत परंतु जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय इमारतीत येणा-या नागरिकांसाठी स्वच्छ पाण्याची सुविधा उपलब्ध नाही. स्व.गोपीनाथराव मुंडे यांच्या स्मारकाच्या देखभाल दुरुस्तीची जबाबदारी कोणाची आहे. त्यासाठी काय तरतूद केलेली आहे याची माहिती द्यावी तसेच जिल्हा परिषद परिसरातील पथदिवे बंद आहेत. पार्किंग परिसरातील मोठी झाडे पडण्याच्या स्थितीत आहेत काही घटना घडल्यास याची जबाबदारी कोणाची आहे.

कार्यकारी अभियंता (बांध.) :- ही सर्व जबाबदारी बांधकाम विभागाची असून जिल्हा परिषद परिसरात नियमित स्वच्छतेसाठी कर्मचारी नियुक्त असून त्यांच्यामार्फत नियमित स्वच्छता केली जात आहे.

सन्मा.सदस्य श्री.बिरादार तानाजी विनायक :-जिल्हा परिषदेमध्ये प्रवेश करत असताना रोडवरच वाहने लावली जातात त्याबाबत देखील सुरक्षा कर्मचारी नियुक्त करणे आवश्यक आहे. अपघात होण्याची शक्यता निर्माण होते यासाठी जिल्हा परिषदेमध्ये प्रवेश करत असताना एक व बाहेर जाण्यासाठी एक याप्रमाणे रस्ता केल्यास वाहतुकीची कोंडी होणार नाही. मागील बाजूने जाण्याचा मार्ग केल्यास ते सोयीचे होईल.

कार्यकारी अभियंता (बांध.) :- मागील बाजूस रस्त्याचा तीव्र उतार असल्याने अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

मा.उपाध्यक्ष माहदेय :- विभागाने विषयाची गांभिर्याने नोंद घेवून योग्य ती कार्यवाही अनुसरावी.

सन्मा.सदस्य श्री.गुंडरे प्रफुलचंद्र निवृत्तीराव :- तालुका विकास समिती स्थापन करण्यामागे शासनाचा काय उद्देश आहे याची माहिती द्यावी. सात महिन्यांमध्ये तालुका विकास समितीच्या किती बैठका झाल्या किती तालुक्यात तालुका विकास समितीच्या स्थापन झाले आहेत याची गट विकास अधिकारी यांनी माहिती द्यावी. तालुका विकास समिती म्हणजे काय हेच गट विकास अधिकारी यांना माहिती नाही. ज्या गट विकास अधिकारी यांनी तालुका विकास समिती स्थापन केलेल्या नाहीत त्यांना कारणे दाखवा नोटीसा बजावण्यात याव्यात. गट विकास अधिकारी निलंगा यांनी सभागृहात चुकीची माहिती देत असून प्रभाग समित्या रद्द झालेल्या असून त्या ठिकाणी तालुका विकास समित्या गठीत करण्याचे शासनाने निर्देश असताना आपण त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पं.) :- आपण तालुका समित्या स्थापन करण्यासाठी सर्व गट विकास अधिकारी यांना वेळोवेळी लेखी तसेच तोंडी सूचना दिलेल्या आहेत.

मा.उपाध्यक्ष महोदय :- गट विकास अधिकारी यांना तालुका विकास समितीची स्थापना करणे आवश्यक असून पुढील ८ दिवसात सर्व तालुक्यांमध्ये तालुका विकास समित्या स्थापन करून त्याच्या बैठका आयोजित करण्यात येतील याची दक्षता घ्यावी.

सन्मा.सदस्य श्री.गुंडरे प्रफुलचंद्र निवृत्तीराव :- ग्रामीण भागामध्ये ग्रामपंचायतीच्या मालमतांवर अतिक्रमण होत असून यासंदर्भात किती ग्रामपंचायतीने अतिक्रमणाविरुद्ध कारवाई केली याची माहिती देण्यात यावी. गट विकास अधिकारी याचा आढावा घेतात का.

गट विकास अधिकारी चाकूर :- तालुक्यातील पाच गावांमध्ये अतिक्रम होते त्या ठिकाणी योग्य ती कार्यवाही करून अतिक्रमण काढण्यात आलेले आहेत. अतिक्रमणाबाबत नियमित आढावा घेतला जात असून दरमहा अहवाल देखील वरिष्ठ कार्यालयास सादर केला जातो.

सन्मा.सदस्या श्रीमती शिंदे अश्विनी दत्तात्रय :- गट विकास अधिकारी लातूर यांनी लातूर तालुका विकास समितीची बैठक घेतली आहे का याची माहिती यावी व बैठकीमध्ये सन्माननीय सदस्यांना उपस्थित राहण्याबाबत पत्र दिलेले आहे का.

गट विकास अधिकारी लातूर :- लातूर तालुक्याच्या तालुका विकास समितीची बैठक अयाप झालेली नसून पुढील सप्ताहात सदर बैठक आयोजित करण्यात येणार आहे बैठकीचे पत्र सन्माननीय सदस्यांना देण्यात येईल.

सन्मा.सदस्या श्रीमती आशा शिवाजीराव भिसे :- जिल्ह्यातील एकल महिलांच्या संदर्भात माहिती देण्यात यावी. मागील कालावधीत याबाबत आढावा घेण्यात आलेला आहे. तसेच काही ठिकाणी अंगणवाडी मदतनीस ची भरती प्रक्रिया झालेली आहे त्यामध्ये बोगस प्रमाणपत्र जोडले असल्याचे प्रकार निदर्शनास आले असून याबाबत काय कार्यवाही अनुसरण्यात आलेली आहे याची माहिती यावी.

जिल्हा कार्यक्रम अधिकारी (म.बा.क.) :- एकल महिलांच्या बाबतीत अंगणवाडी ताई मार्फत आपण जिल्ह्यातील सर्व एकल महिलांचे सर्वेक्षण पूर्ण केलेले आहे. एकल महिलांच्या बाबतीत नेमके कोणत्या योजना घ्याव्यात याबाबतचे धोरण निश्चित झालेले नाही. तसेच अंगणवाडी मदतनीस ची १५९ व सेविका ३५ पदांची भरती प्रक्रिया नुकतीच झाली आहे. त्यापैकी ज्या ज्या ठिकाणी आक्षेप प्राप्त झाले आहेत त्या आक्षेपावर संबंधित एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी चौकशी करून निर्णय घेत आहेत. ज्या ज्या ठिकाणी ऑब्जेक्शन प्राप्त झालेले आहेत त्या ठिकाणची भरती प्रक्रिया थांबलेली आहे व सद्यस्थितीत विधान परिषद निवडणुकांच्या आदर्श आचारसंहिता असल्यामुळे आणखीही सन्माननीय सदस्यांना कुठे आक्षेप आढळून आल्यास तेही कृपया देण्यात यावे जेणेकरून त्यांचीही सी.डी.पी.ओ. मार्फत चौकशी केली जाईल. सदर भरती प्रक्रियेच्या शासन निर्णयामध्ये स्पष्ट नमूद करण्यात आलेले आहे आलेल्या आक्षेपांची एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी चौकशी करावी व त्यामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे अपील करण्याची देखील तरतूद आहे.

सन्मा.सदस्या श्रीमती आशा शिवाजीराव भिसे :- महिलांना कौशल्य विकास व जिल्हा उद्योग केंद्र मार्फत विविध उद्योगांचे प्रशिक्षण दिले जाते याबाबत प्रकल्प संचालक यांनी सभागृहास माहिती यावी.

प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यं. :- या संदर्भात आपण जिल्हा उद्योग केंद्राशी, तसेच कौशल्य विकास विभागाशी समन्वय करून जिल्ह्यातील महिलांना विविध उद्योगासाठी वेळोवेळी कॅम्पचे आयोजन केलेले आहे. या कॅम्पच्या माध्यमातून जवळपास २० हजार प्रस्ताव जिल्हा उद्योग केंद्राकडून मंजूर झालेले असून तेवढेच प्रस्ताव मंजुरीस्तव सादर करण्यात येत आहेत.

मा.सभापती, पं.स. शिरुर अनंतपाळ :- तालुक्यामध्ये जी इमारत बांधकाम करण्यात आलेली आहे ती त्याची आपण पाहणी केलेली आहे का इमारत एकदम शहराच्या बाहेर असून त्या ठिकाणी अनुचित प्रकार घडत

आहेत. एवढे ५० लक्ष रु. खर्च करून आपण ते उद्योग केंद्र तयार केले असून त्याचा उपयोग होतो का याचाही आढावा घेणे आवश्यक आहे.

प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यं. :- सदर जागेची मी व्यक्तीच्या पाहणी करून सन्माननीय सदस्यांना याबाबत अवगत करण्यात येईल.

सन्मा.सदस्या श्रीमती आशा शिवाजीराव भिसे :- पंचायत समिती रेणापूर इमारत बांधकाम बाबत सद्यस्थिती काय आहे.

कार्यकारी अभियंता (बांध.) :- सदर कामाचे सिव्हील काम ८ दिवसात पुर्ण होवून फर्निचरची कामे सुरु करण्यात येत आहेत.

सभागृहामध्ये सचिव यांनी आजची विशेष सर्वसाधारण सभेची बैठक मा. अध्यक्ष महोदया यांच्या परवानगीने संपल्याचे सांगितले व उपस्थित सर्व सन्मा. पदाधिकारी, सन्मा. सदस्य व अधिकारी यांचे आभार मानून मा. अध्यक्ष महोदया यांच्या परवानगीने **"वंदेमातरम"** झाल्यानंतर बैठक संपल्याचे जाहीर करण्यात आले.

सचिव
जिल्हा परिषद लातूर

अध्यक्ष
जिल्हा परिषद लातूर

जा.क्र. जिपला/साप्रवि/कार्या-५/कावि/351/२६
सामान्य प्रशासन विभाग, जि.प.लातूर
दिनांक:16 /११/२०२६

प्रतिलिपी माहितीस्तव सादर

१. मा. अध्यक्ष महोदय, जि.प. लातूर
२. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.लातूर
३. मा. उपाध्यक्ष महोदय, जि.प.लातूर
४. मा.अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.लातूर
५. मा. सभापती, विषय समिती ---------- सर्व जि.प.लातूर
६. मा. सभापती, पंचायत समिती सर्व जिल्हा लातूर
७. सर्व सन्मा.जि.प. सदस्य, जि.प.लातूर

प्रत माहितीस्तव व कार्यवाहीस्तव

१. सर्व खाते प्रमुख / विभाग प्रमुख, जि.प.लातूर
२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती सर्व जिल्हा लातूर
३. राज्य शासकीय अधिकारी ---------- (सर्व)

सचिव
जिल्हा परिषद, लातूर